केंद्रीय योजना | यशकथा | प्रेरणा | आरोग्य

मे २०१७/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य




## ३ वर्षे भारताच्या नवनिर्माणाची...

# निर्धार शाश्वत शेतीचा...
# संकल्प शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा !



**कृषी व संलग्न क्षेत्राचा विकासदर दोन वर्षापूर्वी (-)११.२ टक्के होता तो आता झाला (+)१२.५ टक्के...**
**त्यामुळेच गेल्या वर्षभरात शेती आधारित उत्पन्नात सुमारे ४० हजार कोटी रु.ची वाढ...**

शेतकरी जगाचा पोशिंदा. त्याला सहानुभूती नको तर हव्या आहेत विकासाच्या संधी !
अर्थसंकल्पातून मिळालीय याच क्षमताबांधणीला आणि शाश्वत विकासाला चालना !
पाणी, वीज, उत्तम बी-बियाणे, पाणंद, शेत रस्ते, तंत्रज्ञानाची जोड, वीज कनेक्शन, विहिरी, शेततळे, शेतमालाला योग्य भाव आणि व्यापक बाजारपेठ अशा पायाभूत सुविधांची त्यांना आज गरज आहे.

**नव्हे केवळ राजकारण करुया शेतकरी सक्षम !**

**महाराष्ट्र शासन**

- जलसंपदा विभागास ८ हजार २३३ कोटी रुपयांचा निधी.
- प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत महाराष्ट्रातील २६ प्रकल्प. अर्थसंकल्पात दिले २,८१२ कोटी रुपये... ८२ हजार ६०० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार
- कृष्णा-मराठवाडा प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी मा. राज्यपालांच्या मान्यतेने सूत्राबाहेर जाऊन २५० कोटी रुपये
- जलयुक्त शिवार योजनेतून जलसंपन्न राज्याच्या वाटचालीला वेग. योजनेतील कामांसाठी दिले १२०० कोटी रुपये
- राज्यातलं सिंचन वाढवण्यासाठी विहिरी आणि मागेल त्याला शेततळी देण्यासाठी २२५ कोटी रुपये
- ऊस पिकाला सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज
- डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळणार त्यासाठी १२५ कोटी रुपयांचे नियोजन
- राज्यात १० ठिकाणी कृषी बाजारपेठा. संत शिरोमणी सावतामाळी आठवडी बाजार अभियानाची व्याप्ती वाढवणार.
- कृषी पंपाच्या वीज जोडणीसाठी येत्या वित्तीय वर्षात ९७९ कोटी रुपयांची तरतूद
- कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे कृषी विपणनावरील नियंत्रण उठवले. शेतमाल वाहतूकीसाठी 'कोल्ड व्हॅन'
- राज्यात गट शेतीतून अल्प-अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या हिताची जोपासना.
- १.३८ कोटी पैकी १.०६ कोटी शेतकऱ्यांना 'मृदा आरोग्य पत्रिका' वाटप पूर्ण
- 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी' प्रकल्पातून मराठवाड्यातील ४ हजार गावे दुष्काळापासून संरक्षित, विदर्भातील १ हजार गावांचा क्षारतेचा प्रश्न सोडवणार
- अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेसारखी नवीन योजना
- ३०२ तालुक्यात सघन कुक्कुट विकास गट स्थापणार, ३४९ फिरती पशुवैद्यकीय चिकित्सालये
- पारंपरिक मेंढी पालन करणाऱ्या लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर मेंढी गटाचे वाटप
- साखर कारखान्यांचा २०१६-१७ चा ऊस खरेदी कर माफ
- जीओ मेमब्रेन, माती तपासणी, दूध शुद्धता तपासणी यांच्या किटवरील सर्व कर माफ


देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री


सुधीर मुनगंटीवार
मा.मंत्री, वित्त व नियोजन


पांडुरंग फुंडकर
मा.मंत्री, कृषी व फलोत्पादन


दीपक केसरकर
मा.राज्यमंत्री, वित्त व नियोजन


सदाभाऊ खोत
मा.राज्यमंत्री, कृषी व फलोत्पादन

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,** महाराष्ट्र शासन



६ भारताचे नवनिर्माण

२६ मे २०१७ रोजी नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखालील सरकार येऊन तीन वर्ष पूर्ण होत आहेत. ही तीन वर्षे भारतासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहेत. भारताच्या नवनिर्माणास गतिमानतेने प्रारंभ झाला आहे. भारताचे रूपांतर या तीन वर्षात स्मार्ट, आश्वासक, सक्षम, समर्थ आणि कोणत्याही समस्यांचा आत्मविश्वासपूर्वक सामना करण्यास सुसज्ज असलेला देश असे झाले आहे.



१० महामार्गांचे जाळे, विकासाची पायाभरणी

२०१४ पूर्वी महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्गांची लांबी ५७०० किमी होती. नितीन गडकरी यांनी रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाची सूत्रे हाती घेतल्यानंतर तीन वर्षात महाराष्ट्रातील विद्यमान आणि प्रस्तावित राष्ट्रीय महामार्गांची लांबी २२ हजार ३८७ किमीवर पोहोचली आहे.

१४ रेल्वे सुपरफास्ट



रेल्वे मंत्रालयाने मुंबईसह महाराष्ट्रासाठी स्वातंत्र्योत्तर काळात १ लाख ३७ हजार कोटींची तरतूद प्रथमच केली.

२८ स्मार्ट ॲप्स, स्मार्ट भारत




२०१४-१५ पासून केंद्र सरकारच्या जवळपास प्रत्येक केंद्रीय मंत्रालयाचे एक तरी ॲप विकसित झाले आहे.

१६ दर्जात सुधार, गुणवत्तेत वाढ

उच्च शिक्षणामध्ये दर्जा सुधारण्यावर भर देण्यात आला. बरेच नवे उपक्रम सुरू करण्यात आले. उच्च शिक्षणासाठी, आणि संशोधनासाठी चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.




३४ लाभ महाराष्ट्राचा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वामुळे आणि त्यांनी राजधानी दिल्लीत वेळोवेळी महाराष्ट्राच्या विविध प्रश्नांच्या केलेल्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्राचे विविध प्रश्न गेल्या तीन वर्षात मार्गी लागले आहेत.

३६ मी मुख्यमंत्री बोलतोय...

समाजातील विविध घटकांच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा थेट सरकारपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तसेच सरकारचे काय मत आहे हे त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे. याकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने 'मी मुख्यमंत्री बोलतोय...' हा अभिनव कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.



४४ डाळिंब फुलले माळरानी



डाळिंबाची बाग खडकाळ माळरानावर फुलवणाऱ्या जिगरबाज शेतकऱ्याची प्रेरणादायी यशकथा...


| | |
|---|---|
| भारताचे नवनिर्माण | ६ |
| महामार्गांचे जाळे, विकासाची पायाभरणी | १० |
| आपल्या योजना, आपली प्रगती | १३ |
| रेल्वे सुपरफास्ट | १४ |
| दर्जात सुधार, गुणवत्तेत वाढ | १६ |
| उद्योगात आघाडी | १८ |
| सर्वांसाठी वीजहमी | २० |
| सुसज्ज आणि समर्थ | २२ |
| शेतकऱ्यांचे हित, देशाचा विकास | २४ |
| सामाजिक न्याय शेवटच्या घटकापर्यंत | २६ |
| स्मार्ट ॲप्स, स्मार्ट भारत | २८ |
| कामगिरी दमदार | ३० |
| लाभ महाराष्ट्राचा | ३४ |
| मी मुख्यमंत्री बोलतोय... | ३६ |
| इंटरनेट आणि आजार | ४२ |
| डाळिंब फुलले माळरानी | ४४ |
| समस्या नको, रिझल्ट हवा... | ४६ |
| सुवर्णमहोत्सवी संस्कृतिसेतू | ४८ |
| कामगारांचे हित, सेवा आणि सुविधा | ५० |
| माळारानावर हिरवाई | ५२ |
| महापणन अभियान | ५४ |
| उष्माघातापासून राहा दूर... | ५६ |
| येथे कर माझे जुळती... | ५८ |

वर्ष ६८ वे | अंक ११ | मे २०१७

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, देवेंद्र भुजबळ, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

## मांडणी

- मुखपृष्ठ — गोत्रेश जोशी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

## वितरण आणि वर्गणीदार


वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

## सप्रेम नमस्कार

✍ शासनाने १० वीतील प्रत्येक विद्यार्थ्याची कलचाचणी घेऊन प्राप्त झालेल्या निष्कर्षानुसार करिअर मार्गदर्शन करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. मात्र करिअर मार्गदर्शनाबाबत मुद्रित साहित्य अभावाने उपलब्ध आहे. त्याची व्याप्ती वाढवता येईल.

**- जी. ए. वाघोलीकर, शंकरपेठ, पुणे.**




✍ लोकराज्यमध्ये विविधांगी माहिती असते. मात्र, त्यासोबतच शासनाच्या विविध विभागातील रिक्त जागांसंबंधीची भरती प्रक्रिया, जाहिरात आदींबाबत सविस्तर माहिती देणारे रोजगार समाचार धर्तीवर शासनाने रोजगारविषयक वर्तमानपत्र प्रसिद्ध केल्यास ग्रामीण विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल.

**- अश्वीन गांजीवार, पनोहरकवाडा, यवतमाळ.**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महान्यूज या वेबपोर्टलवर, नोकरी शोधा? या सदरात रोजगार संधीची आणि करिअरनामा या सदरात वेगवेगळ्या अभ्यासक्रमाची माहिती दिली जाते. संपर्क संकेतस्थळ www.mahanews.gov.in

**- संपादक**

✍ लोकराज्यमध्ये सर्वसमावेश माहिती असते. त्यासोबतच प्रत्येक महिन्यातील सरकारी निर्णयांचा प्रकर्षाने समावेश केल्यास आनंद होईल.

**- विश्वास रंडे, कागल, कोल्हापूर.**

✍ महाराष्ट्रातील धार्मिक स्थळांची इत्थंभूत माहिती देणारा विशेषांक काढल्यास भाविकांना तीर्थयात्रा करणे सोईचे होईल.

**- माधवराव पाटील, पिंपळगाव हरेश्वर, जळगाव.**

लोकराज्यच्या जानेवारी २०१७ व्हिजिट महाराष्ट्र या विशेषांकात आपणास अपेक्षित असलेल्या तीर्थस्थळांची माहिती देण्यात आली आहे.

**- संपादक**

✍ शासनस्तरावरील शेतकरी व गरिबांसाठी असलेली शासकीय योजना व मदत याविषयीची सविस्तर माहिती प्रत्येक अंकात दिल्यास त्याचा गरजूंना लाभ घेता येईल. शिवाय मंत्रिमंडळ निर्णयही नियमित प्रसिद्ध करावे.

**- शंकुतला माशाळे, जि. सोलापूर**

## वार्षिक वर्गणी

वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्य अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

## प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.
पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# उत्तुंग झेप

प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला २६ मे २०१७ रोजी ३ वर्षे पूर्ण होत आहेत. या तीन वर्षांच्या कालावधीत विकास आणि प्रगतीच्या अनुषंगाने भारताने उंच झेप घेतली आहे. २०20 सालापर्यंत भारताला जागतिक महत्त्वाची शक्ती बनवण्याचे प्रधानमंत्री श्री. मोदी यांचे स्वप्न आहे. या स्वप्नपूर्तीच्या दिशेने देशाची घोडदौड सुरू आहे.

जगात आर्थिक मंदी असताना भारतीय अर्थव्यवस्थेने चांगलेच स्थैर्य दाखवले असून, विकासदरात वृद्धी दर्शवली आहे. आपला देश एक आर्थिक शक्ती म्हणून उदयास येत असून, त्याची नोंद जागतिक पातळीवर घेण्यात येत आहे. भारताचा आत्मसन्मान आणि आत्मविश्वास वाढवणाऱ्या अनेक घटना या कालावधीत घडल्या. जागतिक स्तरावर सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर भारताचे मत आणि भूमिका विचारात घेतली जात आहे.

निश्चलनीकरणाच्या धाडसी निर्णयाने काळा पैसा बाहेर येण्यास व भ्रष्टाचारास प्रतिबंध होण्यास मदत झाली आहे. त्याचबरोबर डिजिटल व्यवहार करण्याची मानसिकता तयार होऊन देश डिजिटल क्रांतीसाठी तयार झाला आहे. अशा अनेक निर्णयांची विस्तृत माहिती आम्ही या अंकात समाविष्ट केली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात समाविष्ट असलेल्या महाराष्ट्रातील मंत्री महोदयांच्या विशेष मुलाखती हे या अंकाचे वैशिष्ट आहे. गेल्या तीन वर्षात केंद्र सरकारने महाराष्ट्राला विविध क्षेत्रांमध्ये जी मदत दिली त्याचा सर्वंकष आढावा आम्ही या अंकात घेतला आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने 'मी मुख्यमंत्री बोलतोय', हा अभिनव कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस हे जनतेने पाठवलेल्या व विचारलेल्या प्रश्नांना थेट उत्तरे देतात. सध्या हा कार्यक्रम दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून प्रक्षेपित आणि आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येत आहे. पहिल्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी शेती आणि सिंचनविषयक विविध प्रश्नांच्या अनुषंगाने संवाद साधला. यावर आधारित विशेष लेख आम्ही या अंकात समाविष्ट केला आहे. मुख्यमंत्र्यांनी शेती, शेतकऱ्यांचे विविध प्रश्न, शेतमालाचे भाव, पीक पद्धती, सिंचन व्यवस्था, कृषी कर्ज, जलयुक्त शिवार आदी विषयांवर विचारलेल्या प्रश्नांना विस्तृत उत्तरे दिली आहेत. हा अंक आपणास आवडेल, याची खात्री आहे.


१ मे रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा वर्धापन दिन आणि कामगार दिन साजरा होत आहे. त्यानिमित्त सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!




ब्रिजेश सिंह
(मुख्य संपादक)

# भारताचे नवनिर्माण

२६ मे २०१७ रोजी मा. मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकार येऊन तीन वर्ष पूर्ण होत आहेत. ही तीन वर्षे भारतासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहेत. भारताच्या नवनिर्माणास गतिमानतेने प्रारंभ झाला आहे. देशाचे रूपांतर या तीन वर्षात स्मार्ट, आश्वासक, सक्षम, समर्थ आणि कोणत्याही समस्यांचा आत्मविश्वासपूर्वक सामना करण्यास सुसज्ज असलेला देश असे झाले आहे.




देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री


मुंबई येथे नुकत्याच झालेल्या 'इंडिया टुडे कॉन्क्लेव्ह'मध्ये सहभागी झालेल्या एका मान्यवराने प्रधानमंत्री मा. श्री. नरेंद्र मोदीजी आणि अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष श्री. बराक ओबामा यांच्या व्हाईट हाऊसमधील भेटीची आठवण सांगितली. जगाची अधिक गतीने प्रगती व्हावी, यासाठी विविध डिजिटल उपक्रम राबवणे कसे आवश्यक आहे, इत्यादींवर मा. मोदीजी या चर्चेत सर्वाधिक भर देत होते. श्री. ओबामा यांनी नंतर सांगितले की, कोणताही राष्ट्रप्रमुख डिजिटल उपक्रमांविषयी इतकी विस्तृत, सखोल माहिती असलेला त्यांना आढळला नाही. मा. मोदीजींच्या अशा वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपणामुळेच आज भारत जागतिक पातळीवर एक महत्त्वाचा देश म्हणून उदयास आला आहे, विविध जागतिक घडामोडींमधील एक महत्त्वाचा भागिदार सुद्धा बनला आहे. ही सारी किमया घडली अवघ्या तीन वर्षांत!

### अपेक्षा ते आत्मविश्वास

२६ मे २०१७ रोजी मा. मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकार येऊन तीन वर्ष पूर्ण होत आहेत. एकूणच निराशाजनक परिस्थिती प्रत्येकच क्षेत्रात होती. पण, आता याचे रुपांतर तीन वर्षात स्मार्ट, आश्वासक, सक्षम, समर्थ आणि कोणत्याही समस्यांचा आत्मविश्वासपूर्वक सामना करण्यास सुसज्ज असलेला देश असे झाले आहे. याचे संपूर्ण श्रेय नि:संशय मा. मोदीजी यांच्या नेतृत्त्वाला जाते. प्रधानमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मा. मोदीजी म्हणाले की, मी देशाचा प्रधानमंत्री नाही तर २४ तास कार्यरत असणारा प्रधानसेवक आहे. ते केवळ विधान नव्हते, तर त्यांनी ही बाब आपल्या वागण्यातून शब्दश: खरी करून दाखवली. सतत कार्यमग्नता आणि कार्यतत्परता हे त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य!

२०१४ मध्ये भारताच्या नागरिकांनी पूर्ण बहुमताने मा. मोदीजींना निवडून दिले. देशाचा सर्वांगीण व चौफेर विकास मा. मोदीजीच करू शकतात, हा विश्वास त्यातून व्यक्त झाला. गेल्या तीन वर्षांत लोकांचा हा विश्वास वृद्धिंगत झाला असून विविध निवडणुकांमध्ये मिळालेल्या यशाने त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. या संपूर्ण प्रवासाचे वर्णन मी अपेक्षा ते आत्मविश्वास असे करीन.

## ऊर्जा परावर्तित झाली

२४ तास कार्यरत असणारी ऊर्जा त्यांच्याकडे असून हीच ऊर्जा भारतीय जनमानसात परावर्तित करण्याचा त्यांनी यशस्वीपणे प्रयत्न केला आहे. मा. मोदीजींनी जागतिक स्तरावर अवघ्या तीन वर्षांत आपल्या कार्यशैलीचा, राजकीय निपुणतेचा, आधुनिक विचारांचा आणि नावीन्यपूर्ण धडाडीचा जो अमिट ठसा उमटवला, तो वाखाणण्यासारखा आहे. मा. मोदीजींनी संपूर्ण जगात 'ब्रँड इंडिया'ची मोहोर ठसठशीतपणे उमटवली आहे. मा. मोदीजींसारख्या अत्यंत प्रभावशाली, करिष्माई व्यक्तिमत्व असलेल्या नेतृत्वासोबत काम करायला मिळणे, हे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांचे भाग्य आहे. भारतीय मानसिकतेला मा. मोदीजींनी गेल्या ३ वर्षात नव्या उत्साहाने, सकारात्मकतेने भारून टाकण्याचे कार्य केले आहे.

## आर्थिक सुधारणा

मा. मोदीजींनी देशाचा चेहरामोहरा बदलून टाकेल, अशा योजना कार्यान्वित केल्या. भारतीय अर्थव्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा होण्याच्या दृष्टीने 'वस्तू आणि सेवा कर' (जीएसटी) कायदा मंजूर करण्यात मा. मोदीजींना यश मिळाले. यामुळे एक देश, एक करचना ही संकल्पना मूर्त स्वरूपात येणार आहे. भारताला एकसूत्रात समर्थपणे बांधण्यासाठी जीएसटीचा महत्त्वपूर्ण हातभार लागणार आहे. यामुळे अर्थव्यवस्थेच्या वाटेवरचे अडथळे तर दूर होतीलच, शिवाय व्यापार-व्यवसाय अधिक सुलभ होईल. महागाई कमी होण्यात याचा मोठा हातभार लागणार आहे.

अधिकाधिक नागरिकांनी डिजिटल व्यवहारास प्राधान्य द्यावे, यासाठी 'भीम' ॲप उपलब्ध करून दिले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांना खऱ्या अर्थाने आत्मसात करण्याचे काम त्यांनी केले. या ॲपची उपयुक्तता फार मोठी आहे. अधिकाधिक नागरिक आता त्याचा वापर करीत आहेत.

## ऐतिहासिक अर्थसंकल्प

केंद्र सरकारचा २०१७-१८ चा अर्थसंकल्प ऐतिहासिक ठरला. स्वातंत्र्यानंतर प्रथमच तो फेब्रुवारीमध्ये सादर करण्यात आला. मुख्य अर्थसंकल्पातच रेल्वे अर्थसंकल्पाचा समावेश करून आर्थिक सुधारणांच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले. १ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर केल्याने विविध विकास कामासाठी असलेल्या निधीचा विनियोग तातडीने सुरू करता येणे शक्य झाले. शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी १० लाख कोटी रुपयांची तरतूद ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. शेतीची उत्पादकता आणि उत्पन्न वाढवण्यासाठी त्याचा मोठा उपयोग होणार आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दिशेने हे पाऊल अतिशय महत्त्वाचे ठरेल.

## संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता

संरक्षण क्षेत्रासाठी २.७४ लाख कोटींची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. भारताला संरक्षण सामग्री उत्पादन क्षेत्रात स्वयंपूर्ण करण्याचा मा. मोदीजींचा निर्धार त्यातून व्यक्त झाला आहे. गेल्या तीन वर्षांत अनेक महत्त्वाचे निर्णय झाले. त्याचाच एक भाग म्हणून १ मार्च २०१७ रोजी भारतात निर्मिती झालेल्या सुपरसॉनिक इंटरसेप्टरचे यशस्वी परीक्षण करण्यात आले. १०४ उपग्रहांना एकाचवेळी अंतरिक्षात पाठवण्याचा विश्वविक्रम याच कालावधीत घडला. अंतराळ विज्ञान क्षेत्रात आपला देश स्वयंपूर्ण होत असून, या क्षेत्रात भारत एक महत्त्वाची शक्ती असल्याचे जगाने मान्य केले आहे. दूरसंचार क्षेत्रात सुद्धा अतिशय भरीव पावले सरकारने उचलली आहेत.

## सर्वांना आरोग्य

आरोग्यसंपन्न भारतासाठी यंदा राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहीर करण्यात आले आहे. त्याचा लाभ तळागाळातल्या सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होणार आहे. यामुळे समाजातील सर्वच घटकांना विशेषतः गरिबांना आरोग्याच्या मुलभूत आणि आधुनिक सोयी सुलभतेने उपलब्ध होणार आहेत. या धोरणात भारताच्या पारंपरिक आरोग्य उपचार पद्धतीच्या समावेशासोबतच आधुनिक उपचारप्रणालीचाही अंतर्भाव करण्यात आला आहे. औषध आणि उपचार सर्वांच्या आवाक्यात यावेत, यासाठी केलेल्या प्रयत्नांचे परिणाम आता प्रत्यक्ष दिसू लागले आहेत.

## गरीब आले मुख्य धारेत

जनधन योजनेमुळे २७ कोटी ९७ लाख गरिबांचे बँक खाते उघडले जाऊन त्यात ६३ हजार ८८५ कोटी जमा करण्यात आले. देशाच्या इतिहासात ही



आर्थिक क्रांती पहिल्यांदाच घडून स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकात प्रथमच गरीब माणसाला मुख्य आर्थिकधारेत आणण्यात यश मिळाले आहे.

'स्टँडअप' आणि 'स्टार्टअप इंडिया' या योजनांच्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगारास चालना देण्यासाठीचे प्रयत्न तर फार मोठे आहेत. मुद्रा योजनेच्या माध्यमातून अनेक तरुणांना कर्ज देण्यात आले. उज्वला योजनेंतर्गत महिलांना २ कोटीहून अधिक मोफत गॅस कनेक्शन देण्यात आले. स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकानंतरही देशातील १८ हजार गावांमध्ये वीज पोहोचू शकली नव्हती. मात्र मा. मोदीजींनी वीज क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करून १२ हजार ५८६ गावांमध्ये वीज पोहोचवली आहे. उर्वरित सर्व गावांना २०१८ पर्यंत वीज देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## देशात चैतन्य

सातत्याने कार्यरत राहण्याच्या मा. मोदीजी यांच्या कार्यशैलीमुळे भक्कमपणे उभे राहून सरकारचे मनोधैर्य वाढवले. सर्वसामान्यांचा इतका प्रचंड विश्वास मा. मोदीजींनी कमावला असून त्याचेच प्रत्यंतर निश्चलनीकरणानंतर झालेल्या विविध निवडणुकांमध्ये दिसून आले. 'आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. तुम्ही केले ते बरोबरच केले', ही बाब सर्वसामान्यांनी मतपेटीद्वारे खणखणितपणे सिद्ध केली.

## सबका साथ सबका विकास

मोदीजींनी 'सबका साथ, सबका विकास' हे त्यांच्या कार्यशैलीचे सूत्र ठेवले आहे. त्यामुळेच आज देशातील सर्वच घटकांना त्यांच्याबद्दल आपुलकी आणि विश्वास वाटतो आहे. विकास हाच एकमेव एजंडा घेऊनच राजकारण आणि समाजकारण करणारा नेता आपल्या देशाला लाभलाय, याची खात्री जनसामान्यांना झाली आहे, अशी खात्री सर्वोच्च नेतृत्वाने निर्माण करणे गरजेचे असते. कारण सामर्थ्यशाली राष्ट्राची निर्मिती त्यातूनच होत असते. भारताला जागतिक पातळीवरची महत्त्वाची शक्ती म्हणून भारताला नावारूपास आणणे हे

**राष्ट्रीय व जागतिक स्तरावर मोदीजींच्या कार्याचा अमिट ठसा उमटत असतानाच, त्याचा फायदा महाराष्ट्रालाही होत आहे. 'मेक इन इंडिया'चे मा. मोदीजींचे स्वप्न साकारण्यासाठी महाराष्ट्राचा प्रमुख सहभाग राहणार असल्यानेच पहिल्या 'मेक इंडिया सप्ताहाचे' आयोजन करण्याचा सन्मान महाराष्ट्रास देण्यात आला. मा. मोदीजींनी दाखवलेला विश्वास आम्ही सार्थरीत्या सिद्ध केला. आंतरराष्ट्रीय मेरीटाइम समिटची जबाबदारी राज्याने समर्थरीत्या पार पाडली.**
**इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित आंतरराष्ट्रीय स्मारकाचा प्रश्न निष्कारणच रखडला होता. पण मा. मोदीजींचे सरकार आल्याबरोबर या स्मारकाच्या उभारणीसाठी जे जे अडथळे होते ते सर्व त्यांनी दूर केले. या स्मारकाच्या भूमिपूजनास ते स्वत: आले. आता तर इंदू मिलची संपूर्ण जागा राज्यशासनाच्या ताब्यात आली आहे.**



प्रशासनात सुद्धा अतिशय सकारात्मक बदल दिसून येतो आहे. देशात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून विविध क्षेत्रात देशाची घोडदौड सुरू झाली आहे. प्रगती आणि विकासाच्या अडकलेल्या रथास गतिमानता प्राप्त झाली आहे. जगातील अनेक राष्ट्रांचा विकासदर हा कमी होत असताना भारताच्या विकासदराने गेल्या तीन वर्षात वृद्धी दाखवली असून भारताची अर्थव्यवस्था स्थिर आणि समर्थ स्वरूपाची होत असल्याचा विश्वास जागतिक धुरिणांना वाटू लागला आहे.

## क्रांतिकारक निर्णय

मा. मोदीजींनी निश्चलनीकरणाचा क्रांतीकारक निर्णय घेऊन सगळ्या जगापुढे धाडसी निर्णयाचा आदर्श ठेवला. देशात दडलेला काळा पैसा आणि भ्रष्टाचाराविरुद्धचा हा एल्गार म्हणजे मोदीजींचा 'मास्टर स्ट्रोक' ठरला. या निर्णयाला सर्वसामान्यांनी राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने सहकार्य केले. निश्चलनीकरणानंतरच्या प्रारंभीच्या कालखंडात सर्वसामान्यांनी कष्ट होत असतानासुद्धा या निर्णयाच्या पाठीशी मा. मोदीजींचे स्वप्न आहे. त्यासाठी त्यांचे अथक परिश्रम गेल्या ३ वर्षापासून सुरू आहेत. या परिश्रमांची जाणीव देशातील जनतेलाही झाली आहे. मोदीजींच्या प्रयत्नांना आपलाही हातभार लागायला हवा, असे आता येथील प्रत्येकास वाटू लागले आहे. माझ्या मते मा. मोदीजींचे हेच खरे यश आहे. या यशानेच देश, महासत्ता होण्याचा विश्वास आणखी दृढ झाला आहे.

## महाराष्ट्र लाभान्वित

अरबी समुद्रातील शिवछत्रपतींच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या अनुषंगाने सुद्धा ज्या काही अडचणी होत्या त्या मा. मोदीजींनी तातडीने सोडवल्या. महाराष्ट्रातील 'स्मार्टसिटी योजना', 'स्वच्छ भारत अभियान' आदींना सुयोग्य असा निधी देण्यात आला आहे. मुंबई सागरी प्रकल्पास मंजुरी मिळाली तसेच अंतिम अधिसूचना जारी करण्यात आली आहे. नागपूर मेट्रोसाठी सर्व प्रकारचे साहाय्य करण्यात येत असून ही मेट्रो ठरलेल्या कालावधीत नागपूर शहरात धावणार

आहे. मेट्रोच्या गतिमान कामामुळे नागपूर शहरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. पुणे मेट्रोसही गती देण्यात आली आहे. एकाच कार्यक्रमात १ लाख कोटीहून अधिकच्या कामांचा शुभारंभ होणे, हा इतिहास घडवण्याची संधीही मा. मोदीजींनीच महाराष्ट्राला दिली.

गेल्यावर्षीच्या दुष्काळ निवारणासाठी केंद्राने ३०५० कोटी रुपयांची मदत महाराष्ट्राला दिली. ही आतापर्यंतची केंद्राकडून मिळालेली सर्वोच्च मदत ठरली. राज्यातील रेल्वे प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पश्चिम घाटावर कोकणात तेल शुद्धीकरण प्रकल्पास मंजुरी देण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील वेगवेगळ्या कंपन्याद्वारे हा प्रकल्प राबवला जाणार असून त्यामुळे साधारणत: एक लाख लोकांना रोजगार मिळू शकेल. कौशल्य विकासासाठी मोदीजींनी जो पुढाकार घेतला आहे, त्याचा महाराष्ट्रासही फायदा झाला आहे. गेल्या तीन वर्षात राज्यातील शेतकरी, तरुण, विद्यार्थी, महिला, व्यावसायिक, उद्योजक अशा विविध क्षेत्रातील नागरिकांना मा. मोदीजींच्या विविध योजना व निर्णयांचा लाभ मिळाला आहे.

## प्रभावी साथ

नवा, स्मार्ट आणि सामर्थ्यशाली महाराष्ट्र घडवण्याच्या आपल्या प्रयत्नांना मा. मोदीजींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची प्रभावी साथ मिळत आहे. या सहकार्यातूनच भविष्यात संपन्न, समृद्ध आणि सक्षम महाराष्ट्राचे स्वप्न साकारले जाणार आहे. अतिशय यशस्वी ठरलेल्या मा. मोदीजींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन!

# आपल्या योजना, आपला विकास

### स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया

प्रारंभ: १६ जानेवारी २०१६

या योजनेंतर्गत नवउद्योजकांना त्यांचा व्यवसाय (स्टार्टअप) सुरू करण्यासाठी साहाय्य केले जाते. संकेतस्थळ: http://finmin.nic.in

### दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (DDUGKY)

प्रारंभ : २५ सप्टेंबर २०१४

या योजनेचा मुख्य मुद्देश ग्रामीण युवकांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षित करणे आहे.
संकेतस्थळ: http://ddugky.gov.in

### प्रसाद (Pilgrimage Rejuvenation and Spiritual Augmentation Drive)

प्रारंभ : ९ मार्च २०१५

या योजनेंतर्गत अमृतसर, अजमेर, अमरावती, द्वारका, गया, कांचीपुरम, केदारनाथ, कामाख्य, मथुरा, पुरी, वाराणसी, वेल्लंकनी या तीर्थक्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाच्या पर्यटनसाठी पायाभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत. संकेतस्थळ: http://tourism.gov.in

### उडान योजना

प्रारंभ : १४ नोव्हेंबर २०१४

या योजनेंतर्गत उच्च तांत्रिक शिक्षणासाठी मुलींना प्रोत्साहन दिले जाते.
संकेतस्थळ: http://mhrd.gov.in

### प्रधानमंत्री उज्ज्वला योजना

प्रारंभ: १ मे २०१६

या योजनेंतर्गत देशातील दारिद्र्य रेषेखालील ५ कोटी महिलांना मोफत गॅस कनेक्शन दिले जात आहे. संकेतस्थळ: http://www.pmujjwalayojana.com

### नमामि गंगे प्रकल्प

प्रारंभ: १० जुलै २०१४

गंगा नदीचे शुद्धीकरण, संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी ही योजना राबवण्यात येत आहे.
संकेतस्थळ: https://nmcg.nic.in

### सेतू भारतम प्रकल्प

प्रारंभ: ४ मार्च २०१६

रेल्वे क्रॉसिंगपासून सर्व राष्ट्रीय महामार्ग मुक्त करण्यासाठी आणि २०१९ राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या पुलांच्या दुरुस्तीसाठी ही योजना राबवण्यात येत आहे. यासाठी ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल. संकेतस्थळ: http://morth.nic.in




लोकसभा सदस्यांसाठी 'गो ग्रीन'उपक्रमांतर्गत सुरू करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक विद्युत बसच्या लोकार्पण कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, सोबत लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, अवजड उद्योगमंत्री अनंत गिते, माहिती व प्रसारणमंत्री व्यंकय्या नायडू.

२०१४ पूर्वी महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्गांची लांबी ५७०० किमी होती. नितीन गडकरी यांनी रस्ते वाहतूक आणि महामार्ग, जलवाहतूक मंत्रालयाची सूत्रे हाती घेतल्यानंतर तीन वर्षात महाराष्ट्रातील विद्यमान आणि प्रस्तावित राष्ट्रीय महामार्गांची लांबी २२ हजार ३८७ किमीवर पोहोचली आहे. सार्वजनिक बांधकाम खाते आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या साहाय्याने २०१९ पर्यंत राष्ट्रीय महामार्गांचे जाळे निर्माण करून महाराष्ट्राच्या वेगवान विकासाची पायाभरणी करण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य श्री. गडकरी यांनी ठेवले आहे. केंद्रातील सरकारला तीन वर्षे पूर्ण होत असताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळातील सर्वात कार्यक्षम मंत्री असा लौकिक संपादन करताना श्री. गडकरी यांनी महाराष्ट्र व देशातील पायाभूत सुविधांवर आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. श्री. गडकरी यांच्याशी साधलेल्या संवादातून त्यांनी तीन वर्षांत महाराष्ट्रासाठी केलेल्या कामांचा हा आढावा.

# महामार्गांचे जाळे, विकासाची पायाभरणी

**आपण देशाचे मंत्री आहात. पण महाराष्ट्रावरून आपले लक्ष यत्किंचित ही ढळलेले दिसत नाही?**

आज मी देशाचा मंत्री असलो तरी मी महाराष्ट्राचा असल्याचा मला अभिमान आहे. १९९५-९९ दरम्यान मी महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम केले आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र माझ्या डोळ्यापुढे आहे. केंद्राच्या मंत्रालयांद्वारे महाराष्ट्रात कामे झाली पाहिजे, असे मला वाटते. त्यामुळे महाराष्ट्रात यापूर्वी कधीही झाली नाहीत इतकी कामे माझ्या मंत्रालयाच्या माध्यमातून हाती घेतली आहेत. विदर्भ, खानदेश, मराठवाडा, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, कोकण अशा सर्वच भागांमध्ये माझ्या मंत्रालयाच्या माध्यमातून कामे सुरू आहेत. आजच्या घडीला राज्यात १ लाख कोटींची कामे सुरू आहेत.

**नागपूर लोकसभा मतदारसंघातील कामांची काय स्थिती?**

नागपूर शहर आणि जिल्ह्यात सध्या २४ हजार कोटींची कामे सुरू

आहेत, तर ५८ हजार ३५५ कोटींची कामे प्रस्तावित आहेत. ८७२५ कोटींच्या कामांची कंत्राटे देण्यात आली आहेत. नागपूर-विदर्भ क्षेत्रातील पर्यटन विकास योजनेखाली सी-प्लेनचा विस्तृत आराखडा महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाकडे सादर करण्यात आला असून त्याला लवकरच मंजुरी मिळेल.

### महाराष्ट्राला कशाप्रकारे रेल्वे फाटकमुक्त करणार आहात?

रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्रासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला असून त्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्य सरकारसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार राज्य मार्गावरील भूसंपादन आणि अन्य सुविधांवरील खर्च राज्य सरकार करेल. रेल्वे ओव्हरब्रिजच्या बांधकामासाठी केंद्रीय मार्ग निधीतून ५० टक्के केंद्र सरकार आणि ५० टक्के खर्च रेल्वे करेल. राष्ट्रीय महामार्गावरील रेल्वे ओव्हरब्रिजसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण शंभर टक्के खर्च करेल. पहिल्या टप्प्यात २३६ रेल्वे ओव्हरब्रिज बांधण्यात येत असून या कामासाठी केंद्रीय मार्ग निधीतून १०० कोटींची व्यवस्था करण्यात आली आहे.

### जलवाहतुकीच्या आघाडीवर महाराष्ट्राच्या वाट्याला काय?

जहाजबांधणी मंत्रालयाच्या माध्यमातून जेएनपीटी आणि मुंबईतील बंदरांच्या विकासाची कामे तेवढ्याच वेगाने सुरू आहेत. सागरमाला योजनेंतर्गत राज्यातील १२ जेटीज्ना मंजुरी देण्यात आली असून त्यासाठी २४८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. नव्या राष्ट्रीय जलमार्ग योजनेंतर्गत राज्यातील अंबा, दाभोळची खाडी, रवींद्र खाडी, रेवांदा खाडी, सावित्री खाडी, शास्त्री नदी, जयगड, राजपुरी खाडी, वसई खाडी, कल्याण-ठाणे-मुंबई, अरुणावती, गोदावरी, मांजरा, नागनदी, पैनगंगा-वर्धा, वैनगंगा-प्राणहिता या नद्यांच्या कामांचे डीपीआर तयार करण्याचे काम तीन महिन्यांत पूर्ण होईल.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाऊचा धक्का येथील अद्ययावत जेट्टीच्या कामाचा शुभारंभ करताना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग, जलवाहतूक मंत्री नितीन गडकरी. सोबत खासदार अरविंद सावंत व इतर मान्यवर.

### महाडमधील पूल वाहून जाण्याची दु:खद घटनाही यादरम्यान घडली...

सावित्री नदीवरील पूल कोसळला त्याचे मला अतीव दु:ख झाले. हा पूल कोसळल्याची जबाबदारी मी स्वीकारली आणि तो सहा महिन्यांच्या आत नव्याने बांधून पूर्ण करणार असे मी जाहीर केले. येत्या ४ जून रोजी या पुलाचे उद्घाटन होत असून मला आपला शब्द पाळता आला याचे समाधान वाटत आहे.

### रस्तेबांधणीत धार्मिक पर्यटनालाही महत्त्व देत आहात का?

देशातील आणि राज्यातील धार्मिक स्थळांकडे जाणारे रस्ते चांगले असावेत, या भावनेतून बहुतांश धार्मिक स्थळांना उत्तम रस्त्यांनी जोडले जावे असे मला वाटते. अवघ्या महाराष्ट्राची आस्था असलेल्या विठ्ठलाच्या वारीच्या दोन्ही पालखी मार्गांचे काम हाती घेताना मला विशेष आनंद वाटतो. आळंदी-पुणे-फलटण-पंढरपूर या २७० किमीच्या ज्ञानेश्वर पालखी मार्गाचे ३१०० कोटींच्या तसेच पाटस-वासुंदे-बारामती-इंदापूर-अकलूज-बोंडाले या १७४ किमीच्या संत तुकाराम पालखी मार्गाचे २०२५ कोटींच्या कामांचा डीपीआर अंतिम टप्प्यात आला असून त्याच्या निविदा दोन महिन्यात निघतील. पालखीसोबत पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा आणि सुरक्षा प्रदान करण्यासाठी उत्तम तंत्रज्ञानाचा वापर झाला पाहिजे, संतांच्या प्रतिमा, ठिकठिकाणी एलईडी स्क्रीनवर अभंगवाणी आणि सौंदर्यीकरणासह पालखी मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम दोन वर्षात पूर्ण करण्याचा मानस आहे. हा संपूर्ण काँक्रिटचा मार्ग असल्यामुळे वारकऱ्यांच्या पायांना चटके बसू नये म्हणून त्यावर खास 'बीटुमन' तंत्रज्ञान वापरण्यात येईल. आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर या कामांचे भूमिपूजन करण्याचा प्रयत्न आहे. याशिवाय शिर्डी ते सिन्नर, माहूरचे रेणुकादेवी संस्थान ते दत्त शिखरपर्यंत सिमेंटचा रस्ता आणि माहूर-धानोडा रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध झाला आहे. येथे रोप वे करण्याचा प्रस्तावही अंतिम टप्प्यात आहे. नांदेडच्या गुरुद्वारासाठी नांदेड-बिदर, नांदेड-देगलूर, नांदेड-उदगीर हे सर्व राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आले आहेत. नांदेडकडे जाणारे बहुतांश रस्ते आता राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आले आहेत.

### राज्यातील इतर महत्त्वाच्या प्रकल्पांची काय स्थिती आहे...

मुंबई-गोवा सागरी महामार्ग, रेवस पोर्ट-जयगड ते अरुंडा किरणापणी-वेंगुर्ला या ५४० किमी आणि १० हजार ३४१ कोटींच्या कोस्टल रोडचा डीपीआर करण्यास मंजुरी मिळाली आहे. गोवा महामार्गाला समांतर आणि डहाणू-वसई-अलिबाग-श्रीवर्धन-दाभोळ-गणपतीपुळे-रत्नागिरी-देवगड-मालवण-वेंगुर्ला हा समुद्रकिनाऱ्यालगत जाणारा सागरी महामार्ग कोकणातील पर्यटन

## महाराष्ट्रातील कोणत्या प्रकल्पांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.



पंढरपूरचे पालखी मार्ग, महाडच्या सावित्री नदीवरील नवा पूल, मुंबई-गोवा महामार्ग, बुटीबोरी-तुळजापूर महामार्ग, नाशिक-पुणे महामार्ग ही महाराष्ट्रातील कामे माझ्यासाठी विशेष महत्त्वाची ठरली आहेत. बुटीबोरी ते तुळजापूर या ७ हजार २६३ कोटींच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील पाच, तर मुंबई-गोवा या ११ हजार ७४७ कोटींच्या प्रकल्पातील आठ कार्यादेश काढण्यात आले आहेत. मुंबई-गोवा संपूर्ण मार्ग हरित महामार्ग म्हणून विकसित करण्यात येणार आहे. औरंगाबाद-तेलवाडी रस्त्याच्या निविदा निघाल्या असून लवकरच कामाला सुरुवात होईल. महाराष्ट्रातील ११ किमी लांबीचा सर्वात मोठा औतरमघाट बोगदा या रस्त्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. २०१६-१७ मध्ये माझ्या मंत्रालयाचे महाराष्ट्रातील लक्ष्य पूर्ण झाले असून एकूण ३६९८ किमीचे कार्यादेश देण्यात आले आहेत. २०१७-१८ मध्ये राज्यात ३३२५ किमीचे नवे राष्ट्रीय महामार्ग घोषित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यालाही लवकरच मंजुरी मिळणार आहे. २०१७-१८ मध्ये महाराष्ट्रातील रस्तेबांधणीच्या एकूण ५४ हजार कोटींच्या वार्षिक योजनेला मंत्रालयाने तत्त्वतः मंजुरी दिली असून त्यापैकी पहिल्या टप्प्यातील २५ हजार कोटींच्या वार्षिक योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. केंद्रीय मार्ग निधीअंतर्गत महाराष्ट्रातील रस्त्यांच्या कामांसाठी ५६६८ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

विकासातील मैलाचा दगड ठरेल. या कामाची निविदा लवकरच निघेल. नाशिक-पुणे रस्त्याचे काम पूर्ण झाले असून फक्त पाच बायपासची कामे शिल्लक आहेत. या रस्त्यामुळे नाशिक-पुणे अंतर आठ तासांऐवजी चार तासात पूर्ण होईल. कोल्हापूर-सांगली-सोलापूर हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचे पण डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्टचे काम सुरू आहे. राज्यात ज्या ठिकाणी बायपास करण्यात आले आहेत अशा शहरांतून जाणाऱ्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी ११ हजार ७६५ कोटींच्या कामांचे विस्तृत प्रकल्प अहवाल सध्या तयार करण्यात येत आहेत. तीन महिन्यांत त्यांचे कार्यादेश काढले जातील.

### कान्होजी आंग्रे बेटाच्या विकासाबाबत काय सांगाल?

रायगड जिल्ह्यातील अलिबागमधील मासेमारीसाठी प्रसिद्ध असलेल्या थाल गावापाशी ब्रिटिश आणि पोर्तुगीजांना शह देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा लष्करासाठी बांधलेल्या या किल्ल्यावर १८५२ साली ब्रिटिशांनी लाइटहाऊस विकसित केले.

मुंबईच्या दक्षिण किनाऱ्यावर असलेले हे लाइटहाऊस मुंबईत दाखल होणाऱ्या किंवा मुंबईतून बाहेर पडणाऱ्या जहाजांसाठी प्रवेशद्वाराचे काम करते. थाल किंवा मांडव्यापासून तसेच गेटवे ऑफ इंडियापासून थेट स्पीड बोटींनी हे बेट गाठता येते. १८ एकर क्षेत्रात पसरलेल्या या दगडांच्या बेटावर पडक्या किल्ल्याव्यतिरिक्त काही लहान मंदिरे आणि अरेबियन समुद्राचे विहंगम दृश्य बघता येईल, असे अनेक पॉईंटस् आहेत. या ठिकाणी प्रवासी जेटीचे बांधकाम आवश्यक आहे. बेटावर पोहोचण्यासाठी समुद्रातील पाण्याच्या पातळीवर अवलंबून राहण्याचे टाळण्यासाठी दीडशे मीटर लांबीचा आणि ४ मीटर रुंदीचा काँक्रिटचा प्रवासी जेटी किंवा धक्का १५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत आहे. कॅम्पिंग साइट आणि स्वीस कॉटेजसाठी ही उत्तम जागा आहे. या ठिकाणी लँडस्केपिंग करावे लागेल. गाईडेड टूर आणि हेरिटेज वॉक, लाईट अॅण्ड साऊंड शो, कॅफ्टेरिया, अॅम्फीथिएटर, जलक्रीडा, गेटवे आणि फेरी व्हार्फपासून फेरी सेवा आदींची सोय करावी लागेल. ट्रॅव्हल ऑपरेटर या सर्व सुविधांचा विकास करेल.

### आपण दिल्लीतील महाराष्ट्राचे अॅम्बॅसेडर आहात?

माझ्या मंत्रालयाव्यतिरिक्त अन्य मंत्रालयांकडे महाराष्ट्राची विकास कामे अडू नये म्हणून मी राज्याचा दूत म्हणून विविध मंत्रालयांकडे दिल्लीत समन्वयाचे काम करीत असतो. नागपूर आणि पुणे मेट्रो, पुणे विमानतळ, पुण्याचा रिंग रोड, नागपुरातील एम्स, आयआयआयटी आदींची कामे दिल्लीत असल्यामुळे मार्गी लावण्यात मला यश मिळाले. मी आणि देवेंद्र फडणवीस नागपूरचे आहोत असे वाटू नये म्हणून आम्ही मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद आणि अन्य शहरांच्या तसेच महाराष्ट्राच्या सर्व भागांच्या विकासासाठी त्याच ताकदीने काम करीत आहोत.

**– सुनील चावके**
नवी दिल्ली.

# आपल्या योजना, आपली प्रगती

### प्रधानमंत्री जन-धन योजना (PMJDY)

प्रारंभ : २८ ऑगस्ट २०१४

प्रधानमंत्री जन धन योजनेंतर्गत, १० वर्षे पुढील वयाची कोणतीही व्यक्ती एकही रुपया न भरता बँकेमध्ये खाते उघडू शकते.

संकेतस्थळ: http://www.pmjdy.gov.in

### प्रधानमंत्री सुकन्या समृद्धी योजना (PMSSY)

प्रारंभ : २२ जानेवारी २०१५

मुलीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठीची ही योजना आहे. या योजनेंतर्गत, एक बचत खाते मुलीच्या नावाने उघडले जाऊ शकते आणि ठेवी १४ वर्षे ठेवल्या जाऊ शकतात. मुलीचे वय १८ वर्षे झाल्यानंतर तिचे लग्न किंवा उच्च शिक्षणासाठी ५० टक्के रक्कम काढता येते. मुलीने वयाची २१ वर्षे पूर्ण केल्यावर, संपूर्ण रक्कम काढता येते. प्रत्येक वर्षी १.५ लाख रुपये कमाल गुंतवणूक करता येते. किमान ठेव १००० रुपये आहे. एकापेक्षा अधिक मुलींच्या बाबतीत आई-वडील वेगवेगळे खाते उघडू शकतात. ही योजना फक्त २ मुलींसाठीच आहे.

संकेतस्थळ: http://www.nsiindia.gov.in

### प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY)

प्रारंभ : ८ एप्रिल २०१५

लघु उद्योगासाठी बँकेकडून ५० हजार ते १० लाख रुपयांपर्यंत तत्काळ कर्ज मिळते.

संकेतस्थळ: http://www.mudra.org.in

### प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY)

प्रारंभ : ९ मे २०१५

१८-५० वर्षे वयोगटातील व्यक्तीने वर्षाला ३३० रुपये विमा हप्ता भरल्यास २ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळते. विमा संरक्षण कालावधी : १ जून ते ३१ मे.

**प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना :** १८-७० वर्षे वयोगटातील व्यक्ती १२ रुपये वार्षिक विमा हप्ता भरून २ लाख रुपयांचा अपघात विमा संरक्षण मिळवण्यास पात्र होतो. अपघातात कायमचे अपंगत्व आल्यावरही विम्याची रक्कम मिळते. कालावधी : १ जून ते ३१ मे.

**अटल पेन्शन योजना :** या योजनेत आपल्या गुंतवणुकीप्रमाणे महिन्याला १ ते ५ हजार रुपये निवृत्तीवेतन मिळते. असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी ही योजना आहे. वयाच्या ६० वर्षांनंतर पेन्शन लागू होते. उदा. १८ वर्षाच्या ग्राहकाने महिन्याला ४२ रुपये हप्ता भरल्यास त्याला १००० रुपये महिना पेन्शन मिळेल.

संकेतस्थळ: http://www.jansuraksha.gov.in

### प्रधानमंत्री आवास योजना (PMAY)

प्रारंभ : २५ जून २०१५

या योजनेंतर्गत २०२२ पर्यंत सर्वांना घरे बांधून दिले जातील. शहरी भागात २ कोटी आणि ग्रामीण भागात ३ कोटी घरे बांधण्यात येतील. संकेतस्थळ: http://mhupa.gov.in

### प्रधानमंत्री फसल विमा योजना (PMFBY)

प्रारंभ : १३ जानेवारी २०१६

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना रब्बी आणि खरीप पिकांसाठी विमा संरक्षण आणि आर्थिक मदत पुरवली जाईल.

संकेतस्थळ: http://agricoop.nic.in

### प्रधानमंत्री ग्राम सिंचाई योजना (PMGSY)

प्रारंभ : ०१ जुलै २०१५

या योजनेचा उद्देश क्षेत्रीय स्तरावर सिंचन प्रणालीमध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आहे. देशात शेती उपयोगी जमीन तयार करणे, पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी, शेतात पाण्याचा वापर कमी करणे, पाणी बचत तंत्रज्ञान आणि सिंचन लागू करून पीक उत्पादन वाढवणे, हे मुख्य उद्देश आहेत.

संकेतस्थळ: http://agricoop.nic.in

### प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना (PMGKY)

प्रारंभ : डिसेंबर २०१६

गरिबांसाठी असलेल्या विविध योजना अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी आणि देशातील अधिकाधिक गरीब लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

संकेतस्थळ: http://niti.gov.in





सुरेश प्रभू
केंद्रीय रेल्वे मंत्री

# रेल्वे सुपरफास्ट

केवळ निधी किंवा जादा गाड्यांच्या टाळ्याखाऊ घोषणा करण्यात केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांना स्वारस्य नाही. वर्षानुवर्षे राज्यातील जे रेल्वे प्रकल्प अडखळले आहेत. त्यांना गती देण्याकडे त्यांचा कल आहे. रेल्वेबाबत महाराष्ट्राला गेली अनेक वर्षे न्याय मिळाला नव्हता. तो देण्याचा ते प्रयत्न करत आहेत. रेल्वे मंत्रालयात मुंबईसह महाराष्ट्रासाठी स्वातंत्र्योत्तर काळात १ लाख ३७ हजार कोटींची तरतूद प्रथमच केली गेली.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रासाठी कधीही मिळाली नव्हती एवढी तरतूद करणारे केंद्र सरकारमधील एक ठळक खाते म्हणजे रेल्वे. यापूर्वी मधू दंडवतेंचा अपवाद वगळला तर महाराष्ट्राला रेल्वेकडून कायम सापत्नभावाची वागणूक मिळाल्याचे दिसते. मात्र २०१४-१५ नंतर त्यातही सुरेश प्रभू याच्याकडे रेल्वेची सूत्रे गेल्यानंतर  हे चित्र झपाट्याने बदलले.

२०१४ ते २०१६ या काळात रेल्वेने आपल्या राज्यासाठी दरवर्षी ३५८६.७ कोटी इतक्या घसघशीत निधीची तरतूद केली. २००९ ते २०१४ या पाच वर्षांतील राज्यासाठीची तरतूद  होती ११७१ कोटींची... म्हणजे श्री. प्रभू यांच्याकडे रेल्वे मंत्रालयाची सूत्रे आल्यानंतर राज्याचा वाटा तब्बल २०६ टक्क्यांनी वाढला. यंदा म्हणजेच २०१७-१८ मध्ये तर राज्यासाठी रेल्वेने सुमारे ६००० कोटींची तरतूद केली आहे. यूपीएच्या काळातील तरतुदीच्या ही तब्बल ४०६ पटींनी जास्त आहे. राज्यातील सध्याच्या कामांवर रेल्वे ५२ हजार ६१४ कोटींचा निधी खर्च करत आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पातील रेल्वेविषयक तरतुदी धरल्यास ही रक्कम होते १ लाख ३७ हजार ६५१ कोटी.... राज्यासाठी स्वप्नवत वाटावी अशी ही निधीची तरतूद आहे.

### प्रकल्प मार्गी लागले

राज्यातील नगर-बीड-परळी, गडचिरोली-वाडसा, बारामती-लोणंद, वर्धा गडचिरोली, वर्धा-नांदेड, गोंदीया-जबलपूर, वर्धा-बल्लारशाह, वर्धा-नागपूर, कराड-चिपळूण, दिघी बंदर-चिपळूण या

१० मार्गांची कामे प्रत्यक्षात सुरू झाली आहेत. भुसावळ-जळगाव, कल्याण-सारा, मुदखेड-परभणी, दौंड-गुलबर्गा, पेण-रोहा, वर्धा-नागपूर व राजनांदगाव-नागपूर (तिसरी लाइन), पुणे-लोणावळा, पुणे-मिरज-लोंढा आदी २१ मार्गांच्या दुपदरीकरणाचे काम सुरू आहे. यंदाच्या रेल्वे अर्थसंकल्पात मंजुरी मिळालेल्या ३१ हजार ८८१.९६ कोटींच्या नव्या योजनांत वैभववाडी-कोल्हापूर, इटारसी नागपूर, पुणे-नाशिक, राहुरी-शनीशिंगणापूर, कराड-चिपळूण या १६ रेल्वेमार्गांचा समावेश आहे. २१४९.६५ कोटींचा खर्च करून पुणे-कोल्हापूर दौंड-बारामती, मिरज-कुर्डुवाडी-लातूर, धुळे-चाळीसगाव व झाशी-उरणसह ९ लोहमार्गांचे विद्युतीकरण करण्यात येत आहे. खासगी-सरकारी भागीदारी तत्वावर (पीपीपी) ज्या तीन मार्गाचे काम सुरू आहे. त्यात दिघी-जयगड, रोहा-दिघी व हरापूर-रेवास या चार बंदरांना जोडणाऱ्या लोहमार्गाच्या कामांचा समावेश आहे. गाजावाजा न होता राज्याला तब्बल २८ नव्या गाड्या २०१४-१७ या कालावधीत मिळाल्या आहेत. यात वांद्रा-अमृतसर, हावडा-पुणे, मुंबई-गोरखपूर, पुणे-गोरखपूर, पुणे-लखनौ, सोलापूर-विजापूर मुंबई-जम्मू वी स्वराज एक्सप्रेस, पुणे-इंदौर एक्सप्रेस या साप्ताहिक-द्विसाप्ताहिक गाड्यांचा समावेश आहे. ठिकठिकाणच्या प्रवाशांच्या मागण्या लक्षात घेऊन राज्यात ८२ नवे थांबे देण्यात आले आहेत. याशिवाय ३ स्थानकांवर वायफाय सुविधा, ३८ एस्केलेटर, १४ लिफ्ट आदींचेही काम मार्गी लागले आहेत. विनाफाटक क्रासिंग हे नागरिकांसाठी मृत्यूगोलच ठरतात. गेल्या तीन वर्षांत राज्यातील अशा १८२ क्रॉसिंग्जच्या ठिकाणी उड्डाणपूल किंवा भुयारी मार्गांचे काम झाले आहे.

## स्वच्छतेला प्राधान्य

रेल्वेगाड्या व स्थानकांतील स्वच्छता हा कायम चर्चेचा विषय असतो. रेल्वेने राज्यात ४४०३ बायो स्वच्छतागृहे, ५४ नवी स्वच्छतागृहे व पे अॅण्ड यूज तत्त्वावर ५४ स्वच्छतागृहे सुरू केली आहेत. स्वच्छ रेल 'स्वच्छ भारत व हमारा स्टेशन हमारी शान' या योजनेत स्वयंसेवी संस्थाच्या साहाय्याने मुंबई परिसरातील ३६ स्थानके चकाचक करण्यात आली आहेत.

## नवे मार्ग, नव्या सुविधा

मुंबई-उपनगरासाठी रेल्वेने तब्बल ५१ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू केले आहेत. एमयूटीपी-तीन योजनेंतर्गत विरार-डहाणू, पनवेल-कर्जत, बोरिवली-कळवा हे मार्ग, वांद्रा-विरार तसेच विरार-वसई-पनवेल दरम्यान नवा उपनगरी रेल्वे कॅरिडॉर छत्रपती शिवाजी टर्मिनसपासून पनवेलपर्यंत वेगवान उन्नत कॅरिडोर, या कामांचा यात समावेश आहे. याशिवाय उपनगरी मार्गांवरील १६० फलाटांची उंची वाढवणे, गेल्या अडीच वर्षांत विविध स्थानकांवर कार्यरत झालेल्या ३७ एक्सेलेटरच्या जोडीलाच आणखी ६५ नवे एक्सेलेटर्स बसवणे, ४२ नवे फूटओव्हर पूल, ५४ लिफ्ट आदी अनेक योजनांचा यात समावेश आहे. १५ स्थानाकंवर आपत्कालीन आरोग्य कक्ष, सर्व स्थानकांवर उपलब्ध असतील अशा १०८ रुग्णवाहिकाही सुरू करण्यात आल्या आहेत. १३ स्थानकांवर नवी बुकिंग कार्यालये, १९ स्थानकांवर तिकीट आरक्षण सेवक, ३७ ठिकाणी प्रवासी तिकीट सेवा केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. हार्बर लाईनवरील ५९० फलाटांची उंची वाढवल्यावर या सर्व ठिकाणी ९ ऐवजी १२ डब्यांच्या लोकल गाड्या सोडण्यास सुरुवात झाली आहे.



## हार्बरचा विस्तार

मुंबईसाठीच्या ठळक प्रस्तावित प्रकल्पांत हार्बर लाइनचा गोरेगावपर्यंत विस्तार, वातानुकूलित लोकलगाड्या सुरू करणे, अंधेरी, जोगेश्वरी व गोरेगाव स्थानकांच्या नव्या इमारती, ओशिवारा नवे स्थानक, ठाणे-कल्याण मार्गावरील दिवा स्थानकावर अतिरिक्त दोन फलाट, अतिरिक्त वाहतुकीने श्वास कोंडलेल्या ठाण्यातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी वसई स्थानकावर रो-रो मालवाहतूक सेवा हे काही ठळक प्रकल्प रेल्वेने हाती घेतले आहेत.

## लोकलला केले गतिमान

प्रभू सांगतात - मुंबई लोकलच्या समस्या मला जवळून माहिती आहेत. त्यामुळेच केवळ मुंबईसाठी ५५६ कोटींचे प्रकल्प प्रत्यक्ष सुरू झाले आहेत. गेल्या तीन वर्षांत राज्यातील १७ मार्गाचे दुपदरीकरण, ९३२ किलोमीटरचे १० नवे रेल्वेमार्ग (२४३०४ कोटींचा निधी), १०१४ किलोमीटरचे मार्ग ब्रॅडगेज करणे (निधी ५३११ कोटी) ही कामे प्रत्यक्ष सुरू आहेत. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर लोकप्रतिनिधी यांच्यासह विदर्भात बैठक घेऊन तेथील रेल्वे प्रकल्पांची प्रगती व त्या भागाच्या मागण्या याबाबत चर्चा करणार आहे. २०१७-१८ मध्ये १६ नव्या रेल्वेमार्गांचे काम सुरू होणार असून यासाठी ३२,८८२ कोटींचा निधी रेल्वेच्या अंदाजपत्रकात मंजूर करण्यात आला आहे.

**- मंगेश वैशंपायन**
नवी दिल्ली. संपर्क: ०९९५८३४८४३७



# दर्जात सुधार, गुणवत्तेत वाढ

केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्रालयाने उच्च शिक्षणामध्ये दर्जा सुधारण्यावर खूप मोठा भर दिला असून त्यामध्ये बरेच नवे उपक्रम सुरू केले आहेत. उच्च शिक्षणासाठी, आणि संशोधनासाठी चांगल्या प्रयोगशाळा, चांगल्या शैक्षणिक पायाभूत सुविधांची गरज आहे. नियमित अर्थसंकल्पातून ही कामे करणे शक्य नाही. त्यामुळे, 'उच्च शिक्षण वित्तसंस्था' काढण्यात आली. याद्वारे पुढच्या तीन वर्षात दर्जेदार संस्थांनी त्यांच्या पायाभूत सुविधा वाढाव्यात म्हणून प्रयत्न केले जातील. चांगल्या प्रयोगशाळा झाल्या तर प्रज्ञावान विद्यार्थी भारतात राहूनच अभ्यास आणि संशोधन करतील. परदेशी प्राध्यापकांना आमंत्रित करून त्यांनी एकेक अभ्यासक्रम शिकवावा अशी 'ग्यान' नावाची योजना सुरू केली आहे. या योजनेमध्ये दोनशे प्राध्यापक गेल्या वर्षी आले. यावर्षी सहाशे प्राध्यापक येणार आहेत. या योजनेद्वारे देशात शिक्षणाचा दर्जा सुधारण्यामध्ये खूप मदत होणार आहे.



**प्रकाश जावडेकर,** केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री

प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींसारख्या एका दूरदर्शी नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक मंत्रालयाचे काम, हे पूर्वीपेक्षा खूपच वेगळे, चांगले आणि जनहिताचे झाले आहे. आमच्या तीन वर्षाच्या कारकिर्दीचा हाच सगळयात मोठा निष्कर्ष आहे.

केंद्रातील शिक्षण खाते माझ्याकडे केवळ नऊ महिन्यापूर्वी जरी आले असले तरी गेल्या तीन वर्षात बरेच क्रांतिकारी बदल त्यात झाले आहेत. त्याचे कारण म्हणजे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना शिक्षणाविषयी आस्था आहे. शिक्षणाविषयीची दृष्टी त्यांच्याकडे आहे.

लोकांना खरी ताकद शिक्षणातून मिळते. म्हणून सरकारी शाळांचा दर्जा सुधारणे हा सगळयात प्राथमिक कार्यक्रम ठरला. आमच्या शिक्षण खात्याचा नारा आहे- 'सबको शिक्षा, अच्छी शिक्षा'. गरिबांना सुद्धा चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. एकंदर तेरा कोटी मुले सरकारी शाळांमधून शिकतात. त्या शाळांमधले शिक्षण सुधारणे, हे आमच्यापुढचे सर्वात मोठे आव्हान आहे.

त्यासाठी मग सर्वप्रथम आम्ही 'लर्निंग आऊटकम्स' तयार केले. कारण शिक्षण अधिकाराचा कायदा झाल्यापासून पहिल्या इयत्तेपासून आठवीपर्यंत एका अर्थाने परीक्षा बंद झाल्या. विद्यार्थी नापास होतच नाहीत आणि सरळ पुढच्या वर्गात जातात, अशी स्थिती निर्माण झाली. अनेक राज्यांमध्ये अनेक शाळा ह्या- 'या, खा आणि जा!' अशा झाल्या. या शाळा म्हणजे निव्वळ 'मिड डे मील' स्कूल झाल्या. केवळ मध्यान्ह भोजन शाळा! आणि म्हणून आपल्या हे लक्षात येते की, सहावीच्या विद्यार्थ्याला दुसरीचे गणित सोडवता येत नाही आणि सातवीच्या मुलाला तिसरीचा पाठ वाचता येत नाही. या स्थितीत सुधारणा करण्यासाठी प्रत्येक इयत्तेत विद्यार्थ्याला काय आले पाहिजे- म्हणजे गणितामध्ये, भाषेमध्ये किंवा इतर विषयांमध्ये याची बेंचमार्कस तयार केली, त्याची नेमकी आखणी केली. याला लर्निंग आऊटकम्स म्हणतात.

## क्रांतिकारी कार्य

हे काम गेल्या दहा वर्षात झाले नव्हते. या वर्षापासून प्रत्येक पालकाला, आपल्या पाल्याला त्याच्या वर्गात काय आले पाहिजे, हे कळणार आहे.

दुसरा बदल आम्ही जो केला तो म्हणजे शिक्षकांच्या प्रशिक्षणाला पूर्णतः नवे स्वरूप देणे. जे अप्रशिक्षित शिक्षक आहेत त्यांना दोन वर्षात प्रशिक्षण घ्यावेच लागेल. त्यानंतर प्रत्येक शिक्षकाला दर तीन वर्षांनी दोन-तीन आठवड्याचे प्रशिक्षण. मूळ बी.एड आणि डी.एड कॉलेजमधले सगळा कोर्स कंटेट बदलला जाईल. काही कॉलेजांमधून त्यात जो खोटेपणा व्हायचा तो आम्ही बंद करणार आहोत. बी.एड आणि डी.एड कोर्सचा प्रत्येक विद्यार्थी आता सरकारी शाळांवर पाठ

घेईल. सरकारी शाळेचे शिक्षकही त्याचे निरीक्षक असतील. तसेच मुलांकडूनही आम्ही फीडबॅक घेणार आहोत.

तिसरा मोठा बदल जो आम्ही केला तो म्हणजे- अनेक राज्यांची मागणी होती की पाचवी आणि आठवीला परीक्षा घेऊन जर मुले नापास झाली तर आणि ती त्या क्षमतेची नसतील तर त्यांना थांबवण्याची परवानगी द्या. तसा बदल आम्ही शिक्षण अधिकार कायद्यात केला. ज्या पंचवीस राज्याची तशी मागणी होती त्यांना मार्चमध्ये मुलगा नापास झाला तर जूनमध्ये त्याची दुसरी परीक्षा होईल आणि तो नापास झाला तर त्याला थांबवण्याची सोय ठेवली आहे. म्हणजे नववीला जाऊन मुले ड्रॅपआऊट होण्याच्या ऐवजी मध्ये एकदा चाळणी लागेल. पुन्हा त्यातून मुले अभ्यासाला लागतील, हा त्याचा मुख्य फायदा होईल. यात पालकांची, शाळांची आणि शिक्षक तसेच विद्यार्थ्यांची सगळ्यांची नेमकी जबाबदारी यामध्ये ठरेल. दहावीची बोर्ड परीक्षा आम्ही सुरू केली. त्यामुळे सगळ्या स्टेट बोर्डाच्या होतात त्याप्रमाणे सीबीएसइचीही आता बोर्ड एक्झाम होईल. आम्ही ५० नवी केंद्रीय विद्यालये सुरू केली. केवळ तीन वर्षात केंद्रीय विद्यालयांची संख्या दहा टक्के वाढवली. ६२ नवी नवोदय विद्यालये काढली. २५ लाख मुले पाचवीच्या परीक्षेला बसतात आणि त्यातील ४० हजारांना पुढे प्रवेश मिळतो. आता या ६२ विद्यालयांमुळे आणखी जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतील. या चार महत्त्वाच्या सुधारणा आम्ही शालेय शिक्षणात केल्या.

## स्टार्टअप्स्ला प्राधान्य




विद्यार्थ्यांनी स्वत: उद्योग सुरू करावेत- म्हणजे स्टार्टअपस् द्वारे चांगल्या कल्पना आकाराला आणाव्यात. यासाठी आम्ही मोठी हॅकॅथॉन स्पर्धा घेतली. यात २१०० अभियांत्रिकी महाविद्यालयांचे ४२ हजार विद्यार्थी सामील झाले. त्यांनी तीन महिने कसून अभ्यास केला. एक प्रयोग म्हणून त्यांना ६०० समस्या दिल्या होत्या. यातील निवडलेल्या समस्येवर सात जणांच्या टीमने- अशा सात हजार टीम होत्या, त्यांनी एकत्रित अभ्यास करून समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यातल्या शेवटच्या दहा विद्यार्थ्यांच्या टीम १ आणि २ एप्रिलला थांबल्या. त्यांनी सलग ३६ तास काम करून अनेक सोल्युशन्स काढली. ही फार महत्त्वाकांक्षी योजना होती. यामुळे जनतेची खूप मोठी सोय होणार आहे. स्वत: प्रधानमंत्र्यांनी यामध्ये उत्साहाने भाग घेऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

### मोठे बदल

पहिला बदल म्हणजे उच्च शिक्षणाचा विस्तार केला. सात नव्या इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट- सिरमौर, नागपूर, सम्बलपूर अमृतसर, जम्मू, बोधगया आणि विशाखापट्टनम येथे सुरू केल्या. सहा नव्या आयआयटी सुरू केल्या. एक नवे आयआयआयटी सुरू केले. दोन नव्या विज्ञान संशोधन संस्था सुरू केल्या. मोतिहारी येथे एक केंद्रीय विद्यापीठ आम्ही सुरू केले.

### शिष्यवृत्तीत वाढ


शिष्यवृत्तींमध्ये खूप वाढ केली. तीन लाख सत्तर हजार शाळेतील मुलांना मेरिटप्रमाणे दरमहा पाचशे रुपये प्रमाणे स्कॉलरशिप दिली जाते. कॉलेजमधल्या तीन लाख तीस हजार मुलांना तीन वर्षांसाठी दरवर्षी दहा हजार रुपये अशी स्कॉलरशिप दिली जाते. दोन लाख दहा हजार विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाची फेलाशिप मिळते. ४१ हजार मुलांना गेटस् स्कॉलरशिप मिळते. नॅशनल स्कीम ऑफ इंन्सेंटिव्ह फॉर गर्ल्स स्टूडंट या योजनेंतर्गत नऊ लाख पासष्ट हजार मुलींना तीन हजार रुपये स्कॉलरशिप मिळते. माध्यमिक शिक्षणामध्ये मुलींचा सहभाग वाढावा म्हणून जवळ-जवळ दहा लाख मुलींना आम्ही स्कॉलरशिप देतो. जम्मू-काश्मीरमधील पाच हजार विद्यार्थ्यांना चांगले तंत्रशिक्षण आणि चांगले कोर्सेस मिळावेत म्हणून ज्यादा प्रवेश क्षमता वाढवून त्यांना आम्ही स्कॉलरशिप दिल्या आहेत. विद्यार्थ्यांचे राहणे आणि खाणे त्याठिकाणी होते. उद्योग जगताने आपल्याला हव्या असणाऱ्या उत्पादनाची मागणी करावी आणि ती केल्यावर विद्यापीठामध्ये त्यावर काम व्हावे यावर आमच्या टीम काम करत आहेत. त्यामुळे उच्चशिक्षित असूनही नोकरी नाही आणि उद्योगांची गरज असताना हवे तसे मनुष्यबळ नाही यातील विरोधाभास दूर होईल. पदवी आणि मार्कशीटमध्ये घोटाळे होऊ नयेत आणि लगेच मिळाव्यात म्हणून डिजिटायझेशन प्रोसेस करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. आम्ही नॅशनल डिजिटल लायब्ररी काढली- ज्यामध्ये पासष्ट लाख पुस्तके आपल्याला संगणकावर उपलब्ध होतात. सहाशेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना होस्टेलमधून स्टार्टअप सुरू करण्याची परवानगी दिली. मुक्त शिक्षणासाठी स्वयंम्- म्हणजे एटीएमसारखे- जसे एटीएममधून कुठेही पैसे काढता येते तसेच स्वयंम्द्वारे कुठेही शिक्षण घेता येईल, अशी ही योजना सुरू केली आहे. हा एक नवा प्रयोग आहे. तो यशस्वी होईल, याची मला खात्री वाटते.

**शब्दांकन : गणेश रामदासी**
उपसंचालक (माहिती), व विशेष कार्यकारी अधिकारी,
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली.



# उद्योगात आघाडी

केंद्रातील अवजड उद्योग विभाग हा महत्त्वाचा विभाग असून 'मेक इन इंडिया' या उपक्रमात तो अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. गुंतवणूकदारांनी प्रचंड प्रतिसाद दिल्यामुळे कधीकाळी स्वप्नवत वाटणाऱ्या बीएमडबल्यू, फॉक्सवॅगन, मर्सिडिझसारख्या गाड्या आता आपल्या देशात निर्मित होत आहेत. केंद्र सरकारच्या या अवजड उद्योग खात्याच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांच्या काळात महाराष्ट्राच्या वाट्याला आलेल्या विकास कामांविषयी सांगताहेत या खात्याचे मंत्री अनंत गिते...



अनंत गिते
केंद्रीय अवजड उद्योगमंत्री

प्रदूषणरहित व किफायती असा हायब्रीड आणि इलेक्ट्रॉनिक गाड्यांमुळे प्रदूषणाचा भस्मासुर कमी होऊन, वाहतुकीच्या व्यवस्थेत नवा अध्याय जोडला जात आहे. अल्ट्रा रिसर्च टर्बाइनच्या माध्यमातून आशिया खंडात पहिल्यांदाच टर्बाइन बनवण्याच्या दृष्टीने संशोधन केले जात आहे. त्याचबरोबर देशात पहिल्यांदाच नॅशनल गुड्स पॉलिसीच्या माध्यमातून नवे पाऊल टाकले जात आहे. त्यामुळेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे 'सबका साथ, सबका विकास' हे ब्रीद पूर्ण करण्यासाठी 'मेक इन इंडिया'च्या अभिनव उपक्रमात महत्त्वाची भूमिका बजावताना अवजड उद्योग खात्याने कात टाकली आहे.

नरेंद्र मोदीजींचे सरकार सत्तेवर आल्यानंतर अवजड उद्योग हे खाते माझ्याकडे देण्यात आले. तसा या खात्याचा आणि महाराष्ट्राचा जुना ऋणानुबंध आहे. प्रधानमंत्र्यांचे स्पष्ट धोरण व मेहनत घेण्याची माझी तयारी यामुळे या खात्याने गेल्या तीन वर्षांत अनेक मैलाचे दगड गाठले आहेत. 'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याचा महत्त्वाकांक्षी मनसुबा प्रधानमंत्र्यांनी आखला. तो अवजड उद्योगासाठी पूरक ठरला. विशेषतः ऑटोमोबाइल्सच्या क्षेत्रात आमुलाग्र बदल झाले. कधीकाळी विदेशात बनणाऱ्या मर्सिडिझ, बीएमडबल्यू, फोक्सवॅगनसारख्या कंपन्यांच्या गाड्या आपल्याकडे बनतील हे स्वप्न पाहिले जायचे. आता हे स्वप्न सत्यात उतरले आहे. पुणे आता ऑटोमोबाइल्सच्या बाबतीत क्रांतिभूमी ठरताना दिसत आहे.

### महत्त्वाचे निर्णय

भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल)च्या माध्यमातून अशियातील अल्ट्रा टर्बाइनच्या क्षेत्रात पहिल्यांदाच संशोधनाचे पाऊल पुढे पडले आहे. त्यावर १५५५ कोटी खर्च अपेक्षित आहे. ६६० मेगावॅट वीजनिर्मिती अपेक्षित आहे. ती झाल्यास भविष्यात असे छोटे मोठे अल्ट्रा टर्बाइन उभारले जातील. विजेच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरेल.

### नॅशनल गुड्स पॉलिसी

देशात पहिल्यांदाच नॅशनल गुड्स पॉलिसी ठरवण्यात आली. या क्षेत्राला तसेच कॅपिटल गुड्स, मशीन टूल इंडस्ट्रीज, टेक्सटाइल्स या क्षेत्राला स्वतःची अशी काहीच पॉलिसी नव्हती. ही नीती पहिल्यांदा तयार करण्यात आली. २०२५ पर्यंत या क्षेत्रावर तीन हजार कोटी रुपये



खर्च करण्यात येणार आहेत. त्या त्या क्षेत्रातील उद्योगांची उन्नती करणे हा यामागचा उद्देश आहे. त्यासाठी योग्य वातावरणनिर्मिती करण्याचा मानस आहे. चाकण आणि सुरतमध्ये मशिन टूल इंडस्ट्रीजच्या कामाचे भूमिपूजनही झाले आहे. कॉमन फॅसिलिटी सेंटरचेही भूमिपूजन झाले. देशातील कोलकता, चेन्नई, बेंगळुरू या महत्त्वाच्या शहरांमध्येही तेथील स्थानिक उद्योगांना चालना मिळावी, यासाठी या धोरणांतर्गत काम सुरू आहे. त्यामुळे बेंगळुरुसारख्या आयटी हब असलेल्या शहरातील या आयटी उद्योगाला या धोरणामुळे अधिक चालना मिळेल.




## इलेक्ट्रॉनिक गाड्यांना प्रोत्साहन

ऑटो सेक्टरमध्ये क्रांतिकारी निर्णय घेण्यात आले आहेत. आपला देश ७० टक्के इंधन तेल आयात करतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर आपला खर्च इंधन खरेदीवर होतो. तो वाचवण्याबरोबरच प्रदूषणासारख्या समस्येला आळा घालण्यासाठी हायब्रीड आणि इलेक्ट्रॉनिक चार्जिंगवरच्या गाड्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. आतापर्यंत ८१ हजार गाड्यांना अनुदान देण्यात आले आहे. २०१५ पर्यंत ५ ते ७ दशलक्ष गाड्या निर्माण करणे हे उद्दिष्ट आहे. गेल्या वर्षीपासून या गाड्यांच्या निर्मितीला सुरुवात झाली असून, लाखापर्यंत गाड्या तयार झाल्या आहेत. सध्या हा पथदर्शी प्रकल्प असला तरी, भविष्यात सार्वजनिक क्षेत्र, टॅक्सी, बसेस, रिक्षा तसेच सरकारी वाहनेही विजेवर चालावीत, यासाठी अवजड उद्योग मंत्रालय प्रयत्नशील आहे. मोबिलिटी मिशनच्या माध्यमातून ७९५ कोटी रुपये मंजूर करून पथदर्शी प्रकल्प राबवला जात आहेत.




## टेक्नॉलॉजी ॲडॉप्शन फंड

कॅपिटल गुड्स सेक्टरच्या क्षेत्रात जोमाने काम सुरू आहे. जगात आधुनिक तंत्रज्ञान वापरले जाते. आपल्याकडे मात्र, छोट्या उद्योगांकडे यासाठी आर्थिक क्षमता नसते. त्यामुळे यापुढे अशा छोट्या उद्योगांना टेक्नॉलॉजी ॲडॉप्शन फंड दिला जात आहे. 'मेक इन इंडिया'च्या धोरणाला ही पूरक योजना आहे.

महारत्न, मिनिरत्न व नवरत्न या महत्त्वाच्या कंपन्या आहेत. देशाच्या तिजोरीत जीडीपीमध्ये या सार्वजनिक क्षेत्राचा मोठा वाटा आहे. २८२ सार्वजनिक उपक्रमांमध्ये नीती तयार करणे आणि दिशादर्शन करण्याचे काम मंत्रालय करत आहे.

## राज्यात विविध प्रकल्प

महाराष्ट्रात भंडारा येथे 'भेल' मार्फत सौर ऊर्जेची निर्मिती करणाऱ्या उपकरणांचे युनिट उभारण्याचा सरकारचा मानस आहे. हा प्रकल्प विचाराधीन आहे त्याचबरोबर रत्नागिरी येथील लोहटे एमआयडीसी मध्ये पेपर मिल उभारण्याचेही सरकारच्या विचाराधीन आहे. २४०० कोटींचा हा प्रकल्प अमेठीमध्ये पूर्वीच्या सरकारने उभारला असून तो सध्या न्यायालयीन प्रक्रियेत आहे. त्याचा निर्णय झाल्यानंतर हा प्रकल्प लोहटे येथे उभारणे सरकारच्या विचाराधीन आहे.

अवजड उद्योग आणि सार्वजनिक उपक्रम या खात्याला एक नवी झळाळी मिळवून देण्याचा माझा प्रयत्न आहे असून गेल्या तीन वर्षात त्यादृष्टीने महत्त्वाचे टप्पे माझ्या खात्याने यशस्वीरीत्या गाठले आहे.

**शब्दांकन : नीलेशकुमार कुलकर्णी**
नवी दिल्ली. संपर्क: ०९९११५६२९२५



गेल्या दोन वर्षात कोळशावर आधारीत ऊर्जानिर्मिती प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील वीज उपलब्धतेत महत्त्वपूर्ण वाढ झाली आहे. वीजटंचाई दूर करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. गेल्या वर्षभरात वीज तुटवडा दोन टक्क्यांवरून शून्यावर आणण्यावर भर देण्यात आला. हाच तुटवडा तीन वर्षांपूर्वी दोन टक्क्यांहून अधिक होता. अखंड वीज पुरवठ्याची हमी देणाऱ्या विविध प्रकल्पांविषयी सांगताहेत
केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री पियूष गोयल....

# सर्वांसाठी वीजहमी

महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असलेले राज्य आहे. मात्र मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकारने सत्तेची सूत्रे हाती घेण्यापूर्वी राज्यात मोठ्या प्रमाणावर वीज तुटवडा होता. कामाच्या तासांमध्ये राज्याला कमी वीजपुरवठ्याचा सामना करावा लागत होता. केवळ वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे अनेक उद्योगसमूह उद्योग उभारणीसाठी गुजरात व मध्यप्रदेशात जात असल्याचे चित्र होते. गेल्या अनेक वर्षांपासून राज्याला ऐन कामाच्या तासांमध्ये वीजटंचाईचा मोठा सामना करावा लागला आहे. याचा परिणाम उद्योगावर झाला आहे. वीजटंचाई दूर व्हावी, यासाठी केंद्र सरकारने अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या आहेत.



**पियूष गोयल**
केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री


### 'उदय' ऊर्जानिर्मितीचा

विविध ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारून मोठ्या प्रमाणावर वीज उपलब्ध करून दिली जात असली तरी अजूनही प्रामुख्याने ग्रामीण भागात अखंड वीज पुरवठा करणे काहीसे अडचणीचे जात आहे. ही समस्या सोडवण्यासाठी दीन दयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना राबवण्यात येत आहे. दीन दयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना व यासारख्याच इतर प्रकल्पांच्या आर्थिक तरतुदीसाठी राज्य शासनाने 'उदय' (उज्वल डिस्कॉम ॲश्युरन्स योजना) या योजनेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे एकूणच ग्रामीण भागात वीज उपलब्ध करून देण्याबाबत मोठी सुधारणा होणार आहे. खेडोपाडी वीज पोहोचणार आहे.

या योजनेमुळे राज्याला साधारण: १७०० कोटी रुपयांचा फायदा होणार आहे. एकूण प्रेषण व व्यावसायिक आणि ट्रान्समीशनमधील नुकसान कमी करण्यास मदत होणार आहे. कार्यक्षम वीज पुरवठा आणि कोळसा उपलब्धतेसाठी याचा फायदा होईल. या योजनेच्या माध्यमातून दरवर्षी राज्याचे एकंदरीत साधारणत: १६५०० कोटी रुपये वाचतील.

### सर्वांसाठी वीज

राज्यात जवळपास ८० टक्के घरांमध्ये वीज पोहोचली आहे. ग्रामीण भागात अजून १४२ लाख घरांपैकी २१ लाख घरांपर्यंत वीज पोहोचणे बाकी आहे. त्यांना वीज पुरवठा करण्यासाठी शासन युद्ध पातळीवर कार्यवाही करत आहे. कुठल्याही निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही व कालमर्यादेत वीज उपलब्ध करून दिली जाणार आहे. ग्रामीण भागासाठी दीन दयाळ उपाध्याय



ग्रामज्योती योजनेंतर्गत २७७५ कोटी रुपयांचे ३७ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. शहरी भागासाठी इन्टिग्रेटेड पावर डेव्हलपमेंट स्किम अंतर्गत २४१७ कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. यामध्ये २५५ शहरांचा समावेश आहे. त्यामुळे शहर व ग्रामीण भाग प्रकाशमान होणार आहे.

### गो लाइव्ह

ऊर्जा विकास आणि सुधारणा कार्यक्रमांतर्गत १२८ शहरांमध्ये व १२३ शहरांमध्ये वितरण व्यवस्था बळकट करण्याचे काम सुरू आहे. ही १२८ शहरे 'गो लाइव्ह' म्हणून घोषित केली आहेत. ट्रान्समिशनच्या उत्तम पायाभूत सुविधांमुळे राज्याला सहज वीज उपलब्ध करून देणे शक्य होत आहे. यामुळे अवघ्या तीन वर्षांच्या कालावधीत ८००० एमव्हीए आणि ३९९८ सर्किट किलोमीटर ट्रान्समिशन लाइन पूर्ण करता आली.

### अखंड वीजपुरवठा

पुढील तीन वर्षांच्या कालावधीत अनेक नवीन ट्रान्समिशनची कामे होणार आहेत. यामध्ये ४९९० सर्किट किमीची ट्रान्समिशन लाइन आणि ११७३० एमव्हीएआरची (इम्प्रूव्हमेंट ऑफ व्होल्टेज प्रोफाईल) ट्रान्सफॉर्मेशन क्षमतावाढ करणे यांचा समावेश आहे. वीज पुरवठा यंत्रणेत हाय व्होल्टेजच्या होणाऱ्या चढउतारामुळे अनेकवेळा वीजपुरवठा खंडित होतो. शेतीच्या हंगामात ही समस्या वारंवार उद्‌भवते. याचा सामान्य वीज ग्राहक व शेतकऱ्यांना बसतो. या समस्येवर मात करण्यासाठी औरंगाबाद आणि सोलापूर आधुनिक यंत्रणा बसवण्यात येणार आहे. यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार थांबतील.

**शब्दांकन: अमेय साठे**
ज्येष्ठ पत्रकार, दिल्ली




३ वर्षे भारताच्या नवनिर्माणाची...

## उज्ज्वल कामगिरी

- एप्रिल ते फेब्रुवारी २०१४ या कालावधीत असणारी २ टक्के विजेची टंचाई, एप्रिल ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत शून्य टक्क्यावर आली आहे.
- एप्रिल ते फेब्रुवारी २०१४ या कालावधीत वीज टंचाईचे प्रमाण ८.६ टक्के होते, ते एप्रिल ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत ०.४ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे.
- कोळशाद्वारे वीज निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांमधून ३३ टक्क्यांनी वीज उत्पादन वाढले आहे. हे उत्पादन २०१५-१६ मध्ये ७२,५०७ दशलक्ष युनिट होते, ते २०१५-१६ मध्ये ९६,८५५ दशलक्ष युनिटपर्यंत वाढले आहे.
- मे २०१४ मध्ये कोळशाद्वारे वीज निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांना फक्त सात दिवस पुरेल एवढाच कोळसा ठेवण्याची क्षमता होती, ती क्षमता ५० टक्क्यांनी वाढवली.
- २०१३-१४ मध्ये वीज निर्मिती केंद्रांना ४५.९ दशलक्ष टन कोळसा मिळत होता, २०१५-१६ मध्ये वीज निर्मिती केंद्रांना ६२.३ दशलक्ष टन प्राप्त झाला. यामुळे कोळसा मिळण्याचे प्रमाण ३५ टक्क्यांनी वाढले.
- महाराष्ट्रात १५०० मेगावॅट क्षमता असणाऱ्या तीन सौर ऊर्जा पार्क्सना मंजुरी दिली आहे.
- गेल्या तीन वर्षात १५२ मेगावॅट क्षमतेची सौर ऊर्जा संयंत्र स्थापित केले आहेत.
- २०१६-१७ मध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त सौर पंप स्थापित केले आहेत.
- मंजूर असलेल्या ग्रीड इंटरॲक्टीव सोलर रूफटापपैकी ५० टक्के स्थापित करण्यात आले आहेत.
- महाराष्ट्रात 'अक्षय शक्ती' प्रक्षेपित करण्याचे काम प्रगतिपथावर असून ९७३ सीकेएम ग्रीन ऊर्जा मार्ग करण्यासाठी लागणारे ३६१ कोटी रुपये अपारंपरिक ऊर्जेसाठी देण्यात आले आहेत.
- सोलापूर येथे नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन यांच्या अंतर्गत ६६० मेगावॅट क्षमतेचा सूपर थर्मल पॉवर प्रोजेक्ट सुरू करण्यात आला आहे.
- ऊर्जा कार्यक्षमता सेवा (एनर्जी इफीसिएंसी सर्व्हिस लिमिटेड) यांनी उजाला या योजनेंतर्गत २.१ कोटी एलइडी बल्ब वितरित केले, यामुळे ग्राहकांचे प्रतिवर्षी १०९३ करोड रुपये वीज बिल वाचण्यास मदत झाली आहे.
- ऊर्जा संवर्धनासाठी विविध उपाय योजना, एलइडी बल्बसचा वापर, पाणी उपशासाठी असणारे पथदर्शी प्रकल्प राबवल्यामुळे दरवर्षी ६६० मेगाहार्टस विजेची बचत होत आहे.



# सुसज्ज आणि समर्थ

भारताचा आजही शस्त्र खरेदी करण्यात जगात पहिला क्रमांक आहे. अत्याधुनिक शस्त्रास्त्रे तसेच लढाऊ विमानांसाठी भारताला दुसऱ्या देशांवर अवलंबून राहावे लागते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतासारख्या लोकसंख्येने मोठ्या असणाऱ्या देशात संरक्षण क्षेत्रात किती गुंतवणूक करावी यावर काही मर्यादा येतात. अमेरिका, रशिया या देशांसारखी मोठी गुंतवणूक आपण करू शकत नाही. तीन वर्षांपूर्वी केंद्रात आलेल्या मोदी सरकारने आपले 'मेक इन इंडिया' धोरण जाहीर करून त्या दिशेने पावले उचलायला सुरुवात केली आहे. भारत शस्त्रसज्जतेच्या बाबतीत दुसऱ्या देशांवर अवलंबून आहे, मात्र आता 'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून शस्त्रनिर्मितीकडे भारत वळलेला आहे. शस्त्रनिर्मितीचे भारतीयीकरण करून छोटी लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर्स, पाणबुड्यांची निर्मिती केली तर भारतीय सेना अधिक शक्तिशाली बनेल. शस्त्रनिर्मितीच्या बाबतीत अन्य देशांवर अवलंबून राहणे भारतासारख्या आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या देशाला यापुढील काळात परवडणारे नाही. अन्य देशांवरील परावलंबित्व दूर करणे महत्त्वाचे आहे. शस्त्रनिर्मितीसाठी आवश्यक ते अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून हे परावलंबित्व दूर करता येईल. छोटी लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर्स, मिसाइल, पाणबुड्यांच्या निर्मिती क्षेत्रात भारताने पाऊल उचलले आहे. काही प्रमाणात त्यात यश मिळाले आहे. भविष्यात लढाऊ विमाने आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची निर्मिती करण्यासाठी डिफेन्स प्रॉडक्शन विभागामार्फत (डीडीपी) संशोधन सुरू आहे. २००१ ते मार्च २०१४ दरम्यान २१४ औद्योगिक परवाने शस्त्रनिर्मितीसाठी परवाने देण्यात आले होते. त्या तुलनेत एप्रिल २०१४ ते मार्च २०१६ पर्यंत ११९ औद्योगिक परवाने निर्मितीसाठी देण्यात आले आहेत.

### शस्त्रनिर्मितीला चालना देण्यासाठी एफडीआय

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशाला शस्त्र उत्पादनात आत्मनिर्भर

२०१४ मध्ये केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी 'मेक इन इंडिया' या आपल्या महत्त्वाकांक्षी योजनेची घोषणा केली. या योजनेंतर्गत 'भारत शस्त्र खरेदी करणारा नव्हे, तर शस्त्र निर्यात करणारा देश बनेल' असा विचार त्यांनी सर्वप्रथम देशासमोर मांडला. केंद्र सरकारने शस्त्र निर्यात करणारा देश बनण्याचा संकल्प केला आहे. देशात मूलभूत स्त्रोतांची कमतरता नाही, तर अभाव होता तो फक्त राजकीय इच्छाशक्तीचा. नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ही कमतरता भरून काढली आहे. त्यामुळे संरक्षण क्षेत्र एका नव्या दिशेने झेप घेत आहे.



**डॉ. सुभाष भामरे**
केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री

बनणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारने नव्या संरक्षण खरेदी धोरणाची योजना आखली आहे. या योजनेच्या माध्यमातून भारत सरकारने संरक्षण धोरणाचा पूर्णपणे कायापालट करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी देशात मुळातच गुंतवणुकीचे वातावरण तयार करणे आवश्यक आहे. त्याचाच एक भाग म्हणून फ्रान्सशी केलेला 'राफेल' करार आहे. ज्यात अर्धा भाग भारतात गुंतवणूक करण्याचे म्हटले आहे. सरकारने त्यासाठी थेट परदेशी गुंतवणूक (एफडीआय) ४९ टक्क्यांपर्यंत वाढवलेली आहे. संरक्षणासंबंधी परवान्यांसाठी सोपी प्रक्रिया अंगिकारली आहे. त्याचबरोबर करारामध्ये सुधारणा आणि प्रोत्साहन देण्याचे ठरवले आहे. पुढे जाऊन एफडीआयची मर्यादा वाढवून ती १०० टक्क्यांपर्यंत करण्याचे संकेत मोदीजींनी दिलेले आहेत. राष्ट्रीय सुरक्षा मजबूत करण्यासाठी खासगी क्षेत्र महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते असा सरकारला विश्वास वाटतो. याशिवाय भारताच्या खासगी कंपन्यांना संरक्षण क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी जोडण्याची संधी मिळेल. संरक्षण क्षेत्रात क्रांती आणण्यासाठी आणि स्वावलंबी होण्यासाठी आणि तंत्रज्ञानाचे आदान-प्रदान होण्यासाठी एफडीआय उदार व्यवस्था लागू करणे आवश्यक आहे. सध्या आपण आयात करत असलेली शस्त्रास्त्रे आणि विमाने खूप महागडी आहेत. एफडीआयमुळे देशातच शस्त्रसामग्री निर्माण झाली तर त्याचा आर्थिक फायदा देशाला होणार आहे. याशिवाय या निर्णयामुळे मोठी रोजगारनिर्मितीची संधी भारताकडे आहे.



## सर्जिकल स्ट्राइकने सैनिकांचे मनोधैर्य वाढले

२०१६ ची सुरुवातच पठाणकोटमधील वायुसेनेच्या कॅम्पवरील दहशतवाद्यांच्या हल्ल्याने झाली. त्यानंतर सप्टेंबरमध्ये जम्मू-काश्मीरच्या उरीमध्ये दहशतवाद्यांनी भारतीय सेनेच्या शिबिरावर हल्ला केला. त्यात आपले १७ जवान शहीद झाले. याला प्रतिउत्तर म्हणून भारताने २९ सप्टेंबरच्या रात्री ऐतिहासिक सर्जिकल स्ट्राइक केले आणि सुमारे ५० दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. पाकव्याप्त काश्मीरमध्ये घुसून भारतीय सैन्याने यशस्वीरीत्या पार पाडलेले हे ऑपरेशन म्हणजे पाकिस्तानला सरकारने दिलेला इशारा आहे. यापुढे पाकिस्तानी पुरस्कृत दहशतवाद्यांचे हल्ले आणि घुसखोरी भारत सहन करणार नाही असा ठोस संदेश सरकारने दिला.

भारताचा एक उद्देश दहशतवादाच्या मुद्द्यावर पाकिस्तानचा खरा चेहरा आंतरराष्ट्रीय स्तरावर उघड करण्याचा आहे. पाकिस्तानला त्यांच्याच भाषेत प्रतिउत्तर देण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे भारतीय सैनिकांचे मनोधैर्य कमालीचे वाढलेले आहे.

## भारत-फ्रान्स 'राफेल' करार

भारत आणि फ्रान्स दरम्यानचा बहुचर्चित राफेल करार २०१६ मध्ये झाला. भारतीय वायुसेनेच्या आधुनिकीकरणासाठी हा करार अत्यंत महत्त्वाचा आणि तितकाच आवश्यक मानला जातो. चीन आणि पाकिस्तान या शेजारी राष्ट्रांचा वाढता धोका लक्षात घेता दक्षिण आशियामध्ये स्थिरता आणि संतुलन राखण्यासाठी भारताला आपल्या वायुसेनेची ताकद वाढवण्याची गरज आहे. एकीकडे चीन पाकिस्तानला आवश्यक ती सर्व मदत करत आहे, तर अमेरिका ही पाकिस्तानच्या वायु दलाला सहकार्य करण्याची तयारी दाखवत आहे. अशा परिस्थितीत भारताला बहुउद्देशीय लढाऊ विमानांची आवश्यकता आहे. या कराराअंतर्गत भारताला ३६ राफेल विमाने मिळणार आहेत. त्यामुळे भारताची ताकद आणखी वाढणार आहे. दक्षिण आशियात भारताचा दबदबा कायम राखण्यासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीने राफेल कराराद्वारे सुरक्षेसोबतच रोजगाराची संधी देशात उपलब्ध होणार आहे.

## वन रँक-वन पेन्शन


४० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर बहुप्रतिक्षित वन रँक-वन पेन्शन योजनेची घोषणा केंद्र सरकारने २०१५ मध्ये केली. यासंबंधीची सविस्तर निर्देश ३ फेब्रुवारी २०१६ रोजी जाहीर करण्यात आले. या योजनेचा फायदा निवृत्त सैनिक आणि युद्धात शहीद झालेल्या सैनिकांच्या विधवांना मिळणार आहे. २७ फेब्रुवारी २०१७ पर्यंत या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात ४,०७६.९५ कोटी रुपयांची थकबाकी १९,९३,८७५ माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आली. दुसऱ्या टप्प्यातील १५,५७,९५० माजी सैनिकांची २,२१८ कोटी रुपयांची थकबाकीही देण्यात येईल.

**शब्दांकन : अजित पाटील**
नवी दिल्ली



# शेतकऱ्यांचे हित, देशाचा विकास

गांधीजींनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचा वापर खऱ्या अर्थाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला. गांधीजींची तत्त्वे काय होती हे मोदीजींमुळे देशातील १२५ कोटी नागरिकांना कळले. अगदी साधे स्वच्छता अभियान असो किंवा जनधन योजना असो. गांधीजींच्या 'नई तालीम'चा प्रयोग प्रधानमंत्र्यांनी यशस्वीपणे राबवला आहे. याच तत्त्वामुळे देश जगात नावारूपास आला आहे.



**हंसराज अहीर**
केंद्रीय गृहराज्यमंत्री

मी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पहिल्या दिवशीपासून अगदी जवळून पाहतो आहे. कोण विरोधक आणि कोण आपल्या पक्षाचा हा भेदाभेद त्यांनी कधीही केला नाही. देशातील शेवटच्या व्यक्तीपर्यंतचा विकासाचा ध्यास घेतलेले मोदी यांनी गरिबीचे चटके सहन केले आहेत. अगदी प्रतिकूल परिस्थितीतून ते आल्याने, गेल्या तीन वर्षात त्यांनी देशासाठी केलेली कामे ही लक्षवेधी आहेत.

### अखंड कार्यरत

दररोज स्वत: १८ तास काम करणे आणि सहकाऱ्यांनाही काम करण्यास प्रोत्साहन देणे हे त्यांच्यातील कौशल्य आहे. कुठलेही दडपण न ठेवता आम्हीही लीलया कामे मार्गी लावतो. भारताला हे नेतृत्व दीर्घकाळ मिळाल्यास देश जगात महाशक्ती होण्यास अनुकूल वातावरण राहील! ज्या अमेरिकेने मोदीजींना व्हिसा नाकारला होता, त्याच मोदीजींना प्रधानमंत्री झाल्यावर चार वेळा अमेरिकेत बोलावून त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांचे महत्त्व जगाला पटायला लागले आहे.

### भ्रष्टाचाराला आळा

भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्याचे बाळकडू आम्हाला आमचे नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी दिले. कोळसा घोटाळा मी बाहेर आणला, जेव्हा मी याचा अभ्यास करीत होतो तेव्हा मला धक्का बसला. गांधीजींच्या नावाचा वापर करून देशातील सर्वात मोठा भ्रष्टाचार करणाऱ्यांचा बुरखा फाडण्यात यश मिळाले.

## सुरक्षेला प्राधान्य

मोदीजींनी मला प्रारंभी रसायन व खते आणि आता गृह विभागाची जबाबदारी दिली. अल्पावधीत त्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला, ही मी माझ्या कामाची पावती समजतो. अंतर्गत सुरक्षेसोबतच शेजारील देशांसोबत संबंध चांगले व्हावेत म्हणून आमचे प्रयत्न आहेत.

शेतकऱ्यांसाठी कृषी सिंचन योजना राबवावी म्हणून मी सातत्याने पाठपुरावा करत होतो. मोदीजी प्रधानमंत्री झाल्यानंतर त्यांनी देशातील शेतकऱ्यांचा विचार करून 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने'ला प्राथमिकता दिली. अटलबिहारी वाजपेयींनी ग्राम सडक योजनेची मुहूर्तमेढ रोवून देशातील ७ लाख खेडी शहरांना जोडली. तेवढेच महत्त्वाचे काम सिंचन योजनेच्या माध्यमातून होत आहे. विदेशी गुंतवणुकीतही भारत पुढे आहे. उद्योग आणि रोजगाराच्या संधी यात मोठा बदल झाला आहे.

भारत गेली सात दशके पाकिस्तानच्या दहशतवादी कारवाया सहन करत आला आहे. आता मात्र सहनशीलतेचा अंत झाला आहे. मोदीजींनी देशातील सर्व केंद्रशासित प्रदेश, जम्मू-काश्मीर, केंद्र व राज्याचे संबंध, अंतर्गत सुरक्षा, नक्षलवाद या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या माझ्यावर सोपवल्या आहेत. पाकिस्तानकडून सातत्याने दहशतवादी कारवायांवर त्यांनी भारत सरकारची भूमिका स्पष्ट केली. शपथविधीच्या दिवशी शेजारच्या सर्व राष्ट्रांना निमंत्रण देण्यात आले होते. मैत्री अधिक घट्ट व्हावी हा त्यामागचा हेतू होता. बांगलादेश, भूतान, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार आदी देशांसोबत आधीपेक्षाही मैत्री गडद झाली आहे. परंतु पाकिस्तान नेहमी वाकड्यात शिरतो. त्याचा योग्य वेळी योग्य समाचार घेण्याची रणनीती प्रधानमंत्री आखत आहेत. हे धाडसी पाऊल उचलणारे मोदी हे एकमेव प्रधानमंत्री असतील. मी नक्षलवादी जिल्ह्यातील असल्याने जनमानसावर त्याचे विपरीत परिणाम कसे होतात, याची मला जाणीव आहे. मोदींनी यांकडे लक्ष घालण्यास मला सांगितले आहे, यासाठी योजना आखली जात आहे. नक्सलवाद, दहशतवाद आणि आतंकवाद विकासात बाधा आणणाऱ्या बाबी आहेत. देशांतर्गत अनेक समस्या आहे. जात-धर्म यापलीकडे जाऊन लोकांच्या समस्या सोडवायच्या आहेत. समता आणि अखंडता कशी नांदेल यासाठी प्रधानमंत्र्यांच्या दूरदृष्टीनुसार काम केले.

## स्वस्त औषधे

मोदी सरकारच्या जेनेरिक औषधीच्या धोरणाकडे बघितले तर या सरकारबद्दल अभिमान वाटेल एवढे चांगले कार्य या क्षेत्रात झाले आहे. महागडी औषधे सामान्य, गरीब लोकांनी विकत कशी घ्यायची? हा प्रश्न सुटला आहे. बाजारपेठेत कंपन्यांच्या नावाने विकल्या जाणाऱ्या औषधींच्या तुलनेत जेनेरिक परंतु ब्रॅन्डेड औषधी ८० ते ९० टक्के सवलतीत उपलब्ध केल्यात. एम्लोडिपाईन १० गोळ्या २० रुपयास मिळतात त्या जेनेरिकमध्ये केवळ अडीच रुपयात मिळत आहेत.

वेदनाशमक गोळ्या ३० रुपयाहून ५ रुपयांवर, रक्तदाबावरील गोळ्या ९४ रुपयांहून १० रुपये, तापावरील गोळ्या ४२ रुपयांहून साडेतीन रुपये, मधुमेहाच्या आजारावरील गोळ्या ६६ रुपयांहून केवळ तीन रुपयांवर, प्रतिजैविक १५० रुपयांहून ४१ रुपयात उपलब्ध होत आहे. युरियात होणारा मोठा भ्रष्टाचार नीम कोटेड युरियामुळे थांबला. यामुळे युरियावर देण्यात येणाऱ्या सवलतीमधील ५ हजार कोटी रुपये वाचले आहेत.




केंद्र सरकारच्या 'उज्ज्वला' योजनेतून गरीब लोकांना गॅस सिलेंडर व गॅस शेगडी देण्याचा कार्यक्रम असो किंवा प्रधानमंत्री जनधन योजनेमध्ये २४ कोटी बँक खाते उघडण्याचा उपक्रम असो, लोकांना आता आपले सरकार असल्याचा विश्वास बसला आहे. नोटबंदी केल्यानंतर गरीब, मजूर व शेतकरी या वर्गातून खूप मोठे समर्थन आम्हाला मिळाले. आता आमची शक्ती निर्माण झाली आहे. येणाऱ्या काळात आम्ही विकासाच्या कामाला अधिक गती देणार आहोत. कुठलेही दडपण न ठेवता आम्ही कामे मार्गी लावतो.

## अनेक प्रश्न निकाली

गृह विभाग सांभाळताना राज्य आणि केंद्र यांच्या समन्वयाने अनेक प्रश्न निकाली काढत आहोत. अंतर्गत सुरक्षा हा महत्त्वाचा विषय आहे. आमच्या सरकारमध्ये लोकांना सुरक्षेबाबत विश्वास निर्माण झाला आहे. महिलांवरील अत्याचार कमी झालेत. महिला अन्यायाबाबत पोलिसांमध्ये तक्रारी नोंदवायला लागल्या आहेत. त्यामुळे गुन्हा नोंदणीचा आकडा फुगलेला दिसत असला तरी तो जागृतीचा भाग आहे. असुरक्षिततेची महिला रात्री बिनधास्तपणे घराबाहेर पडतात, त्यांच्यातील भीती नाहीशी होत आहे. हे या सरकारच्या यशाचे गमक आहे.

**शब्दांकन: विकास झाडे**
नवी दिल्ली.



# सामाजिक न्याय शेवटच्या घटकापर्यंत

केंद्र सरकारच्या कार्यकाळाला येत्या २६ मे २०१७ रोजी तीन वर्ष पूर्ण होत आहेत. यादरम्यान सरकारने सामाजिक न्यायाच्या दिशेने अनेक पावले उचलेली आहेत. त्यांच्या धोरणांनुसार केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, दिव्यांग व्यक्ती तसेच सफाई कामगारांसह इतर दुर्बल घटकांच्या कल्याणाच्या दृष्टीने 'स्टार्ट अप' व 'स्टँड अप इंडिया' यासारख्या काही कल्पक योजनांची सुरुवात केली आहे. या घटकांतील लोकांना विभागाद्वारे सुरू करण्यात आलेल्या योजनांचा अधिकाधिक लाभ मिळवून देऊन, त्यांचा आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले नमूद करतात.



**रामदास आठवले**
केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री

सामाजिक न्याय मंत्रालयाचा मूळ उद्देश समाजातील अशा वर्गाबरोबर समानतेचा व्यवहार प्रस्थापित करणे आहे, जे सामाजिक असमानता, शोषण, भेदभाव आणि अन्यायाने पीडित राहिलेले आहेत. सामाजिक न्याय विभाग विशेषत: अशा वर्गातील लोकांचा सामाजिक व आर्थिक विकास साधण्याची जबाबदारी पार पाडत आहे. देशातील ८५ टक्के लोकसंख्येसाठी कार्यरत असलेल्यांमध्ये अनुसूचित जाती, इतर मागासवर्गीय, वयोवृद्ध नागरिक, दिव्यांग, मद्यपान व्यसनाधीन, ट्रान्सजेंडर व्यक्ती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग तसेच निराश्रित/भीक मागणाऱ्यांसाठी कार्यरत आहे. या विभागातर्फे ११ योजना राबवल्या जातात. ज्यामध्ये अनुसूचित जातीच्या मुलांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, नववी व दहाव्या वर्गातील अनुसूचित जातीच्या मुलांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती, ओबीसींसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती, विशेष केंद्रीय सहायता (एससीए), एससींसाठी राष्ट्रीय फेलोशिप, अनुसूचित जातीच्या पात्र उमेदवारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय अनुसूचित वित्त विकास महामंडळ (एनएसएफडीसी) राष्ट्रीय मागासवर्ग वित्त विकास महामंडळ, राष्ट्रीय सफाई कामगार वित्त विकास महामंडळ यांच्यामार्फत कर्ज देण्याची सुविधा, प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना, ओबीसींसाठी पूर्वमॅट्रिक शिष्यवृत्ती तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने लागू केलेली राष्ट्रीय फेलोशिप या योजना सामील आहेत. यासह आंतरजातीय विवाहासाठी आर्थिक तरतूद, वृद्धांना मदत, दिव्यांगाना विविध योजनांच्या माध्यमातून मदत, मद्यपानग्रसित व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी विविधांगी मदत यासह अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार निवारण) कायदा यासारख्या संवेदनशील विषयावर मंत्रालयाद्वारे कामे केली जातात.

### महत्त्वाचे निर्णय

केंद्र शासनातर्फे राज्यांना अनुसूचित जातींच्या विकासासाठी निधी दिला जात होता. परंतु हा निधी वळवला जायचा. असे होऊ नये म्हणून अनुसूचित घटक योजना (शेड्यूल कास्ट कंपोनंट प्लान) अंतर्गत राज्यांना दिलेल्या निधीची या

विभागातर्फे प्रथमच देखरेख (मॉनिटरिंग) करण्यास सुरुवात, अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार निवारण) विधेयक, २०१५ मध्ये केलेले संशोधन, अनुसूचित जातींसाठी ऋण वृद्धी हमी योजना, दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती समुदायाच्या आर्थिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक न्याय विभाग आणि राष्ट्रीय अनुसूचित जाती आर्थिक व विकास महामंडळ यांच्यामध्ये झालेला करार, महिलांसाठी आत्मसंरक्षण कौशल्यासह कमर्शियल मोटर ड्रायव्हिंग प्रशिक्षण देण्याचा सुरू केलेला अभ्यासक्रम तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी एक विधेयक पारित करून त्यांच्या आरक्षणात केलेली वाढ हे अलीकडे विभागाद्वारे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.

### दिव्यांगांसाठी आरक्षण

माझ्या दृष्टीने दिव्यांगाना आरक्षणात वाढ करून देण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे. आधी दिव्यांगासाठी ३ टक्के आरक्षण होते. विधेयक पारित करून ते आता ४ टक्के करण्यात आले आहे. दिव्यांगासाठी आता विभागात स्वतंत्र सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. मंत्रालयाद्वारे दिव्यांगाना विविध साधनसामग्री पुरवली जाते. जसे कर्णबधिरांसाठी कर्णयंत्र, कृत्रिम हात, पाय व इतर यंत्रसामग्री दिली जाते. १७ सप्टेंबर २०१६ रोजी गुजरातच्या नवसारी येथे आयोजित कार्यक्रमात सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे १०, ३३० कर्णबधिरांना कर्णयंत्राचे मोफत वाटप करण्यात आले. पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात वाटप करून जागतिक कीर्तिमान विक्रम विभागाने केला आहे. यासह दिव्यांगांना सुगम्य वाटचाल करता यावी व त्यांना सर्वच सार्वजनिक ठिकाणी जाणे-येणे सहज व्हावे, यासाठी सुगम्य भारत अभियान राबवले जात आहे.

दुसरा महत्त्वाचा निर्णय एससी-एसटी एट्रोसिटी ॲक्ट संशोधन विधेयक, २०१५ पारित करण्यात आले. या अंतर्गत पीडितांना देण्यात येणाऱ्या वर्तमान रकमेत जवळपास १० टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. गुन्ह्यांचा प्रकार बघून ही आर्थिक मदत ८५ हजार रुपयांपासून ते ८,२५,००० रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. अत्याचार पीडित अथवा त्यांच्या आश्रिताला मदतीचा पहिला हफ्ता नगदी स्वरूपात किंवा वस्तूस्वरूपात ७ दिवसांच्या आत देणे अनिवार्य करण्यात आले आहे. घटनेची चौकशी करून ६० दिवसांच्या आत आरोप-पत्र न्यायालयात दाखल करावे लागेल. पीडित व्यक्तीला लवकर न्याय मिळावा यासाठी १४ राज्यात १९४ विशेष न्यायालये स्थापन केली गेली आहेत. महाराष्ट्रात अशी ३ न्यायालये आहेत. काही राज्यात विशेष पोलीस स्टेशनही निर्माण करण्यात आले आहेत.

**शब्दांकन : सुनील निमसरकर**
नवी दिल्ली. संपर्क: ०९९९९७८१०९९

## योजनांचा महाराष्ट्राला लाभ

हे मंत्रालय एका राज्यासाठी नाही तर पूर्ण देशासाठी कार्य करते. परंतु महाराष्ट्राला या योजनांच्या माध्यमातून अधिक लाभ देण्यावर माझा भर आहे. सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये अधिक वाढ करण्याला माझे प्राधान्य आहे. अनुसूचित जातीतील जवळपास ६८ लाख विद्यार्थी दरवर्षी शिष्यवृत्तीचा लाभ घेतात. यामध्ये २०१६-१७ या वर्षात राज्यातील ६ लाख २८७१ विद्यार्थी लाभान्वित झाले आहेत. देशभरात जवळपास ५ ते ६ लाख इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही शिष्यवृती दिली जाते. या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून दिली जाणारी रक्कम ८ हजार कोटींपर्यंत पोहोचते.



परदेशात शिक्षण घेण्यासाठी लागणारा खर्च विभागातर्फे दिला जातो. या योजनेंतर्गत प्रत्येक वर्षी १०० मुलांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. या विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक असते. राज्यातून मोठ्या संख्येमध्ये विद्यार्थ्यांना परदेशात पाठविण्यावर माझा भर राहील. देशात जवळपास २० कोटी एकर जमीन पडीक आहे तसेच देशात भूमिहिनांची संख्यादेखील लक्षणीय आहे. गावामध्ये जे शेतमजूर आहेत ते सर्वच व्यवसाय करू शकत नाही. अशा भूमिहीन शेतमजूरांना २-३ एकर जमीन दिली तर ते शेती करून त्यावर आपला चांगला उदरनिर्वाह करू शकतात. अशांना स्वबळावर शेती करता यावी, यासाठी त्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना सुरू करण्याचा विचार आहे. या संदर्भात विभागातर्फे काही बँकांशी लवकरच सामंजस्य करार केला जाईल. कार्यान्वित कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजनेच्या धर्तीवर ही योजना राबवली जाईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सरकार स्थापनेपासून म्हणजे २६ मे २०१४ पासून पारदर्शी कारभारासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा, डिजिटल व्यवहारांचा जोरदार वापर सुरू केला. नोटाबंदी हे याचे अलीकडचे दृश्यात्मक पाऊल! फक्त 'आधार' आवश्यक करून खातेदारांच्या बँक खात्यांवर पैसे जमा होऊ लागताच लाखो बोगस रेशनकार्डे एका झटक्यात रद्द झाली. 'भीम ॲप' हा तर जगातला चमत्कार मानला जात आहे. भविष्यात भीम ॲपला इंटरनेटचीही गरज भासणार नाही या दृष्टीने सरकार प्रयत्न करत आहेत. भारत एका डिजिटल क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा आहे.




# स्मार्ट ॲप्स, स्मार्ट भारत

अधिकाधिक पारदर्शी कारभार, तंत्रज्ञानाचा वापर आणि सकारात्मकता यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताबद्दल सकारात्मक दृष्टिकोन तयार झालेला आहे. याच पार्श्वभूमीवर मोदी सरकारने शेती, उत्पादन, आरोग्य, शिक्षण, युवा, सेवा, सामाजिक आदी क्षेत्रात अनेकानेक मोबाइल ॲप्लिकेशन म्हणजेच ॲप्सच्या साहाय्याने दमदार 'स्टार्ट अप' घेतला आहे. माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या साहाय्याने २०१४-१५ पासून केंद्र सरकारच्या जवळपास प्रत्येक केंद्रीय मंत्रालयाचे एक तरी ॲप विकसित झाले आहे. आता तुमच्या संगणकावरच नव्हे तर तुमच्या हातातील मोबाइलच्या एका क्लिकवर नवीन कृती आराखड्यासह सारे ॲप्स सज्ज आहेत.

### अटल इनोव्हेशन मिशन

माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने मोदी सरकारने अटल इनोव्हेशन मिशन सुरू केले आहे. त्यानुसार देशभरात ३१ इनोव्हेशन केंद्रे व ३५ इनक्युबिशन केंद्रे स्थापन होण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे. याशिवाय रिसर्च पार्क, स्टार्ट अप मेळावे आयोजित होत आहेत. डिजिधन मेळाव्याप्रमाणेच यातही लकी ड्रॉद्वारे बक्षिसांची योजना आहे.

## काही ठळक ॲप्स

### नरेंद्र मोदी ॲप

प्रधानमंत्री मोदी यांच्याशी नागरिकांना थेट जोडणारे हे ॲप आहे. आतापावेतो किमान ५०-६० लाख लोकांनी ते डाऊनलोड केले आहे. यावर पंतप्रधानचे जीवन, दैनंदिन कार्यक्रम, त्यांचा प्रवास यांची माहिती अद्ययावत (अपडेट) केली जाते.

### शिक्षण(युवा)

शिक्षण प्रक्रिया पारदर्शक बनवण्यासाठी अनेक मोबाइल ॲप विकसित करण्यात आली आहेत. प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन करण्यापासून ई.पाठशाला, सारांश, एन.सी.आर.टी. पुस्तके ऑनलाइन करणे, पदवी प्रमाणपत्रे व गुणपत्रिका ऑनलाइन करणे, शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये थेट जमा करणे, विद्यापीठांसाठी स्वयम हे पोर्टल आदी अनेक उपाय हाती घेतले आहेत.

### डिजीलॉकर

डिजिटल इंडिया मोहिमेतले हे एक महत्त्वाचे ॲप. नागरिकांना आपली व्यक्तिगत माहिती, कागदपत्रे सत्यापित करता येतात.

### खोया-पाया ॲप

देशात मुले हरवण्याचे प्रमाण भयावह आहे. दर वर्षी ७९ हजार मुले घरातून बेपत्ता होतात. या हरवलेल्या मुलांचा शोध लवकर लागावा यासाठी महिला बालकल्याण मंत्रालयाने हे ॲप विकसित केले आहे. यावर हरवलेल्या मुलाचे छायाचित्र व त्याची कौटुंबिक माहिती

अपलोड केली की मंत्रालय या माहितीची सत्यता तपासून ती थेट पोलिसांना दिली जाते. या ॲपच्या मदतीने गेल्या अडीच वर्षांमध्ये हजारो मुलांना शोधण्यास मदत झाली आहे.

### किसान मित्र ॲप

शेतकऱ्यांसाठी कृषी मंत्रालयाने अनेक ॲपस विकसित केली आहेत. पुसा कृषी,एक किसान, किसान सुविधा, कृषी विमा योजना, ई- बाजार आदी विविध ॲप्स विकसित झाली आहेत. यात हवामान अंदाज, धरणांमधील पाणीसाठा, पिके घेण्याबाबत बळीराजाला हंगामानुसार तज्ज्ञांचा सल्ला, शेतमालाचे राज्यनिहाय दर, आयात-निर्यात, किमान हमी भाव अशा अनेकानेक बाबींची माहिती दिली जाते.

### एम.इ.ए.इंडिया ॲप (द मिनिस्ट्री ऑफ एक्सटर्नल अफेअर्स इंडिया ॲप)

विदेश व्यवहार मंत्रालयाच्या या ॲपवर विदेशातील भारतीयांच्या नातेवाईकांसाठी मदत कक्ष चालवला जातो. याच मंत्रालयातर्फे पासपोर्ट सुविधा सुलभ करण्यासाठी एक ॲप केले आहे.

### इनक्रेडिबल इंडिया ॲप

पर्यटनाच्या अपार संधी भारतात आहेत. पर्यटन मंत्रालयाने विकसित केलेल्या या ॲपवर आपल्या देशातील राज्यनिहाय पर्यटन स्थळे, प्रवासाची साधने व हॉटेल सुविधा यांची माहिती आहे.

### पोस्ट इन्फो ॲप


देशाच्या कान्याकोपऱ्यांत असलेली दीड लाख टपाल कार्यालये व साडेचार लाख कर्मचारी असलेले टपाल मंत्रालय ई-विकासाचे एक इंजिन बनू शकते हे ओळखून या खात्याचा कारभार अत्याधुनिक करण्यासाठी वेगवान पाऊले उचलली गेली आहेत. या ॲपवर भारताचा सर्वात मोठा ऑनलाइन व्यापारपेठ तयार होण्याची क्षमता असलेल्या टपाल विभागाचे समग्र व्यवहार आहेत.

### इंडिया व्होटर लिस्ट ॲप

मतदारांना त्यांची नोंदणी करण्यापासून सारी माहिती देणारे निवडणूक आयोगाचे हे महत्त्वाचे ॲप आहे. या ॲपद्वारे उमेदवाराची माहिती, मतदारांचे प्रभाग, मतदारसंघ, मतदारयादीतील मतदाराचे नाव, आवश्यकतेनुसार छायाचित्रासहित मतदाराचे नावही उपलब्ध होऊ शकते.

### स्वच्छ भारत ॲप

आधुनिक काळात सत्याग्रहाच्या जोडीला स्वच्छाग्रहदेखील महत्त्वाचा आहे हे प्रधानमंत्र्यांनी आपल्या पहिल्या भाषणापासून अधोरेखित केले आहे. या ॲपवर स्वच्छ भारत मोहिमेची समग्र माहिती व आपण त्याच्याशी कसे जोडले जाऊ शकतो ते समजते.







### माय जीओव्ही (माय गव्हर्नमेंट ॲप)

**प्रशासन यंत्रणेत सामान्य नागरिकांचा सहभाग वाढवा यासाठी 'माय जीओव्ही ॲप' विकसित केले आहे. यावर नागरिकांना आपल्या सूचना, तक्रारी, निवेदने मांडता येणार आहेत. प्रत्यक्षात प्रधानमंत्री श्री. मोदी 'मन की बात' या आकाशवाणी कार्यक्रमात 'माय जीओव्ही' ॲपवरील सूचनांची आवर्जून दखल घेतात.**


### आय.आर.सी.टी.सी.ॲप

रेल्वे हे भारतातील महत्त्वाचे मंत्रालय आहे. रेल्वे प्रवाशांना गाड्यांची माहिती वेळेवर मिळावी, यासाठी मंत्रालयाने सुमारे १० ते १२ ऑनलाइन ॲप विकसित केली आहेत. स्वतः रेल्वेमंत्री सुरेश प्रभू हे या ॲपवर सक्रीय आहेत. साहजिकच प्रवाशांच्या तक्रारींची दखल पूर्वीपेक्षा अधिक लवकर घेतली जात असल्याचा अनेकांचा अनुभव आहे.

– निवेदिता मदाने-वैशंपायन
नवी दिल्ली

# कामगिरी दमदार

२६ मे रोजी केंद्र सरकार तीन वर्षे पूर्ण करत आहे. या तीन वर्षातील सरकारच्या कामगिरीचा, विकास योजनांचा लेखाजोखा मांडणे महत्त्वाचे आहे. हा लेखाजोखा आणखी उल्लेखनीय अशासाठी ठरतो की, केंद्रात आणि महाराष्ट्रातही एकाच पक्षाकडे सरकारचे नेतृत्व आहे. त्यामुळे विकासाच्या योजना राबवण्यात राज्याचे निर्णय उपयुक्त ठरले आणि ठरताहेत. पण त्याचबरोबर या योजना तयार करण्यामध्येही आता राज्याच्या सूचना अतिशय गांभीर्याने विचारात घेतल्या जात आहेत.



सरकार नावाच्या यंत्रणेमध्ये जनतेची भागीदारी असणे आणि जनतेला प्रगतिपूरक वातावरण देणे ही जबाबदारी सरकारची असते. विकास योजनांची आखणी आणि अंमलबजावणी हा या जबाबदारीचा सर्वात मोठा हिस्सा असतो. राजकीय पक्षाचे प्रयत्न देखील या यंत्रणेचे संचालन करण्याचे आणि त्यातून विकास साधण्याचेच असते. यासाठी योजना करणे आणि त्या प्रभावीपणे राबवणे यासाठी सरकारला सातत्याने प्रयत्न करावे लागतात. केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारची कार्यपद्धती या प्रयत्नांना अनुरूप अशी राहिली आहे.

## विकास योजना ठरवण्याचे अधिकार

मोदी सरकारच्या प्रशासकीय कामगिरीचा विचार केल्यास संघराज्य चौकटीमध्ये राज्यांना मोकळीक देताना शहरी-ग्रामीण भागांच्या गरजांची दखल घेणाऱ्या विकास योजना तयार करणे, कृषी क्षेत्राला दुष्काळासारख्या संकटाला तोंड देण्यासाठी मजबूत बनविणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठीचे प्रयत्न करणे, तरुणाईसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षणाची व्यवस्था करणे, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक तळागाळातील वंचित घटकांना सामाजिक सुरक्षा देणे, यासाठी वेगवेगळ्या योजनांची सांगड घालण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

## विविध योजना

राज्यांना निर्णय प्रक्रियेबरोबरच आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारे आतापर्यंत मिळणाऱ्या निधीपेक्षा १० टक्के वाढीव निधी देण्याचे केंद्राने ठरवले. सोबतच, वेगाने होणाऱ्या शहरीकरणाची गांभीर्याने दखल घेऊन लहान, मध्यम शहरांना वाढत्या गर्दीचा ताण सहन करता यावा, नागरिकांना पुरेशा पायाभूत सोयीसुविधा देता याव्यात, यासाठी आणलेली अमृत योजना, मोठ्या शहरांना अत्याधुनिक बनवण्यासाठी आणलेली स्मार्ट सिटी योजना, देशभरातील लहान शहरे हवाईमार्गाने एकमेकांना जोडण्यासाठी आणलेली उडान योजना, निमशहरी भागांचा क्लस्टरद्वारे विकास करण्यासाठीची 'श्यामाप्रसाद मुखर्जी नॅशनल अर्बन मिशन' योजना, जगभरातील उद्योगांना आकर्षित करणारी 'मेक इन इंडिया' योजना, उद्योजकांना प्रोत्साहन देणाऱ्या स्टार्ट अप, स्टॅन्डअप, मुद्रा यासारख्या योजना, तर तरुणांना रोजगार देऊ शकणारी स्किल इंडिया सारखी कौशल्य विकासाची योजना, सरकारी वीज कंपन्यांना तोट्यातून बाहेर काढण्यासाठीची उदय योजना, पर्यावरणाला पूरक अशा सौर ऊर्जेचा प्रसार करणारी योजना, आजपर्यंत कधीही बँकेचे तोंड न पाहिलेल्या आणि

आर्थिकदृष्ट्या दुर्लक्षित राहिलेल्या घटकांना मुख्य आर्थिक प्रवाहात आणण्यासाठीची जनधन योजना, त्याचसोबत सरकारी बँकांची आर्थिक प्रकृती सुधारण्यासाठी आणलेली इंद्रधनुष्य योजना, एलपीजी सिलिंडरवरील अंशदान ग्राहकांच्या थेट खात्यात हस्तांतरित करणारी पहल योजना, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना स्वयंपाकाचा गॅस देणारी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आदी सामाजिक सुरक्षा योजना यांना केंद्राने सर्वोच्च प्राधान्य दिले. या योजना मोदी सरकारने आपल्या फ्लॅगशिप योजना ठरविल्या आहेत. सर्व विकास योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना आधार क्रमांक देण्यासाठीची सुरू असलेली योजनाही तितकीच महत्त्वाची आहे.

यात आणखी आवर्जून उल्लेख करावा, अशा महत्त्वांकाक्षी योजना म्हणजे स्वच्छ भारत योजना, स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी आणि स्त्री जन्माचे स्वागत व्हावे, यासाठी आणलेली बेटी बचाओ-बेटी पढाओ योजना, प्रत्येकाच्या डोक्यावर हक्काचे छत असावे यासाठी आणलेली प्रधानमंत्री आवास योजना, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठीच्या प्रधानमंत्री ग्रामसिंचन योजना, पीक विमा योजना, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये इंटरनेट क्रांतीचा विकासात पुरेपूर उपयोग करण्यासाठी आणलेली डिजिटल इंडिया योजना, भारतीय संस्कृतीमध्ये सर्वाधिक आदराचे स्थान असलेल्या गंगा नदीच्या स्वच्छतेसाठी सुरू केलेली नमामी गंगे योजना, जलमार्गाने वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठीचा सागरमाला प्रकल्प, महामार्गांचा विकास, देशाची चारही टोके जोडणाऱ्या रेल्वेचे अत्याधुनिकीकरण, क्लिन माय कोच सारखी स्वच्छतापूरक योजना, राष्ट्रीय महामार्ग रेल्वे क्रॉसिंग विरहित बनविण्यासाठीची सेतुभारतम योजना या विकासाच्या योजना मोदी सरकारच्या आहेत.

## कृषिक्षेत्राचा विकास

शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न दुप्पट करण्याच्या प्रधानमंत्री मोदींच्या महत्त्वाकांक्षी घोषणेनंतर सरकारने या दिशेने पाऊले उचलणे सुरू केले. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी सॉईल हेल्थ कार्ड तयार केले आणि आतापर्यंत २.५ कोटी शेतकऱ्यांना या कार्डचे वाटप झाले आहे. यासोबतच कडूलिंबाचे आवरण असलेला म्हणजेच नीम-लेपन असलेले युरिया खत देणे सुरू केले. शेतीचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रधानमंत्री कृषीसिंचन योजना सुरू करून ती मिशन मोड (mission mode) पद्धतीने म्हणजे सर्वोच्च प्राधान्यक्रम पद्धतीने राबवणे आरंभले. यात सिंचनाचे आतापर्यंत रखडलेले महत्त्वाचे ९९ प्रकल्प निवडून त्यांच्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.




७७५९५ कोटी रुपये खर्चून हे प्रकल्प २०१९-२० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये महाराष्ट्रातील १० लाख हेक्टर एकत्रित सिंचन क्षमता असलेल्या २६ प्रकल्पांचा समावेश आहे. शिवाय विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त भागात शाश्वत सिंचन व्यवस्था तयार करण्यासाठी सात हजार कोटी रुपयांची मागणी महाराष्ट्राने केली आहे.

उत्पादन खर्च कमी करण्यासाठी पारंपरिक कृषी विकास योजना सुरू करून जैविक खते वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. पिकांच्या सुरक्षेसाठी व्यापक अशी प्रधानमंत्री पीक विमा योजना आणली आहे. सर्वात कमी प्रिमियम, पेरणीपूर्वी आणि कापणीनंतरही विमा संरक्षण ही वैशिष्ट्ये असलेल्या या विमा योजनेमध्ये भरपाई देताना आढावा घेण्यासाठी स्मार्टफोन आणि उपग्रहांशी जोडलेले ड्रोनसारखे आधुनिक तंत्रज्ञान वापरले जाणार आहे. प्रधानमंत्री पीक विमायोजनेंतर्गत महाराष्ट्रातील शेतजमीन विमा संरक्षणाखाली आली असून २७ टक्के शेतकरी विमाधारक आहेत. केंद्रीय कृषी खात्याने मराठवाडा आणि विदर्भातील दुष्काळग्रस्त आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त १० जिल्ह्यांमध्ये दुग्धविकास प्रकल्प राबवण्यास मंजुरी दिली आहे.

पूर, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट यासारख्या नैसर्गिक संकटांमध्ये शेतीचे नुकसान झाल्यानंतर दिल्या जाणाऱ्या भरपाईचे निकष बदलून रक्कम वाढविण्यात आली. पूर्वी ५० टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्यानंतरच भरपाई मिळत असे, आता हे प्रमाण ३३ टक्के हानी एवढे करण्यात आले आहे. खराब झालेल्या धान्याला पूर्ण किमान समर्थन मूल्य (एमएसपी) देणे, राज्यांच्या आपत्ती निवारण निधीमध्ये २०१०-१५ या पाच वर्षात मिळालेल्या ३३,५८० कोटी रुपयांवरून ६१,२२० कोटी रुपये अशी दुप्पट वाढ करणे, राज्यांच्या अर्थसाहाय्यात वाढ करणे, राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून राज्यांना ५० कोटी रुपये देणे यासारख्या उपाययोजना करण्यात आल्या.

दुष्काळ निवारणाच्या प्रयत्नांना महाराष्ट्राने जोड दिली जलयुक्त शिवारसारख्या उल्लेखनीय योजनेची. त्यातून ४५०० गावे दुष्काळमुक्त करण्यात राज्याला यश आले. शिवाय केंद्र सरकारकडूनही राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून मिळालेली आर्थिक मदत महत्त्वाची होती. केंद्राने महाराष्ट्राला ३०५० कोटी रुपये दिले.

भौगोलिक मर्यादांमुळे शेतीमालाची विक्री करण्यात शेतकऱ्यांना येणारी अडचण दूर करण्यासाठी देशातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांना ऑनलाइन जोडणारे ई-राष्ट्रीय कृषी बाजार म्हणजेच ई-नाम हे व्यासपीठ सुरू केले. आणखी उल्लेखनीय योजना म्हणजे स्मार्ट फोनशी जोडलेल्या कृषी

## स्मार्ट शहरीकरण

शहरी भागाच्या विकासासाठी असलेल्या स्मार्ट सिटी आणि अमृत योजनेमध्ये देशातील ५०० शहरांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या दोन्ही योजनांवर अनुक्रमे ४८ हजार कोटी आणि ५० हजार कोटी रुपये खर्च केला जाणार आहे. स्मार्ट शहरांसाठी चौदा देशांनी गुंतवणुकीची तयारी दर्शवली असून यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे. याशिवाय अंदमान-निकोबार बेटे, आंध्रप्रदेश, असाम, दिल्ली, कर्नाटक, केरळ, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल या राज्यातील शहरांचीही निवड झाली आहे. विशेष म्हणजे वाराणसी, बोधगया, अजमेर, अमृतसर सारख्या सांस्कृतिक, आध्यात्मिक शहरांचादेखील यातून कायापालट होणार आहे.



स्मार्ट सिटी योजनेमध्ये केंद्र सरकारने महाराष्ट्रातील नवी मुंबई, नाशिक, ठाणे, बृहन्मुंबई, अमरावती, सोलापूर, नागपूर, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद आणि पुणे या दहा शहरांची निवड केली. निवड झाल्यानंतर लगेचच या शहरांना नियोजन आराखडा तयार करण्यासाठी प्रत्येकी दोन कोटी रुपयांची आर्थिक मदतही केंद्राकडून मिळाली होती. अमृत योजनेमध्ये राज्यातील ३७ शहरांची निवड झाली आहे. शहरांच्या विकासात उपयुक्त ठरलेल्या स्मार्ट सिटी योजनेची उल्लेखनीय बाब म्हणजे पुण्यासारख्या सांस्कृतिक राजधानीच्या शहरात मेट्रो प्रकल्पाला मिळालेली मंजुरी आणि नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी केंद्र सरकार व जर्मनीतील केएफडब्ल्यू बँकेदरम्यान झालेला ३७५० कोटी रुपये अर्थसाहाय्यासाठीचा करार.

पंपांचे वितरण. म्हणजे शेतकऱ्यांना आपल्या स्मार्टफोनद्वारे शेतातील वीजपंप सुरू करून पिकांना पाणी देता येईल.

### रोजगार निर्मितीला प्रोत्साहन

उपलब्ध रोजगार आणि रोजगार मागणाऱ्या हातांची संख्या यांचे व्यस्त प्रमाण पाहिले आणि तब्बल २० हून अधिक मंत्रालयांचा या योजनेच्या ७० हून अधिक उपक्रमांमध्ये असलेला सहभाग पाहता कौशल्य विकास योजनेचे महत्त्व लक्षात यायला वेळ लागणार नाही. म्हणूनच तर, कौशल्य विकास योजनेमध्ये राष्ट्रीय कौशल्य विद्यापीठ स्थापण्याची मूलगामी सूचना महाराष्ट्राने केली होती. ही सूचना केंद्राच्या विचाराधीन आहे. साहजिकच देशातील तरुणाईला रोजगाराची संधी मिळावी यासाठी केंद्र सरकारने मेक इन इंडियामार्फत भारताला उत्पादन क्षेत्राचा केंद्रबिंदू बनविण्यासाठी आणि २०२२ पर्यंत १५ कोटी भारतीयांना कौशल्य शिकविण्यासाठी कंबर कसली आहे.

### स्वच्छ भारत आणि स्वच्छ रेल्वे

स्वच्छ भारत मोहिमेमध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी रेल्वेने सर्व रेल्वेडब्यांमध्ये जैविक शौचालय (बायो-टॉयलेट) सेवा देण्याचे ठरविले असून सप्टेंबर २०१९ पर्यंत हे उद्दिष्ट गाठण्याचा रेल्वेचा प्रयत्न आहे. गेल्यावर्षी म्हणजे २०१६ मध्ये ४०७५० जैविक शौचालये उपलब्ध करण्यात आली होती. शिवाय, मानवी मलमूत्र विसर्जनापासून मुक्त असा पहिला हरित ट्रेन कॉरिडॉर देखील रेल्वेने रामेश्वरम - मनामदुराई या ११४ किलोमीटर मार्गावर सुरू केला. म्हणजे या मार्गावर धावणाऱ्या सर्व १० पॅसेंजर रेल्वेगाड्यांमध्ये जैविक शौचालये लावण्यात आली आहेत.

### 'उदय' ऊर्जाविकासाचा

२०१८ पर्यंत भारतातील शिल्लक १८४५२ गावांपर्यंत वीज पोहोचवण्याचे सरकारचे लक्ष्य आहे. सर्वांना वीज मिळणे अपेक्षित असले तरी वीज पुरवठ्याचे संकट दोन वर्षांपूर्वी चांगलेच गंभीर झाले होते. अशात मोदी सरकारने सर्वांना २४ तास वीजपुरवठा यासारख्या फ्लॅगशिप योजनेची घोषणा केली. मात्र अंमलबजावणी अवघड होती. यामागे आर्थिक आणि वीजवहनाच्या तांत्रिक कारणांमुळे अडचणीत आलेल्या राज्य वितरण (डिस्कॉम) कंपन्यांची अवस्था हे कारण होते. डिस्कॉम कंपन्यांचे कर्ज २०१४-१५ पर्यंत ४.३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले होते. यावर मात करण्यासाठी उदय (उज्ज्वल डिस्कॉम आश्वासन योजना) सुरू झाली. या योजनेने चांगलीच गती घेतली आहे. ऐच्छिक असूनही राजस्थान, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, पंजाब, बिहार, हरियाणा, गुजरात, उत्तराखंड, कर्नाटक, गोवा, जम्मू-काश्मीर, आंध्रप्रदेश आदी २० राज्ये यात सहभागी झाली आहेत. महाराष्ट्रातील ऊर्जाक्षेत्राच्या विकासासाठी केंद्र सरकारने ३०५

कोटी रुपयांचे साहाय्य करण्यासाठी होकार दर्शवल्यामुळे अर्धा डझनहून अधिक ऊर्जा प्रकल्प मार्गी लागू शकतील, असे चित्र आहे.

### सौरऊर्जेचा सदुपयोग

अपारंपरिक ऊर्जा म्हणजे सौर ऊर्जानिर्मिती १७५ गिगावॉटपर्यंत नेण्याचे सरकारचे लक्ष्य आहे. २०२२ पर्यंत सौर उर्जेचे प्रमाण १०० गिगावॉटपर्यंत जाईल, अशी अपेक्षा आहे. त्यासाठी सरकारने सोलर पार्क योजनेची घोषणा केली होती. तर रुफटॉप म्हणजे छतावर सोलर पॅनल बसवून त्यातून ऊर्जानिर्मिती साधण्यासाठी ४० गिगावॉटचे उद्दिष्ट आहे. खासगी कंपन्याही या उपक्रमात पुढे आल्या आहेत. विमानतळ, दिल्ली मेट्रो, रेल्वे, सरकारी इमारती यात सक्रिय सभागी आहेत. अलिकडेच महाराष्ट्राने पाच वर्षात ५०० मेगावॅट वीज निर्मितीसाठी सोलर ऑफ ग्रीड पॉलिसी धोरणाला मंजुरी दिली आहे.

### जन-धन योजना

आर्थिक समावेशकतेसाठी सुरू झालेल्या प्रधानमंत्री जन-धन योजनेंतर्गत बँकांमध्ये २२ कोटीहून अधिक खाती उघडण्यात आली. यातील तब्बल साठ टक्क्यांपेक्षा अधिक खाती ग्रामीण भागातील आहेत. यामुळे दीड लाखाच्या आसपास बँक मित्रांनाही रोजगार मिळाला. यात महाराष्ट्राची कामगिरी राष्ट्रीय पातळीवर दखल घेणारी



ठरली आहे. राज्यात ७५ टक्क्यांहून अधिक जनतेची जनधन खाती उघडण्यात आली आहेत. २०१५ अखेरपर्यंत जनधन खाती उघडण्याचे प्रमाण तब्बल सव्वा कोटी पर्यंत पोहोचले होते. बहुतांश जनधन खाती आधारक्रमांकाशी जोडली असल्यामुळे विकास योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे अधिक सुलभ झाले आहे.

जनधन योजनेतून उघडलेल्या याच खात्यांमार्फत वंचित घटकांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनांचा लाभ घेणे शक्य झाले आहे. या दोन्ही योजनांमध्ये आतापर्यंत अनुक्रमे दहा आणि तीन कोटी विमा पॉलिसी देण्यात आल्या आहेत. यासोबतच, असंघटित क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांसाठी निवृत्तीवेतनाची सोय असलेली अटल पेन्शन योजनाही आहे. आतापर्यंत २७ लाख जण या योजनेत सहभागी झाले आहेत. तर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्रात आर्थिक दुर्बल घटकांसाठी सुमारे ७२ हजार घरे बांधण्याला केंद्र सरकारने मंजुरी दिली.

### उज्ज्वला योजनेची भरारी

स्वयंपाकासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या एलपीजी सिलिंडरवरील अंशदान स्वेच्छेने त्यागण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी आवाहन केल्यानंतर त्यातून 'गीव्ह इट अप' ही योजना साकारली. अनेकांनी स्वतःहून अंशदान सोडल्यानंतर देशातील दहा कोटी कुटुंबांना एलपीजी सिलिंडर देण्याची उज्वला योजना सुरू करण्यात आली. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना येत्या तीन वर्षात पाच कोटी एलपीजी सिलिंडर देण्याचे उद्दिष्ट सरकारने ठरवले आहे. या योजनेला महाराष्ट्राने गिव्ह इट अपच्या माध्यमातून हातभार लावला आहे. 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीत उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्रातील जळगाव आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांनी राष्ट्रीय पुरस्कार पटकावले. डिजिटल इंडियामध्येही राज्याने मोठी भरारी घेतली असून २०१८ अखेरपर्यंत २८ हजार ग्रामपंचायती ऑप्टिकल फायबर यंत्रणेद्वारे जोडण्याचे उद्दिष्ट आहे. तर राज्य सरकारच्या सर्व सेवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर आल्या आहेत.

### महाराष्ट्र हिताचे निर्णय

मुंबईसाठी अतिशय महत्त्वाचा मानला गेलेल्या कोस्टल रोडबाबत (किनारपट्टीला लागून मार्गनिर्मितीला), यासोबतच ३४ किलोमीटर लांबीचा आणि १० कोटी रुपये खर्च अपेक्षित असलेला सागरी मार्ग पूर्ण करण्यासाठी, बोरिवलीच्या संजयगांधी राष्ट्रीय उद्यानातील संवेदनशील क्षेत्र १० किलोमीटरवरून चार किलोमीटर करण्यासाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने अनुकूल भूमिका घेतली आहे. कोकणात तेलशुद्धीकरण प्रकल्प उभारणीसाठी, मुंबई नागपूर समृद्धी महामार्गावर समांतर गॅसवाहिनी उभारणीसाठी पेट्रोलियम मंत्रालयाने सहमती दर्शविली आहे.

पुण्यातील मुळा आणि मुठा या नद्यांच्या शुद्धीकरणासाठी जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (जायका) या कंपनीशी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने सामंजस्य करार केला आहे. महामार्गांचा विकास करण्याच्या केंद्र सरकारच्या योजनेमध्ये महाराष्ट्रातील सुमारे ३८४० किलोमीटर लांबीच्या राज्य महामार्गांचे रूपांतर राष्ट्रीय महामार्गांमध्ये करण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावाला केंद्रीय परिवहन मंत्रालयाने होकार दर्शवला.

**- अजय बुवा**
नवी दिल्ली



# लाभ महाराष्ट्राचा

राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना केंद्र शासनाच्या विविध योजनांद्वारे मदत करण्यात केंद्राने पुढाकार घेतला. याचाच एक भाग म्हणून मराठवाडा व विदर्भातील दुष्काळग्रस्त व शेतकरी आत्महत्याग्रस्त १० जिल्ह्यांमध्ये दुग्ध विकास प्रकल्प राबवण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाने मंजुरी दिली. ३४० कोटी रूपयांच्या या प्रकल्पामुळे ३ हजार गावांतील ६० हजार दुग्ध उत्पादक शेतकरी आणि ग्रामीण भागातील जवळपास १० हजार युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. विदर्भातील नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि मराठवाड्यातील नांदेड, लातूर, उस्मानाबाद आणि जालना या जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. राष्ट्रीय डेअरी विकास महामंडळाच्या वतीने अमरावती जिल्ह्यातील ९० गावांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर पशू आहार संतुलन कार्यक्रम राबवण्यात येणार आहे.

केंद्राने महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकबाकी अदा करण्यात पुढाकार घेतला. परिणामी महाराष्ट्रातील ऊस कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची सर्वाधिक ९६ टक्के थकबाकी अदा केली.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत महाराष्ट्रातील २६ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्ड सोबत महत्त्वाचा करार केला. या योजनेंतर्गत केंद्र शासन महाराष्ट्रासह देशातील एकूण ९९ मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प पूर्ण करणार आहे. राज्यात झालेल्या सोयाबीनच्या विक्रमी उत्पादनामुळे केंद्र शासनाने मूल्य समर्थन योजनेंतर्गत खरीप हंगाम २०१६-१७ साठी राज्य शासनाला सोयाबीन खरेदीची मंजुरी दिली.

हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडकडील रेल्वे सायडिंगसाठीची अधिगृहीत केलेली नाशिक जिल्ह्यातील जवळपास ११६ एकर जमीन स्थानिक शेतकऱ्यांना परत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वामुळे आणि त्यांनी राजधानी दिल्लीत वेळोवेळी महाराष्ट्राच्या विविध प्रश्नांच्या केलेल्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्राचे विविध प्रश्न गेल्या तीन वर्षात मार्गी लागले आहेत. रेल्वे व रस्त्यांचे जाळे उभारणे, महत्त्वाच्या शहरांमध्ये मेट्रो उभारणे यांसारख्या पायाभूत सुविधांसोबतच कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राज्यातील सिंचन प्रकल्पांचा पंतप्रधान ग्रामसिंचन योजनेत समावेश आणि या प्रकल्पासाठी निधीची उपलब्धता, दुष्काळग्रस्त भागासाठी केंद्राकडून मिळालेली भरघोस व ऐतिहासिक मदत, राज्यातील १० शहरांचा स्मार्ट सिटी योजनेत समावेश व निधीची उपलब्धता, कौशल्य विकास कार्यक्रमासाठी राज्यात विविध प्रकल्पांना मंजुरी आदी महत्त्वपूर्ण निर्णयांचा ठळकपणे उल्लेख करता येईल.

नक्षलवादाचा सामना करण्यासाठी महाराष्ट्रात दोन भारतीय राखीव बटालीयन स्थापन करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

### मुंबई शहराचा विकास

मुंबई शहराच्या वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या 'मुंबई सागरी प्रकल्पासंदर्भात केंद्राने सकारात्मकता दर्शवत महत्त्वाचे निर्णय घेतले. यानुसार ३४ किलोमीटर लांबीच्या 'मुंबई सागरी मार्ग प्रकल्पाला' केंद्रीय

पर्यावरण व वने मंत्रालयाने मंजुरी दिली. बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे संवेदनशील क्षेत्र १० कि.मी. वरून ४ कि.मी. करण्याची अधिसूचना काढण्यात आली. या अधिसूचनेमुळे मुंबई मेट्रो रेल्वे शेड व अन्य प्रकल्पांच्या कामांचाही मार्ग मोकळा झाला आहे.

केंद्रीय नगर विकास, सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्रालय तसेच संबंधित राज्य शासनाच्या मदतीने देशातील निवडक १०० वारसा क्षेत्र, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक स्थळांच्या ठिकाणी विशेष स्वच्छता योजना राबवण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. त्यामधील पहिल्या १० वास्तूंच्या यादीत मुंबईतील छत्रपती शिवाजी टर्मिनसचा समावेश करण्यात आला आहे.

### स्मार्ट सिटी योजनेत महाराष्ट्र

केंद्रीय नगर विकास मंत्रालयाच्या यादीत राज्यातील १० स्मार्ट शहरांमध्ये नवी मुंबई, नाशिक, ठाणे, बृहन्मुंबई, अमरावती ,सोलापूर, नागपूर, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद, पुणे या शहरांचा समावेश करण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्यातील आर्थिक दुर्बल घटकांतील जनतेसाठी ७१ हजार ७०१ घरे बांधण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली. माळढोक अभयारण्याचे क्षेत्र १२२९ चौरस किलोमीटर वरून ४०० चौरस किलोमीटर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय वन व पर्यावरण मंत्रालयाने घेतला आहे. या निर्णयामुळे सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लाभ होईल. अटल नागरी पुर्नर्निमाण व परिवर्तन (अमृत) योजनेंतर्गत महाराष्ट्राला ४५.५७ कोटी प्रोत्साहन रक्कम प्रदान करण्यात आली.

### चंद्रपूरमध्ये नव्या गुंतवणुकी

केंद्रीय वने व पर्यावरण तथा हवामानबदल मंत्रालयाने चंद्रपूरमधील एमआयडीसी, घुग्गुस, बल्लारपूर, तडाळी येथे 'व्यापक पर्यावरण प्रदूषण निर्देशांका'नुसार घालण्यात आलेले निर्बंध उठवले आहेत. त्यामुळे मागील काही वर्षांपासून या भागात रखडलेल्या नव्या गुंतवणुकीचा मार्ग मोकळा झाला.

महाराष्ट्राच्या ऊर्जा विकासासाठी केंद्र शासनाच्या ऊर्जा प्रणाली विकास निधीतून ३०५ कोटी रूपयांची तत्वत: मान्यता देण्यात आली.

### स्मारके व पर्यटन विकास

दिक्षाभूमी, महाड आणि चिंचोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी तसेच बौद्ध धर्माशी संबंधित स्मारकांच्या विकासासाठी केंद्र शासनाने २८.८० कोटींच्या अतिरिक्त निधीला मंजुरी दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असणाऱ्या रायगड किल्ल्याच्या संवर्धन व सौंदर्यीकरणासाठी राज्य शासनाने आखलेल्या ६०० कोटींच्या सविस्तर प्रकल्प अहवालास तत्वत: मंजुरी देण्यात आली.

– दयानंद कांबळे
उपसंचालक , महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली.

## स्मार्ट पुणे

**पुणे शहराच्या विकासाच्या अनुषंगाने पुणे मेट्रो, लोहेगाव विमानतळ, मुळा मुठा नदी शुद्धीकरण आदी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पुणे मेट्रो प्रकल्पाच्या दोन्ही टप्प्याचे काम लवकर सुरू करण्यात येईल. पुणे विमानतळ विस्तारीकरणाचे व रिंग रोडचे काम लवकरच हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला.**



**मुळा व मुठा नदीच्या शुद्धीकरणासाठी केंद्र सरकारने जपानमधील जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (जायका) या कंपनीशी १ हजार कोटींचा सांमजस्य करार केला. ही शुद्धीकरणाची योजना जानेवारी २०२२ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.**


## स्मार्ट नागपूर

**अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) उभारण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यासाठी १ हजार ५७७ कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली आहे.**




**राज्यातून निवड झालेल्या १० स्मार्ट सिटी शहरांमध्ये नागपूरचा समावेश आहे. नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी जर्मनीची केएफडब्ल्यू बँक आणि केंद्र सरकार यांच्या ३ हजार ७५० कोटी रुपयांचा करार झाला. या रकमेतून नागपूर मेट्रोचे डबे, मेट्रो मार्ग, विद्युत पुरवठा, ट्रॅक्शन, बांधकाम आदी कामे करण्यात येणार आहेत. दिल्ली पोलीस भरतीसाठी महाराष्ट्रातील युवकांची गैरसोय टाळण्यासाठी नागपूर येथे निवड प्रक्रिया केंद्रास मंजुरी देण्यात आली.**

समाजातील विविध घटकांच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा थेट सरकारपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तसेच त्याबाबत सरकारचे मत काय आहे, हे लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे, याकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत 'मी मुख्यमंत्री बोलतोय...' हा अभिनव कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमातील पहिला संवाद हा शेती, शेतकरी, कृषी उद्योग आणि कृषी संशोधन या विषयावर आधारित होता. 'संकल्प शाश्वत शेतीचा' कार्यक्रमांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. सह्याद्री वाहिनीवरून प्रक्षेपित आणि आकाशवाणीवरून प्रसारित झालेल्या या कार्यक्रमाचा हा संपादीत भाग.



# मी मुख्यमंत्री बोलतोय...

महाराष्ट्राला संपन्नतेचा वारसा आहे आणि प्रगतीची आस आहे. काळाच्या ओघात अनेक नवनवीन आव्हाने समोर येत असतात. या आव्हानांना सामोरे जात असताना अनेक प्रश्न निर्माण होत असतात. खरेतर संपन्नतेचे स्वप्न आणि आव्हानांचे प्रश्न हातात हात घालून येतात. काही प्रश्न माहितीअभावी पडतात काही गैरसमजातून तर काही कुणीतरी करून दिलेल्या चुकीच्या समजुतीतून. पण अनेकदा यापलीकडे जाऊन उत्सुकतेपोटी किंवा अधिक माहिती मिळविण्यासाठी सुद्धा आपल्याला प्रश्न पडतात. प्रश्न मित्रमंडळीमध्ये असतात, कुटुंबामध्ये असतात एखाद्या संस्थेमध्ये असतात. तसे बघायला गेलो तर शासकीय यंत्रणा हीसुद्धा एका मोठ्या परिवारासारखीच असते. आपल्या लोकशाही व्यवस्थेत प्रश्न विचारण्यासाठी अनेक व्यासपिठे उपलब्ध आहेत. पण राज्याच्या प्रमुखाला थेट प्रश्न विचारण्याची संधी सर्वसामान्य जनतेला आता पहिल्यांदाच मिळाली आहे.

मुख्यमंत्री – महाराष्ट्राच्या शेतीसमोर जे प्रश्न आहेत. याकडे जोपर्यंत आपण एक दीर्घकालीन अशा प्रकारच्या योजनेच्या माध्यमातून पाहणार नाही, जोपर्यंत केवळ मलमपट्टी करू किंवा मदत आणि पुनर्वसन इथपर्यंत कृषीचे क्षेत्र सीमित ठेवू तोपर्यंत शेतकऱ्यांसमोरचे प्रश्न संपू शकत नाहीत. महाराष्ट्रातल्या शेतीच्या शाश्वतेकडे ज्या वेळी आपण बघतो त्या वेळी आपली खरी अडचण उत्पादकता कमी असल्याचे आपल्या लक्षात येते. उत्पादकतेच्या बाबतीत महाराष्ट्र हा देशातील राज्यांच्या तुलनेमध्ये बहुतांश पिकांमध्ये शेवटच्या पाच राज्यांमध्ये येतो. उत्पादकता कमी असणे याचा अर्थ असा आहे की, उत्पादन खर्च जास्त आणि त्यातून उत्पादन कमी निघणे आणि ज्या वेळी उत्पादन खर्च जास्त आहे आणि उत्पादन कमी आहे. त्या वेळी शेतकऱ्याची अवस्था अशी होते की, त्यांनी जे काय पेरलं, जो काही खर्च केला, जी काय मेहनत केली याचा कुठेच ताळमेळ बसत नाही. एकूण सगळी आपली कॅपिटल (भांडवली) गुंतवणूक आहे ती ३१ हजार कोटींची आहे. ३१ हजार कोटी रुपयांपैकी १९ हजार कोटी रुपये शेतीच्या क्षेत्रातील कॅपिटल (भांडवली) गुंतवणूक आहे. त्यामुळे शेतीच्या क्षेत्रामध्ये कॅपिटल (भांडवली) गुंतवणूक वाढवून एक क्षेत्र

सस्टेनेबल (शाश्वत) करायचे असा प्रयत्न आपण सुरू केला आहे. वर्ल्ड बँकेसोबत आपण क्लायमेट रेझीलेंट प्रोग्राम हातामध्ये घेतला. आपल्याला कल्पना आहे की, यापूर्वी वर्ल्ड बँक ही केवळ रस्ते, बिल्डिंग अशा मोठमोठ्या कामांना मदत करत होती. आता पहिल्यांदा अभिनव प्रकल्प घेऊन आपण वर्ल्ड बँकेकडे गेलो आणि त्यांना सांगितले की, आम्हाला शेतीच्या क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढवायची आहे. त्यामुळे आपण ज्याला जमिनीचा सुधार म्हणतो, भूसुधार म्हणतो तिथपासून ते पाण्याचा कार्यक्षम वापर, मायक्रो इरीगेशनच्या सिस्टीम, पीक पद्धती, पोस्ट हार्वेस्ट, मार्केट लिंकेज असा 'एन्ड टू एन्ड' प्रकारचा कार्यक्रम आपण तयार केला. पहिल्या टप्प्यामध्ये ५ हजार गावांमध्ये हे ट्रॅन्सफॉरमेशन करायचे आहे. याकरिता जवळजवळ ७ हजार कोटी रुपयांचा प्रोजेक्ट तयार केला आहे. त्या प्रोजेक्टला वर्ल्ड बँक आपल्याला मदत देत आहे. आपण त्याची सुरुवातदेखील केलेली आहे. येत्या कालावधीमध्ये या ५ हजार गावांचा कायापालट करणार आहोत. इतका चांगला कार्यक्रम आपण बजेटच्या माध्यमातून दिला की, १०० एकर जमीन आणि २० शेतकरी जर एकत्र येत असतील तर सरकारच्या सगळ्या योजना त्या शेतकऱ्यांना आम्ही देऊ. जो छोटा शेतकरी आहे, त्याला यांत्रिकीकरण परवडत नाही. एक शेतकरी एवढे सगळे घेऊ शकत नाही. पण समूहशेतीला सगळे पैसे आपण जर त्या ठिकाणी दिले, सगळ्या योजना दिल्या तर त्यातून उत्पादकता वाढविण्याकरिता सरकारच्या ज्या योजना आहेत, त्याचा फायदा ते घेऊ शकतील म्हणून अशा प्रकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून परिवर्तन करण्याचा प्रयत्न करत आहे.

### परिवर्तनाचा ध्यास

प्रश्न – शेतात जे पिकते ते शिवारात येते आणि मग ग्राहकांकडे जाते. शिवारात असलेला शेतमालाचा दर आणि ग्राहक त्याला देत असलेली किंमत यात प्रचंड तफावत का? आणि सरकार ती कशी दूर करेल? (पुरुषोत्तम आठलेकर, डोंबिवली.)

मुख्यमंत्री – भाज्यांच्या संदर्भात आणि फळांच्या संदर्भात आपण मोकळी बाजारपेठ मिळवून दिली. आतापर्यंत ही बाजारपेठ केवळ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून होती. आता त्याला खुली बाजारपेठ दिल्यानंतर सर्व महानगरपालिकांना सांगितले की, मार्केट्सकरिता जागा द्या. शेतकरी उत्पादकता समित्यांना जागा द्या. मुंबईमध्ये जवळपास १५ मार्केट्स सुरू झाले. तिकडे महिला येऊन फळभाज्या खरेदी करतात. त्यांना चांगला उत्तम माल मिळतो. दुसरे किफायत भावामध्ये माल मिळतो. म्हणजे मधला दलाल जो होता तो संपून गेला. थोडीशी युजर फी भरून त्याचा वापर करता येईल. नगरविकास विभागाला सांगितले आहे की, प्रत्येक शहरामध्ये शासकीय जागा या मार्केटकरिता उपलब्ध करून द्यायच्या आहेत. शेतकरी उत्पादक कंपनीने थेट तिथे येऊन फळे विकायची. त्या जागेवर स्वच्छता राहण्यासाठी एक मॉडेल तयार करत आहोत. आपल्याला माहीत आहे की, एखादे डाळिंब विकायला गेलो तर त्याला किंमत येत नाही. तेच डाळिंब पॅक करून दिले तर त्याला दुप्पट किंमत मिळते. त्यासाठी आपण असे बाजार सुरू करत आहोत.



### शेतमालाला हमीभाव

प्रश्न – भाजीपाला आणि फळपिकाला हमीभाव देण्याबद्दल शासनाची भूमिका काय आहे? (देविदास मोरे, सोलापूर)

मुख्यमंत्री – नाशवंत जी पिके असतात त्याला हमीभाव देणे हे कठीण असते. हमीभाव आपण साधारणपणे दीर्घ मुदतीची जी पिके असतात त्याला देतो. त्याच वेळी आपण बघितले तर भाजीपाला, फळे या संदर्भात दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एकतर फळांवर जर प्रक्रिया झाली तर फळांना हमीभाव मिळू शकतो किंवा



त्याला चांगला भाव मिळू शकतो. यापूर्वी आपण डाळिंबाचे उदाहरण घेतले. संत्र्याचे मार्केट चेन्नई, बांग्लादेश आहे. चेन्नईला जास्त पाऊस झाला की, इथले मार्केट कोसळते आणि आपली संत्री फेकून द्यावी लागतात किंवा बांग्लादेशमध्ये काहीतरी दंगे झाले की ते व्यापारी सांगतात, आता माल जात नाही, तुम्ही अर्ध्या किमतीत देत असाल तर अर्ध्या, फार तर पाऊण किमतीत द्या असे म्हणून त्या किमतीत ते माल घेऊन जातात. म्हणून ज्या वेळी आपण बघितले की, कोकाकोलाचा जो प्लान्ट आपण मोर्शीला तयार केला, आपल्याला आश्चर्य वाटेल की, तेच जे मिल्क मेड किंवा त्याचा जो ब्रांड आहे तो संत्र्याचा आहे. याच्यातला ८० टक्के पल्प म्हणजे पूर्ण बॉटल इथे तयार होणार, ते मिक्सिंग इथे होणार, भरण्याचे कामही इथे होणार मात्र ८० टक्के पल्प

अमेरिकेतून येणार. संत्र्याचा ८० टक्के पल्प अमेरिकेतून मागवला जात असेल तर इथल्या संत्र्यांना भाव कसा मिळणार? त्यामुळे आपण कोकाकोलासोबत, जैन इरिगेशनसोबत प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पातून १०० टक्के अमेरिकेतून येणारा पल्प बंद होणार आहे. आपल्या इथल्या संत्र्याचा पल्प तयार होऊन त्या ठिकाणी हे 'मिल्क मेड' तयार होणार आहे. पेप्सी, कोक या सगळ्यांची निर्मिती अशा प्रकारे होणार आहे. प्रधानमंत्र्यांनी त्यांना आता एक गोष्ट सांगितली आहे की, तुम्ही जेवढे एरियेटेड ड्रिंक्स बनवत आहात. त्यामध्ये तुम्ही फळांच्या पल्पची टक्केवारी वाढवा. आधी १ ते २ टक्के होती, ती आता १० टक्क्यांपर्यंत त्यांनी नेली. यातून



आपल्या फळांचा खप वाढेल. आज जे आपण मार्केटकरिता कुठल्या तरी देशावर, बाजारपेठेवर अवलंबून आहोत. ते तसे राहणार नाही. (समजा एक फॅक्टरी लागली, त्याला जेवढा माल पाहिजे आहे, तो माल जर त्याला मिळाला तर शेतकऱ्यांचा फायदा होतो.)

### कर्जमाफी

प्रश्न – बळीराजाला सावरण्यासाठी प्रत्येक अल्पभूधारकाला १ लाख रुपये आणि ५ एकरपेक्षा जास्त शेती असलेल्याला १ लाख ५० हजार रुपये मदत केली तर प्रश्न सुटेल का? (कन्हैया पगारे) आणि शेतकऱ्याला कर्ज घेण्याची वेळच येऊ नये, त्यासाठी सरकार काय करणार? (गणेश गवसणे, अहमदनगर)

मुख्यमंत्री – मुळामध्ये कर्जमाफी हा शेतीच्या क्षेत्रातला अनेक उपायांपैकी एक उपाय आहे. अनेक लोकांना वाटत की, हा अंतिम उपाय आहे किंवा रामबाण उपाय आहे. हा अंतिम उपायदेखील नाही आणि रामबाण उपायदेखील नाही. आपण २००८ सालची कर्जमाफी पाहिली. या कर्जमाफीवर सीएजीचा रिपोर्ट बघितला. त्या रिपोर्टमध्ये लक्षात आले की, कदाचित ३०–४० टक्के शेतकऱ्यांना फायदा झाला असेल. पण जो खरेच अडचणीतला शेतकरी होता, त्याला त्याचा फायदा झाला नाही. आपण कर्जमाफी करतो म्हणजे नक्की काय करतो? कर्जमाफी करतो म्हणजे त्या व्यक्तीला पुन्हा कर्ज घेता यावे म्हणून पात्र करतो. यापेक्षा वेगळ काहीच करत नाही. कर्जमाफीनंतर २००९ साली लोक पात्र झाले. त्यानंतर त्यांनी पुन्हा कर्ज घेतले आणि २०१० साली ते सगळे कर्जबाजारी झाले. एक वर्षाकरता आपण त्यांना समाधान दिले की, तुमचे कर्ज माफ झाले तुमच्यावर कर्ज नाही, बोजा नाही. पुढच्या वर्षी ते पुन्हा कर्जबाजारी झाले. कारण यातला मूळ प्रश्न काय आहे? जोपर्यंत शेतीची उत्पादकता वाढून आम्हाला मार्केट्चा भाव परवडणार नाही, शेती तोपर्यंत फायद्याची होणार नाही. तुम्ही कितीही वेळा कर्ज माफ केले तरी ती व्यक्ती कर्जबाजारीच होईल. (पहिल्यांदा त्याची क्षमता जर तयार केली तर तो कर्ज भरू शकला पाहिजे.) आपण देतो ते पीक कर्ज आहे उद्योगाचे कर्ज नाही. शॉर्ट टर्मचे कर्ज आहे म्हणजे हातऊसने पैसे. पूर्वीच्या काळामध्ये आपण एखाद्या सावकाराकडून हातऊसने पैसे घ्यायचो किंवा एखाद्या मोठ्या माणसाकडून घ्यायचो. त्यातून जे शेतकऱ्यावर अत्याचार व्हायचे ते बंद व्हावेत म्हणून इन्स्टिट्यूशनमधून कर्ज मिळावे म्हणून शासनाने ही पीक कर्ज व्यवस्था उभी केली. आपण बघितलं तर देशामध्ये १० लाख कोटी रुपयांचे पीक कर्ज शासन देते आणि हे कर्ज आपण वापसही करतो. ते हातउसने पैशांसारखे हे कर्ज आहे. यावर काही प्रमाणात व्याजही घेतले जाते. मात्र हा दर जास्त ठेवलेला नाही. काही ठिकाणी शून्य टक्के दर व्याजाचा ठेवलेला आहे. आपण कर्ज माफ केल्यानंतर त्या वर्षी ती व्यक्ती कर्ज घ्यायला पात्र झाली आणि पुढच्या वर्षी पुन्हा कर्जबाजारी झाली तर त्याचा फायदा काय आहे. त्याने जर पुन्हा कर्जबाजारी होऊ नये असे असेल तर शेतीच्या क्षेत्रात गुंतवणूक करावी लागेल. ही गुंतवणूक करायची तर हा पैसा कोठून येईल? कर्जमाफी करायची आहे तर बजेटमधून पैसा येईल. गुंतवणूक करायची आहे तरी बजेटमधून पैसा येईल. आता तुमच्याजवळ दहा रुपये आहेत. या दहा रुपयाचा योग्य विनियोग करायला सांगितला तर त्यातून शेतकऱ्याच्या फायद्याचे काय आहे त्यामध्ये विनियोग करायचा की शॉर्ट टर्मच. काय आहे यात विनियोग करायचा? आता आपण जर विचार केला तर हे जे ३१ लाख शेतकरी आहेत त्यांना आपण इन्स्टिट्यूशनल क्रेडीट सिस्टिममध्ये

सुसंवाद

म्हणजे यांना कर्ज पुन्हा मिळेल याच्याकरता कसे आणायचे याचा विचार आपण करू शकतो. पण काही दिवसापूर्वी मी सांगितले की, 30 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली तर 30 हजार कोटी बँकेला गेले. यांना पुढच्या वर्षी पुन्हा कर्ज मिळाले. कुठलीही व्यवस्था नसल्याने एक वर्ष, दोन वर्ष, तीन वर्षात ते पुन्हा कर्जबाजारी झाले. त्याऐवजी 30 हजार कोटी, २० हजार कोटी दरवर्षी मी शेतीत गुंतवले त्यातून मी शाश्वत पाणी दिले, शाश्वत वीज दिली, मायक्रो इरिगेशन दिले, मार्केट लिंकेज दिले आणि पीक पद्धतीमध्ये मदत दिली, नवनवीन तंत्रज्ञान दिले तर तो शेतकरी जन्मभराकरिता कर्जमुक्त होऊ शकतो. हातउसने पैसे घेतले तरी ते तात्पुरते घेतले, कर्ज घेतले ते परत केले आणि त्यातून नफा मिळवला. अशा प्रकारच्या व्यवस्थेमध्ये तो शेतकरी जाऊ शकतो. म्हणून एक राज्यकर्ता म्हणून मी पाहतो त्या वेळी मलाही असे वाटते की, ठीक आहे ना करून टाका या 30 लाख लोकांची कर्जमाफी. आपल्याला फार त्याचा राजकीय फायदा मिळेल. कर्जमाफी कधीच करू नये या मताचा मी नाही. त्याची योग्य वेळ असते. तुम्ही एकाच वर्षी 30 हजार कोटी रुपये हे कर्जमाफीवर देऊन टाकले तर पुढचे 3-४ वर्ष तुम्ही कृषी क्षेत्रात गुंतवणूक करू शकणार नाही. त्यामुळे अशा प्रकारची व्यवस्था उभी करण्यासाठीचा माझा प्रयत्न आहे आणि म्हणून मी पुन्हा एकदा सांगतो की कर्जमाफीच्या विरोधात नाही.

## जनतेची योजना

प्रश्न - जलयुक्त शिवार ही योजना राज्यभर खूप यशस्वी झाली. या योजनेचे यश कशात आहे? पाणी अडवण्याच्या पूर्वीच्या योजनांना एकत्र करून तयार केलेली ही योजना आहे का? यापूर्वीच्या योजनेपेक्षा ती किती वेगळी आहे?
(रामचंद्र घरत, हिंगोली)

मुख्यमंत्री - पहिल्यांदा मी एक गोष्ट सांगतो की जलयुक्त शिवार ही योजना यशस्वी झाली याचे कारण ही जनतेची योजना आहे. केवळ सरकारची योजना असती तर योजना यशस्वी झाली नसती. जुन्या योजनेमधील आणि या योजनेमधील मूलभूत फरक म्हणजे पूर्वी आपण १४ योजना राबवत होतो आणि ५-७ वेगवेगळे विभाग त्या योजना चालवत होते. या सगळ्या जलसंधारणाच्या योजना होत्या पण या वेगवेगळ्या प्रकारे चालायच्या. यांचा समन्वय नव्हता. त्यामुळे असे व्हायचे की आपण एकाला टोपी घालायचो, एकाला शर्ट घालायचो, एकाला पँट घालायचो, एकाला जोडे घालायचो, एकाला घड्याळ घालायचो. तयार कोणीच व्हायचे नाही. आपण या १४ योजना एकत्रित केल्या. कलेक्टरच्या अधिनस्त सर्व विभाग आणले. या योजनेपुरते सगळ्यांनी कलेक्टरला रिपोर्टिंग करायचे असा एक आराखडा तयार केला. त्या आराखड्यावर सगळे विभाग काम करतील. यातले सगळ्यात मोठे यश काय तर त्यातील लोकसहभाग आणि शास्त्रीय दृष्टीकोन. आपल्याला माहिती आहे की, आमचे वॉटर शेड जे आहे, त्याच्या पाणलोट क्षेत्राचा विकास हा याचा गाभा आहे. सिमेंट नाला बांध सोपे काम आहे, ड्रेनेज सिस्टिम हे काम सोपे काम आहे. हे काम मोठ्या प्रमाणावर व्हायचं पण जोपर्यंत आम्ही सीसीटी, डीप सीसीटी तयार करणार नाही, आमच्याकडे नुसते पाणी अडवा ही आमची समस्या नाही. तर माती अडवा हे आमचे महत्त्वाचे काम आहे. पाण्यासोबत माती वाहून जाते ती तेथे अडवून ठेवण्यासाठी सीसीटी आणि डीप सीसीटी केले, एरिया ट्रिटमेन्ट केली, कम्पार्टमेंट बंडिंग केले. प्रत्येक माध्यमातून आपण पाणी जे आहे ते सुरक्षित करत गेलो. त्याचे संधारण करत गेलो आणि त्यासोबत आपली जी माती वाहून जात होती ती थांबवण्याचे काम केले. त्यामुळे सिमेंट नाला बांध यामध्ये वाहून येणारी माती कमी झाली. आपण वरपासून खालपर्यंत काम केल्यामुळे आपला यावर्षी अभूतपूर्व अशा प्रकारचा जलस्तर वाढला आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये जिथे मार्चमध्ये आपल्याला २००-300 टँकर लागायचे, मार्च संपला तरी तिथे आपण पाचच्या वर टँकर लावले नाहीत. त्याच्यामुळे एक मोठं परिवर्तन झाले, याचे श्रेय लोकांनाच द्यावे लागेल.





पण कर्जमाफीतून प्रश्न सुटत नाहीत. कर्जमाफीतून केवळ एक वर्षापुरतेच समाधान मिळते हे आपण यापूर्वी बघितले आहे. म्हणून तर त्याच्या पूर्वीच्या चार गोष्टी करून जर कर्जमाफी केली तर त्यातून शेतकरी कर्जमुक्त होईल.

### शेतीमध्ये परिवर्तन

प्रश्न – शेतकऱ्याला एक पाण्याचा प्रश्न आहे तर शाश्वत शेतीसाठी पाणी साठवण्याबद्दल आपल्या ज्या योजना आहेत. त्यामध्ये आपल्याला आणखी भरीव काम करण्याची गरज आहे. प्लास्टिक आच्छादनासंदर्भात आपण वैयक्तिक लक्ष घालावे.

मुख्यमंत्री – आपल्याला आनंद वाटेल की, ही जी आच्छादनं होती यावरचा टॅक्स 0 टक्के केला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात त्याच्या किंमती कमी होतील. त्यासोबत एकीकडे अछादानाचे शेततळे झालेच पाहिजे. अनेक ठिकाणी आपण असा प्रयत्न करतो आहे की, जलसंधारणाचे जे शेततळे आहे ते देखील झाले पाहिजे. त्यामुळे भूगर्भातील पाण्याच्या पातळीमध्ये वाढ होते, त्यालादेखील आपण मोठ्या प्रमाणात मदत करतो आहोत. शेततळे अतिशय चांगला उपाय असून त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर शेतीमध्ये परिवर्तन होणार आहे.

प्रश्न – पडीक शेतीवर सोलर प्लान्ट उभारून त्या ऊर्जेवर शेती करण्याबाबत आपलं काय मत आहे. (उमाकांत जोशी, नांदेड) आणि कोकणामध्ये अनेक शेतावर विद्युत पुरवठा नाही, शेतकऱ्यांना जर सोलर ऊर्जेचा पर्याय पंचायत समितीकडे सबसिडी दरात उपलब्ध करून दिली तर शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो. (स्वामी भिसे, ठाणे)

मुख्यमंत्री – पडीक जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प लावणे किंवा ती भाड्याने घेणे यासाठी गुंतवणूकदार तयार आहेत. कारण सौर ऊर्जा प्रकल्पास खूप मोठी जागा लागते. मोठमोठी पॅनल्स लावावे लागतात. त्यामुळे हा जो प्रयोग आहे त्यासाठी राज्य सरकारही पुढाकार घेत आहे. काही प्रमाणात शेतकरी जिथे पुढे येत आहेत त्यांना तर आपण फायदा देत आहोत. पण दुसरा प्रश्न मला अधिक मूलभूत वाटतो, आपण सोलर पंप उपलब्ध करून दिले पाहिजेत. मागच्या वर्षी १० हजार पंपाचा कार्यक्रम हाती घेतला साधारण ३-४ वर्षाच्या कालावधीत विजेवर आधारित जे पंप आहेत ते सौर ऊर्जेवर कसे नेता येतील याचा प्रयत्न केला पाहिजे. पण ज्या वेळी १० हजार पंप दिले त्यावेळी असे लक्षात आले की, या गतीने जर आपण काम केले तर शेतकऱ्यांना सौर वीज देणे कठीण आहे. आपण जे इंफ्रास्टक्चर तयार केले होते ते असे आहे की, ज्याच्यामध्ये आपण सातही दिवस, दिवसा वीज देऊ शकत नाही. कुठे तीन तर कुठे चार दिवस देऊ शकतो. बाकी रात्रीची वीज आपल्याला द्यावी लागते. ते इंफ्रास्टक्चर एक-दोन किंवा पाच वर्षात बदलता येत नाही. एवढे मोठे इंफ्रास्टक्चर आपण तयार केलेले आहे. म्हणून आमच्यासमोर हादेखील प्रश्न होता की, शेतकऱ्याला दिवसाच वीज दिली पाहिजे. म्हणून महाराष्ट्राने अतिशय अभिनव संकल्पना काढली आहे. आता सौरपंप देण्याऐवजी आपण फिडर सेपरेशन केले आहे. गावाचे फिडर वेगळे आहे आणि शेतीचे फिडर वेगळे आहे. शेतीचे जे फिडर आहे ते संपूर्ण फिडरच जर आपण सौर ऊर्जेवर टाकले तर वैयक्तिक शेतकऱ्याला सौरपंप घेण्याची आवश्यकता पडणार नाही. सौर वीज निर्मितीतून त्या फिडरमधून वीज त्याच्या पंपापर्यंत पोहोचेल. आतापर्यंत जी आपली साधी वीज, कोळशाची वीज पोहोचत होती त्याऐवजी ही वीज पोहोचेल. हे मॉडेल आपण तयार केल्यानंतर त्याचे चार-पाच नमूना प्रकल्प सुरू करत आहोत. फार चांगला प्रतिसाद आहे. हा प्रकल्प नीती आयोगाला सांगितल्यानंतर तेदेखील यामध्ये मदत करायला तयार आहेत. केंद्र सरकार प्रत्येक प्रकल्पास ३ कोटी रुपये देत आहे. नीती आयोगाने सांगितले आहे की देशातील इतर भागांनी हा निर्णय घेतला पाहिजे. या निर्णयाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा १२ तास सौर वीज देऊ शकू. त्याची सुरुवात महाराष्ट्र करत हे सांगायला आनंद होत आहे. वैयक्तिक पंप सौर ऊर्जेवर करण्याऐवजी फिडरच सौर ऊर्जेवर करायचा आपण निर्णय घेतला आहे. साधारणपणे आपण एखादी वीज निर्मिती करायची असे आज ठरवले तर त्यास ३ वर्षे लागतात. सौर वीज निर्मिती सहा महिन्यात होते.

प्रश्न – हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावर परिणाम होतो त्याचा

सुसंवाद

सामना सरकार कसा करणार? (सदाशिव पांगारे, नाशिक)

मुख्यमंत्री - नानाजी देशमुख कृषी समृद्धी योजना तयार केलेली आहे. ही योजना राबवत असताना जागतिक बँकेचा सहभाग लाभणार आहे. वातावरणातील बदलांचा मुकाबला करणारी शेती हे त्याचे मूळ आहे. प्रश्नकर्ते नाशिकमधील आहेत त्यामुळे नाशिकच्या द्राक्षांचाच विषय घेऊ. इतके चांगले द्राक्षाचे उत्पादन असताना अचानक गारपीट होते आणि त्या गारपिटीतून पूर्ण शेतकरी उद्ध्वस्त होतो. मी स्वतः तिकडे जाऊन भेटी दिल्या. जे शेतकरी आच्छादन टाकतात, त्यांचे कुठलेच नुकसान नाही. ज्याचे आच्छादन नाही त्याचे मोठे नुकसान आहे. पण हे आच्छादन टाकणे पण सोपे नाही. ते महाग असल्याने गुंतवणूक करण्याची शेतकऱ्याची क्षमता नाही. त्यामुळे आम्ही गेली दीड-दोन वर्ष याचे उत्पादन करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. देशातच उत्पादन केल्याने किमतीत ३०-४० टक्क्यांनी घट होऊ शकेल. आपल्याला वातावरणातील बदलातील जे काही प्रश्न आहेत. जलयुक्त शिवारचा फायदा काय आहे, तर ज्यावेळी तीन दिवस चांगला पाऊस पडतो आणि पुढे २६ दिवसांचा खंड पडतो. त्या वेळी जे काही त्या कालावधीमध्ये संरक्षित जलसिंचनाची आवश्यकता आहे ती त्यातून भागेल. मागच्या खरिपाच्या हंगामामध्ये ज्या वेळी अशा प्रकारचा खंड पडला. जवळजवळ एक-एका जिल्ह्यामध्ये २५ हजार एकराला जलयुक्त शिवारमधून संरक्षित जलसिंचन देऊ शकलो. पाऊस जो आहे तो काही कमी नाही पडला, पाऊस ९५-९८ टक्के पडतो आहे. परंतु त्याच्या कालावधीमध्ये म्हणजेच चार दिवसात दहा दिवसाचा पाऊस पडतो. त्यानंतर मग २५-३० दिवस पाऊस पडत नाही. पुन्हा तीन दिवसात दहा दिवसाचा पाऊस पडतो. हे पावसाचे पाणी साठवून ठेवण्याची क्षमता नसेल तर पिकांचे नुकसान होते. म्हणून ही गुंतवणूक आपण करतो आहे.



प्रश्न - अवजार खरेदीबाबत गैरव्यवहार होत असून शेतकऱ्यांना थेट अनुदान मिळाले तर त्यांनी अवजार खरेदी करून खरेदी केलेल्या अवजाराचे बिल आणि अवजाराचे छायाचित्र कृषी विभागाकडे ई-मेल वर पाठविले तर कृषी विभागाने या बाबीला मान्यता द्यावी. (आदिनाथ चव्हाण, संपादक ॲग्रोवन)

मुख्यमंत्री - अनेक दिवसांपासून अवजारे खरेदी संदर्भात तक्रारी येत होत्या. हेच लक्षात घेऊन जानेवारी २०१७ मध्ये थेट लाभ हस्तांतरण (डायरेक्ट बेनिफीट ट्रान्सफर)च्या संदर्भात शासन निर्णयही निघाला आहे. आता यापुढे शेतकऱ्यांनी अवजारे खरेदी करून त्याची देयके आणि छायाचित्र अगदी व्हॉटसॲपवर पाठवले तरी चालू शकेल.

मला हे निश्चित माहीत आहे की, जोपर्यंत शेती आणि ग्राम विकास या दोन क्षेत्रामध्ये आम्ही काम करणार नाही, तोपर्यंत महाराष्ट्रातील विषमता आम्ही दूर करू शकत नाही. शहरे कितीही चमकली तरीदेखील ५० टक्के लोक जे गावांमध्ये राहतात, जे शेतीवर अवलंबून आहेत, यांच्या जीवनामध्ये जोपर्यंत परिवर्तन होणार नाही, तोपर्यंत महाराष्ट्र बदलू शकत नाही. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून मी आपल्याला आश्वस्त करतो व आपल्याला वचन देतो की, निश्चितपणे महाराष्ट्र सरकार हा शेती आणि ग्राम विकास यावर लक्ष केंद्रित करेल. त्याकरिता सातत्याने आम्ही आपल्याशी संवाद साधू, आपल्या माध्यमातून ज्या सूचना येतील त्यावर कार्यवाही करू यातून निश्चितपणे शाश्वत प्रकारची शेती महाराष्ट्रामध्ये तयार करू आणि सगळे लोक यामध्ये आम्हाला साथ देतील. आमचे चुकले असेल तर आम्हाला जरूर सांगा आम्ही चूक सुधारू आणि उत्तम प्रकारे काम करण्याचा प्रयत्न करू.

**शब्दांकन : मंगेश कोळी**

संपर्क: ०९०२८७१३८२०



# इंटरनेट आणि आजार

स्मार्टफोनमुळे इंटरनेट प्रत्येकाच्या हातात असते. त्याचा किती आणि कसा उपयोग करावा हे मात्र आपण ठरवायचे असते. इंटरनेट आणि मोबाइलच्या अतिवापरामुळे हल्ली सायबर सायकॉलॉजीच्या अंतर्गत मानसिक आजार वाढले आहेत. आय.टी. क्षेत्रात काम करणारे तरुण आय.टी. इंजिनियर असतात. त्यांची नोकरी सुटली की, त्यांना असे मानसिक आजार जडतात.

इंटरनेट किंवा मोबाइलच्या अतिरिक्त वापरामुळे लोकांच्या मनावर विविध परिणाम होऊ लागलेले आहेत, हा एक सायबर सायकॉलॉजीचा भाग आहे. माझ्याकडे काही केसेस आल्या होत्या, ज्यामध्ये लोकांना असा भ्रम व्हायचा की, कोणीतरी त्यांचा पाठलाग करीत आहे. पाठलाग म्हणजे फक्त कोणी मनुष्य त्यांच्यावर नजर ठेवून असतो, असे नाही तर इंटरनेटच्या माध्यमातूनही कोणीतरी त्यांचा पाठलाग करत आहे, असे या मंडळीना वाटते. त्यांच्याशी संवाद साधल्यानंतर असे लक्षात आले की, हा त्यांचा संभ्रम असतो, त्यांचे मन दुसऱ्याने सांगितलेल्या गोष्टीवर अजिबात विश्वास ठेवायला तयार नसते. स्मार्टफोनमुळे इंटरनेट प्रत्येकाच्या हातात असते. त्याचा किती आणि कसा उपयोग करावा हे मात्र, आपण ठरवायचे असते.

### मानसिक आजार वाढले

इंटरनेट आणि मोबाइलच्या अतिवापरामुळे हल्ली सायबर सायकॉलॉजीच्या अंतर्गत मानसिक आजार वाढले आहेत. आय.टी. क्षेत्रात काम करणारे तरुण आय.टी. इंजिनियर असतात. यांच्या नोकरीला काही झाले आणि हे घरी बसले की, यांना असे मानसिक आजार जडतात. आय.टी. क्षेत्रातील यांची जीवनशैली विचित्र आणि धकाधकीची झाली असते. त्यांचे उठणे-बसणे सामान्य लोकांपेक्षा वेगळे असते कारण ते दिवसाच्या कुठच्या वेळेला उठतील आणि कुठच्या वेळेला झोपतील याचा काही नेम नसतो. इंटरनेटवर तासन्तास बसणे, हा त्यांचा एक छंद असतो.

माझ्याच लॉ फॉर्ममध्ये घडलेली ही घटना आहे. लिन्केडच्या माध्यमातून एक महिला मला सतत भेटण्याची इच्छा प्रकट करीत राहायची. तिने मला एक भला मोठा मेसेज पाठवला. ज्यात लिहिले होते की कोणीतरी इंटरनेटवर तिचा (stalk) पाठलाग करीत आहे. तसेच तिच्या मोबाइलमध्ये काहीतरी आहे, ज्यामुळे ती जे काही करते, बोलते ते त्या व्यक्तीला कळते. नंतर तिचा अजून एक मेसेज आला. ज्यात तिने स्पष्ट केले की एक नाही तर दोन-तीन जण तिचा पाठलाग करीत आहेत. मला कळून चुकले होते की, इंटरनेटमुळे मानसिकतेवर घडणाऱ्या परिणामांपैकीच ही पण केस आहे. म्हणून मी तिच्या मेसेजेसकडे दुर्लक्ष केले. साधारण वर्षभराने दादरला एका



कार्यक्रमात ती मला भेटली. तिने मला तिची ओळख सांगितली. कार्यक्रमात असल्यामुळे मला तिच्याबरोबर संवाद साधता आला नाही. साधारण तिला पाहून मला वाटले नाही की, तिला काही त्रास असावा. तिने मला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. मी तिला माझ्या ऑफिसमध्ये भेटायला बोलावले. जेव्हा ती मला भेटायला आली तेव्हा चर्चा करताना मला असे आढळून आले की तिच्या घरी कौटुंबिक समस्या होत्या. काही कारणामुळे तिला तिच्या मुलीला भेटायला देत नव्हते. ती मुंबई शहरात आपला ह्युमन रिसोर्सचा व्यवसाय सांभाळून एकटी राहत होती. मला ती धाडसी वाटली. तिच्यावर घडलेल्या काही प्रसंगामुळे मला तिच्याविषयी सहानुभूती होती. पण नंतर ती पुन्हा तेच सांगू लागली की इंटरनेटच्या माध्यमातून कोणी दोन-तीन जण तिचा पाठलाग करत आहे. तिचा हा भ्रम इतका शिगेला पोहोचला होता की, त्या पाठलाग करणाऱ्या व्यक्तीला पकडण्याच्या नादामध्ये तिने एथिकल हॅकिंगमध्ये सर्टिफिकेट कोर्स केला. तो कोर्स झाल्यानंतर तिला वाटले की, तिला त्रास देणाऱ्या व्यक्तींना तिला पकडता येईल, त्याचा शोध घेता येईल. परंतु तिला काही ते करता आले नाही. पुढे तिने कमाल केली. ब्राझिलच्या कोणा एका प्रसिद्ध हॅकरचा कुठलातरी ऑनलाइन कोर्स करायला घेतला. तो कोर्स ऑनलाइन होता. त्या कोर्सच्या अभ्यासक्रमाविषयी माहिती देताना तिने मला सांगितले की, त्या अभ्यासक्रमात घरफोडी कशी करावी? असा एक धडा होता. म्हणजे विविध कुलपांचा प्रकार, ती कुलुपे कशी उघडावी हा सर्व प्रकार त्यात अभ्यासक्रमात होता.

### धक्का बसला

पुढे तिने जे मला सांगितले तो तर माझ्यासाठी धक्काच होता. ती म्हणाली, की माझा कोर्स याच धड्यापर्यंत येऊन अडकला आहे. मला घरफोडीचे प्रात्यक्षिक करायचे आहे. मी तिला विचारले की, तू कसे करणार घरफोडीचे प्रात्यक्षिक? त्यावर ती म्हणाली, की तोच विचार करत आहे की कशी फोडू लोकांची घरे? मी तिला लगेच सांगितले की, असे काही करू नको. हे बेकायदेशीर आहे. आजही आपले पोलीस हॅकिंगला एक वेळ गुन्हा मानणार नाही, पण घरफोडी, चोरी ह्याला कलम ३७९ अंतर्गत खूप गंभीरतेने घेतात. समाजात आपल्या पायावर उभे राहून, काम करणारी तिच्यासारखी स्त्री, न पाहिलेल्या व्यक्तीच्या भीतीला बळी पडलेली होती. मी तिला विचारले कुणा डॉक्टरला तू दाखवले का? तिला राग आला ती म्हणाली, मी वेडी आहे का? माझी बहीण पण असेच म्हणते, आई पण म्हणते की, डॉक्टरकडे जा. पण मी वेडी नाहीये. मी खूप हुशार आहे. याही केसमध्ये मला आढळले की, ती एकटी राहत होती. तसेच काही कौटुंबिक, भावनिक समस्यांमुळे तिला फोनवरून कोणीतरी पाठलाग करत आहे, तसेच इंटरनेटवर पाठलाग करत आहे असे भासत होते. मी तिला म्हणालो, फोनवरून कोणी पाठलाग करत असेल तर फोन बदल. तर ती म्हणाली, फोन बदलला तरी ती लोक पाठलाग करता. हे सगळे इतके विचित्र होते की, यांचा आजार खूप खोलवर रुजलेला असल्याची खात्री पटली. अशा व्यक्ती स्वत:भोवती एक वलय निर्माण करून घेतात. या केसेसं केवळ मानसिक आजार न राहता सायबर सायकॉलॉजीचा एक भाग बनतो. अशा व्यक्तींचा हा आजार अतिरिक्त मोबाइल वापरामुळे अधिक बळावतो.



### निर्णय घेण्याच्या क्षमतेचा ऱ्हास

इंटरनेट आणि तंत्रज्ञानाच्या अधिक वापरामुळे माणसाची प्राथमिक विचार करण्याचा, निर्णय घेण्याच्या क्षमतेचा ऱ्हास होत आहे. धकाधकीच्या जीवनशैलीमुळे हल्ली मानसिक आजार बळावत आहेच परंतु मोबाइल, इंटरनेटच्या अतिरिक्त वापरामुळे हे आजार अधिकाधिक खोलवर रुजत आहेत. यावरचा उपाय म्हणजे मोबाइल, इंटरनेट न वापरणे हा नाही. तंत्रज्ञान हे मानवनिर्मित असल्यामुळे त्याचा कधी आणि कसा वापर करावा हे आपल्या हातात आहे. तंत्रज्ञानाच्या आहारी गेलात तर मात्र, मानसिक संतुलन ढासळू शकते यात शंका नाही.

### रुग्ण वाढताहेत

एका बातमीनुसार मुंबईतील एका सरकारी रुग्णालयात प्रत्येक दिवशी २५ ते २६ तरुण रुग्ण फक्त सायबर सायकॉलॉजीचे येतात. मोबाइलवर मेसेजेस येत नाही म्हणून त्रास होणारे, मोबाइलच्या अतिरिक्त वापरामुळे डोके दुखणारे रुग्णही पाहायला मिळतात. बऱ्याच रुग्णांना मानसिक आजाराबरोबर शारीरिक आजारही उद्‌भवले आहेत. ज्यात डोळेदुखी, डोकेदुखी, आळशीपणा आणि चिडचिडेपणा अशा तक्रारींचा समावेश आहे. थोडक्यात काय तर मोबाइल, इंटरनेट यांना केवळ तंत्रज्ञानातील एक गोष्ट म्हणून पाहता, जीवनाचा अविभाज्य भाग बनवणे चुकीचे आहे.

**– ॲड. प्रशांत माळी**
सायबर सुरक्षा व सायबर कायदातज्ज्ञ
संपर्क: ०९८२१७६३१५७



# डाळिंब फुलले माळरानी

'गावाकडे सुपीक जमीन नाही. उदरनिर्वाहाचे अन्य पर्याय नाहीत. त्यामुळे शहराची वाट धरली. पण शहरात अपघात झाला. या अपघातात उजवा पायगुडघ्यापासून काढून टाकावा लागला. गावाकडे परतण्याचा निश्चिय केला. खडकाळ व माळरानावर निर्धाराने पाय रोवले. माळरानावर शेततळे खोदले. त्याद्वारे डाळिंबाची बाग फुलवली.' किमया साधली आहे, दिगंबर रामसिंग जाधव यांनी. त्यांची ही यशोकथा अनेकांना उभारी देणारी आहे.

माळाकोळी हा परिसर मूर्तिकार आणि छोट्या-मोठ्या मंदिरांचे कळस साकारणाऱ्या कारागिरांचा परिसर म्हणून ओळखला जातो. या माळाकोळी जवळच हरिश्चंद्र तांडा आहे. लोहा तालुक्यातील बहुतांशी भाग माळरानाचा. त्यामुळे कोरडा ठणठणीतच. पाण्याचे टिपूसही शोधावे लागेल, असा परिसर. त्यामुळे जमीन सुपीक असण्याचा प्रश्नच नाही. झाडोरा वनाचाही दुष्काळ. त्यामुळे उत्पन्नाचे साधन नाही. पिकतच नसल्याने त्यामुळे स्थलांतर ठरलेले. हरिश्र्चंद्र तांड्यावरही वेगळी परिस्थिती नाही. यामुळे तांड्यावरील दिगंबर जाधव यांनीही माळाकोळी परिसरातच फुललेले कौशल्य आत्मसात केले. तेही मूर्तिकार झाले. मंदिरांचे उंचच उंच शिखर, कळस कोरण्याचे काम कारागीर करतात. दिगंबर जाधव यांनीही कळसांचे कारागीर म्हणून काम सुरू केले. त्यातूनच ते पुण्यात स्थिरावले. पुणे शहरासह जिल्हा आणि परिसरात त्यांनी आपले काम सुरू केले. पण त्यांना अपघात झाला. दुचाकीच्या या अपघातात दिगंबर यांचा उजवा पाय तुटला. त्यामुळे त्यांना कृत्रिम पायाचा आधार घ्यावा लागला. मंदिरांचे उंच कळस कोरण्याच्या कलेत पायांना मोठे महत्त्व असते. अवजड आणि शरीरकष्टाचे काम. काल-परवापर्यंत मंदिर-देऊळांच्या कळसापर्यंत लीलया पोहोचणारे दिगंबर, पुरते जमिनीवर आले. यांच्यासमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. आयुष्याची नव्याने बांधणी करण्याचे आव्हान होते. यासाठी पुण्यातील अनुभव उपयुक्त ठरला. कोरडवाहूतही शेतकरी करीत असलेले प्रयोग, त्यांची धडपड पाहून दिगांबर यांना प्रेरणा मिळाली.

### नवीन प्रवासाची सुरुवात

श्री. जाधव यांचा एक नवीन प्रवास सुरू झाला. हरिश्चंद्र तांडा शिवारात अठ्ठेचाळीस एकरांचे माळरान आणि त्यातील विहीर इतकेच पाठबळ. माळरानात येणारे पीक आणि तेही कमी पाण्यात याचा शोध घेतला. त्यातूनच डाळिंबाची फळबाग घेण्याचे निश्चित झाले. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर, अशा माळरानातच प्रयोग सुरू झाला. सुरुवातीला २०११ मध्ये डाळिंबाची सहाशे रोपे लावली. पुढे दरवर्षी या फळबागेचा विस्तार करणे सुरू झाले. जून २०१२ पर्यंत सव्वादोन एकरावर डाळिंबाची बाग विस्तारली. टप्प्या-टप्प्याने २०१५ पर्यंत अडीच एकर आणि आता साडेसहा एकरावर जाधव यांची डाळिबांची बाग आहे. उर्वरित काही क्षेत्रात गरजेनुसार अन्य पिके घेण्याची परंपरा नेटाने चालूच ठेवली.

साडेसहा एकर डाळिंब बाग आणि शेततळे यांमध्ये मोठे अंतर आहे. तेही नैसर्गिक उताराचे आहे. या उताराचा वापर करून ठिबक सिंचनाद्वारे फळबागेला पाणी देण्याची व्यवस्था केली. या ठिबकद्वारेच रोपट्यांना विद्राव्य खते, पोषक द्रव्ये दिले जाते. यामुळे पाण्याची

**माळरानावर डाळिंबाची बाग फुलवण्यासाठी सगळ्यात मोठी अडचण पाण्याची होती. ही अडचण सोडवण्यासाठी दिगंबर जाधव यांच्या मदतीसाठी कृषी विभाग धावून आला. पाण्याच्या समस्येवर शेततळ्याचा उपाय योजण्याचे निश्चित झाले. त्यांना समूह शेततळे मंजूर करण्यात आले. कातळ, खडक फोडून ७२ मीटर बाय ७३ मीटर लांबी-रुंदीचे आणि सुमारे बावीस फूट खोलीचे शेततळे पूर्ण करण्यात आले. साडेसहा एकरावरील फळपिकांची तहान भागविण्याचे स्वप्न नजरेच्या टप्प्यात होते. प्रसंगी आर्थिक चणचण सोसून शेततळे पूर्ण करण्यात आले. या तळ्यात पाच विंधन विहिरींद्वारे पाणी टाकण्यात येते. या पाण्याने शेततळे भरले आहे. पण पाण्याचा काटकसरीने आणि नेमकेपणाने वापर करण्यावर दिगंबर जाधव यांचा भर आहे.**

मोठी बचत झाली आहे. नेमकेपणाने पाणी मिळाल्याने जाधव यांची डाळिंब बाग चांगलीच फुलली आहे. भगवा या जातीच्या डाळिंबांनी ऐन मार्चमध्ये फेर धरला. जेमतेम उंचीची रोपटी डाळिंबांनी लगडून गेली आहेत.

## संशोधन केंद्रांकडून मार्गदर्शन

सोलापूरच्या राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्रांकडूनही जाधव यांना मार्गदर्शन मिळत असते. डाळिंब तजेलदार आणि गोडवा असणारे असावे यासाठी काळजीपूर्वक पाणी आणि खतांच्या मात्रा द्याव्या लागतात. त्यासाठी दिगंबर आणि त्यांच्या पत्नी सौ. सावित्रीबाई राबत असतात.



## अन्य पिके

या शेततळ्याच्या जोरावर दिगंबर जाधव यांनी अन्य पिके घेण्यास सुरवात केली आहे. त्यामध्ये हळद आणि लिंबुवर्गीय फळपिकांचाही समावेश करायचा आहे. डाळिंबाच्या पूर्ण वाढ झालेल्या बागेतून आता दोन हंगाम हाती आले आहेत. डाळिंबासाठी जवळच नांदेड शहरासारखी बाजारपेठ उपलब्ध आहे. या दोन हंगामात नांदेडमध्ये डाळिंब पाठवून अंदाज घेता आला. नांदेडबरोबरच, औरंगाबाद, पुणे किंवा अन्य जवळपासच्या शहरातही लोह्याचे डाळिंब म्हणून माल पाठवण्याचा प्रयत्न असल्याचे जाधव यांनी सांगितले.

अपघातानंतरही दिगंबर जाधव यांनी स्वतः न डगमगता, खडकाळ रानावर फुलवलेली ही डाळिंब बाग अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. शेतीतून काय मिळेल, याचा विचार न करता, आधी शेतीत राबण्याची तयारी ठेवावी लागते, असा धडा दिगंबर जाधव यांनी घालून दिला आहे. त्यांच्या या धडपडीला त्यांच्या कुटुंबीयांनी अखंडपणे साथ दिली आहे. जाधव आपला दिनक्रम सांगताना म्हणतात, 'भल्या सकाळी डाळिंबाच्या बागेत येऊन, रोपट्यांशी हितगूज साधावा लागतो. त्यांचा नूर ओळखावा लागतो. मग दिवसभरासाठी त्या गोष्टींची तजवीज करावी लागते... या परिसरात फळबागच नाही. त्यामुळे कुतूहलापोटी आणि असूयेपोटीही फळबागेत शिरण्याचे, चोरीचे प्रकार घडतात. त्यासाठी रात्री बागेतच मुक्काम करावा लागतो. दर दिवशी जागा बदलून पहारा द्यावा लागतो. त्यासाठी कुटुंबातील सदस्यांना रात्रीचा दिवस करावा लागतो.'

डाळिंबाची बाग ही जाधव कुटुंबीयांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे सगळ्यांनीच या बागेला जीव लावला आहे... खडकाळ माळरानावर डोलणारी, हिरवीकंच... टपोऱ्या तजेलदार डाळिंबांनी लगडलेली बाग जाधव कुटुंबीयांच्या प्रेमातून आणखी बहरू लागली आहे. खडकाळ माळावर डाळिंबाची बाग फुलवण्यासाठी कृषी विभागाने देवदूतासारखी मदत केल्याची कृतज्ञता जाधव व्यक्त करतात. तालुका कृषी अधिकारी महारुद्र मंगनाळे आणि लोह्यातील अन्य प्रगतिशील शेतकरी जाधव यांच्या माळरानावर फुललेल्या या डाळिंब बागेसाठी वेळोवेळी मार्गदर्शन आणि मदतीसाठी उपलब्ध असतात. एक पाय नसूनही दिगंबर जाधव यांनी ज्या चिकाटीने खडकावर फळबाग फुलवली आहे. त्याचे जिल्हाधिकारी सुरेश काकाणी यांनी कौतुक केले आहे.



**– निशिकांत तोडकर**
जिल्हा माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड
संपर्क: ०९८८१७४७३२३

# समस्या नको, रिझल्ट हवा...



**प्रांजल पाटील**
आयएएस २०१६

दृष्टिहीन, दिव्यांगाला आपण सहानुभूती म्हणून बऱ्याच वेळा मदत करतो. मात्र आपल्या ठायी अशी व्यक्ती केवळ सहानुभूतीपुरतीच मर्यादित राहत असेल तर आपल्यासारखे अपंग आपणच. त्यांनाही मन, भावना असते. आपली मैत्री हवी असते तसेच इतर मित्रांच्या, नात्यांच्या पंक्तीत त्यांनाही सामाजिकदृष्ट्या समान दर्जा हवा असतो. मात्र असे होताना दिसत नसल्याची खंत आयएएस प्रांजल लहेनसिंग पाटील यांनी व्यक्त केली.

सहा वर्षांची असतानाच दृष्टी गेली. एक शैक्षणिक वर्ष वाया गेले. या वर्षात खूप त्रास झाला. मात्र आई पाठीशी होती. मला घडविण्यात माझ्या यशात आईवडलांचा सिंहाचा वाटा आहे. सातवीपर्यंतचे शिक्षण दादर येथील कमला मेहता अंध मुलींच्या शाळेत घातले. येथे सर्व ब्रेल लिपीत शिकवले जात. त्यानंतर सरस्वती स्कूलमध्ये प्रवेश घेतला. दहावीच्या परीक्षेसाठी रायटर घेतल्याशिवाय पर्याय नव्हता. तरी दहावीत ८३ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण होण्यात मला यश आले. पुढील शिक्षणासाठी इंग्रजी माध्यम निवडल्याने थोडे कठीण गेले. मात्र येथेही आईने माझ्यासाठी खूप परिश्रम घेतले. आई मला अभ्यासक्रम, नोट्स वाचून दाखवत व मी त्या ब्रेल लिपीत लिहून घेत. या परिश्रमामुळे ८४ टक्के गुणांसह ठाण्यात पहिली येण्याचा मान मिळवता आला.

## चढता आलेख

१०-१२ वीनंतर शिक्षणाचा असा चढता आलेख चढताच ठेवण्याचा मी निर्धार केला. राज्यशास्त्र विषयात पदवी शिक्षणासाठी सेंट झेव्हिअर महाविद्यालयात प्रवेश घेतला. दरम्यान इंग्रजीचे दडपण होते. मात्र त्यावरही मात केली. या महाविद्यालयातील दिव्यांगांसाठीच्या झेव्हिअर रिसर्च सेंटरचा मला माझ्या शैक्षणिक कक्षा उंचावण्यास खूप मदत झाली. मुंबई विद्यापीठातून पहिली येण्याचा मान मला मिळवता आला. पुढे दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयात पदव्युत्तर पदवी मिळवली. 'वेस्ट एशिया स्टडीज' हा विषय घेऊन एम.फिल केले. आता पीएच.डी. सुरू आहे.

## निर्धार

पदवीच्या अभ्यासक्रमाला असताना यूपीएससी परीक्षेच्या माध्यमातून आपण खूप काही करू शकत असल्याचे मला कळले. 'एम.ए'ला असताना ही परीक्षा खुणावू लागली. त्यादृष्टीने काहीसा अभ्यास मी सुरू केला. 'पीएच.डी'चा अभ्यास करताना मी यूपीएससी परीक्षेत यश मिळवण्याचा निर्धार करून परिपूर्ण तयारीला लागले. आपण कोठल्या दिव्याला सामोरे जात आहोत याची मला जाणीव होती. मात्र तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मला यशाकडे वाटचाल करता आली. दरम्यान एक खंत नेहमी बोचत राहते. या परीक्षेसाठी लेखनिक घेण्याची गरज पडते. खरं तर ही गरज पडू नये अशी परीक्षा व्यवस्था तयार करणे गरजेचे आहे. कारण बहुधा आपल्याला जे अभिप्रेत आहे, जे सांगायचे आहे ते आपल्याला मिळालेल्या रायटरकडून अचूक व नेमकेपणाने मांडले जाईल, असे नसते. मला सराव परीक्षेसाठीसुद्धा लेखनिक शोधावे लागायचे. स्पर्धा एका समान पातळीवर व्हायला पाहिजे.

## खंबीर साथ

आई ज्योती व वडील एल.बी. पाटील यांनी मला सदैव लहानपणापासून प्रथम प्राधान्यक्रमावर ठेवले. दहावी-बारावीत आईची खूप मदत झाली. महत्त्वाच्या वृत्तपत्रांची कात्रणे काढून ती शनिवार-रविवार सकाळपासून संध्याकाळपर्यंत सर्व वाचून दाखवायची. कोठे फिरायला गेलो तर तेथील भौगोलिक परिस्थिती, वातावरण, सौंदर्य आदींची ती महाभारतातील संजयाप्रमाणे मला माहिती द्यायची. यामुळे माझ्या ज्ञानात खूप मोठी भर पडत गेली. वडीलही शक्य होईल तेवढा वेळ मला देऊन विविध माहिती वाचून दाखवत. महाविद्यालयात सोडण्यापासून ते लहानसहान गोष्टींची काळजी घेण्यापर्यंत भाऊ सदैव पाठीशी होता.

प्रेरणा

दरम्यान २०१४ मध्ये माझे लग्न झाले. सासरच्या मंडळींनीही त्यांच्या अपेक्षा माझ्यावर लादल्या नाहीत. त्यामुळे अभ्यास करून २०१५ ला यूपीएससीची परीक्षा देऊन मला या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात ७७३ गुणानुक्रमासह यश मिळवता आले. सध्या प्रशिक्षण सुरू असून इंडियन पोस्टल ॲण्ड टेलिकम्युनिकेशन्स ऑडिट ॲण्ड फायनान्स ही सेवा मिळाली आहे. मला येथे नमूद करावेसे वाटेल की अभ्यासाव्यतिरिक्त आपण सामाजिक दृष्टिकोन बाळगणे खूप आवश्यक आहे. सामाजिक व व्यवहारिक जीवनातही आपण तेवढेच सक्रिय असायला हवे.

### ऊर्जा

यशाकडचा प्रवास हा सकारात्मक किंवा नकारात्मक असतो. मात्र, कुठला विचार आपण अधिक काळ सोबत ठेवतो ते महत्त्वाचे ठरते. मलाही अनेक अडचणींमुळे नैराश्य, चिंता आदींना सामोरे जावे लागते. मात्र दरम्यानच्या काळात जपानचे बुद्धिस्ट डायसाकू इकेदा यांचे साहित्य मी नियमित वाचले. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा रोजच्या जीवनात वापर करत गेले.

### संधी

दृष्टिहीनांनी दृष्टी गेली असली तरी दूरदृष्टी ठेवावी. स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करायला हवा. आपल्याला हवी असलेली माहिती, साहित्य कुठल्याही प्रकारे मिळवण्याचा प्रयत्न करायला हवा. तयारी ठेवली तर माहिती आपल्यापर्यंत येते. शिवाय अशी माहिती मार्गदर्शन मिळाल्यानंतर स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा निर्धार, धाडस करणे खूप गरजेचे असते. आपण एक पाऊल पुढे टाकले की आपोआप पाठिंबा मिळत जातो.

### हवा समान दर्जा

दिव्यांग व्यक्ती काही वेगळी नसते. शारीरिक अपंगत्व सोडले तर बाकी सर्व भावभावना एकच. तरी त्यांना समाज वेगळे मानतो. वेगळी वागणूक देतो. एखाद्या अंध, अपंगाला आपला खास मित्र मानणारा व्यक्ती विरळाच. त्यांना गरज असते ती मैत्री, नाते, जिव्हाळा, प्रेमाची. सहानुभूतीची नव्हे. त्यामुळे दिव्यांगांकडे पाहण्याचा दृष्टीकोन जोपर्यंत बदलत नाही, त्यांना समाजात समान दर्जा, वागणूक जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत हा समाज वैचारिकदृष्ट्या अपंगच म्हणावा लागेल.

## तंत्रज्ञानाचा वापर



**यूपीएससी म्हटलं की अफाट स्पर्धा. येथे कारणे देऊन चालत नाही. आहे त्या परिस्थितीत मार्ग काढून रिझल्ट द्यायचा असतो. माझ्यासमोरही असंख्य अडचणी होत्या. मात्र आज त्यांचा सामना केला तर उद्याचे चित्र वेगळे असेल याची खात्रीवजा खूणगाठ मी मनाशी बांधली होती. परीक्षेची तयारी करताना माझ्यासमोर सर्वात मोठी अडचण होती ती साहित्य उपलब्ध नसल्याची. ब्रेल लिपीत या परीक्षेच्या तयारीसंदर्भात संपूर्ण साहित्य उपलब्ध नव्हते. मात्र मी परिस्थितीचा स्वीकार केला आणि तयारीला लागले. जॉब ॲक्सेस वुइथ स्पीच (JAWS) या स्क्रीन रिडर सॉफ्टवेअरच्या माध्यमातून इंटरनेटवरून माहिती मिळवली. पीडीएफ फाइल्स, इतर माहितीचा शोध, ऑनलाइन पेपर वाचण्यासाठी या सॉफ्टवेअरचा खूप उपयोग झाला. जे साहित्य नव्हते ते स्कॅन करून वाचले.**

### यशाची सूत्रे

- मनाची भक्कम तयारी ठेवा.
- थोडा धोका पत्करावाच लागतो. अपयशाची कुठलीही भीती बाळगू नका.
- धैर्य ठेवा. शेवटचे चांगले चित्र डोळ्यासमोर ठेवा.
- सामाजिक जाणिवा बळकट करा. समाजशील राहा.
- कुठल्याही अडचणीचा, परिस्थितीचा बाऊ करू नका.
- आपल्या अडचणींपेक्षा रिझल्टवर लक्ष केंद्रित करा.

शब्दांकन : राजाराम देवकर

# सुवर्णमहोत्सवी संस्कृतिसेतू

ज्येष्ठ साहित्यिक दिवंगत रामभाऊ शेवाळकर यांनी महाराष्ट्राचा गोव्यातील 'सांस्कृतिक दुतावास' अशा शब्दात महाराष्ट्र परिचय केंद्राचे सार्थ वर्णन केले आहे. गोव्याचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत भाऊसाहेब बांदोडकर यांनी महाराष्ट्र सरकारच्या मदतीने उभारलेला, केवळ भौगोलिक भाग जोडणाराच नव्हे, तर महाराष्ट्र आणि गोमन्तकाचे भावनिक, साहित्यिक, भाषिक संबंध सातत्याने वृद्धिंगत करणारा 'महाराष्ट्र परिचय केंद्र' नावाचा संस्कृतिसेतू गेली ५० वर्षे अगदी भक्कमपणे उभा आहे.

गोव्यामध्ये १९६६पासून म्हणजे गेली तब्बल पाच दशके कार्यरत असलेले महाराष्ट्र शासनाचे 'महाराष्ट्र परिचय केंद्र' म्हणजेच गोंयकारांचे लाडके 'मपकें' हा गोमन्तक आणि महाराष्ट्र या दोन राज्यांतील एक भक्कम संस्कृतिसेतू आहे. तसे पाहिले तर 'मपकें' हे महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत येणारे एक शासकीय कार्यालय आहे. मात्र, 'केवळ एक शासकीय कार्यालय' अशी त्याची ओळख अजिबात नाही. उलटपक्षी बहुसंख्य गोमन्तकीयांच्या मनात आपुलकीचे आणि प्रेमाचे अनुबंध निर्माण करणारे ते बृहन्महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे साहित्यिक आणि सांस्कृतिक केंद्र आहे. या उभय राज्यांमधील तो एक भक्कम संस्कृतिसेतू आहे.

पोर्तुगिजांच्या तावडीतून गोवा स्वतंत्र झाल्यानंतर गोव्याचे पहिले मुख्यमंत्री दयानंद उपाख्य भाऊसाहेब बांदोडकर यांनी या राज्याची प्रशासकीय घडी बसवण्यासाठी महाराष्ट्र शासनामधील काही कर्तव्यदक्ष अधिकारी प्रतिनियुक्तीवर गोव्यात घेतले होते. ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक हे या पहिल्या फळीतील एक अधिकारी होते. त्यांनी गोव्याच्या मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क आणि प्रशासन अधिकारी म्हणून उत्तम कामगिरी पार पाडली.

श्री. बांदोडकर यांनी आणि महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांना विनंती करून महाराष्ट्र शासनाचे एखादे कार्यालय गोव्यात सुरू करावे, असा प्रस्ताव ठेवला. यातूनच 'महाराष्ट्र परिचय केंद्र' दक्षिण गोव्यातील मडगाव येथे गोवा मुक्तीदिनी १९ डिसेंबर १९६६ रोजी हे केंद्र सुरू झाले. तीन वर्षांनी १९ डिसेंबर १९६९ रोजी हे केंद्र पणजी या राजधानीच्या शहरात स्थलांतरित करण्यात आले.

## सुवर्णकाळ

या केंद्राच्या आयुष्यात अनेक चढउतार आले. इथे आलेल्या अधिकाऱ्याने किती तन्मयतेने काम केले यावर केंद्राचा आलेख चढताउतरता राहिला.

स्थापनेनंतर केंद्राने महाराष्ट्रातील नामवंत लेखक, कवी, पत्रकार, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते इत्यादींना निमंत्रित करून कार्यक्रमांचा धडाका सुरू केला. व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, साहित्यमेळावे, वाचकचर्चा, राष्ट्रपुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम, लेखक-कवींशी गप्पागोष्टी, लोककलांचे कार्यक्रम अशा विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन गोव्यात ठिकठिकाणी होऊ लागले. अपेक्षेप्रमाणे गोव्यातील जनतेचा उदंड प्रतिसाद या कार्यक्रमांना मिळू लागला आणि अल्पावधीत महाराष्ट्र परिचय केंद्र हे गोव्याच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था म्हणून नावारूपाला आले. १९७२ ते १९८२ या दहा वर्षांच्या काळात या ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकारी प्रभाकर भुसारी यांनी या अनुषंगाने अत्युकृष्ट कार्य करून या कार्याचा आगळावेगळा ठसा उमटवला. तो इतका



अमीट ठरला की, प्रभाकर भुसारी यांच्या निधनानंतर त्यांच्यावर गोव्यामध्ये 'प्रभाकरराव भुसारी स्मृतिगंध' हा अनोखा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. तसे अनेक स्मृतिग्रंथ प्रकाशित होत असतात. पण एखाद्या सरकारी अधिकाऱ्यावर असा स्मृतिग्रंथ निघण्याचे हे उदाहरण विरळाच म्हणावे लागेल.

## स्थानिक संस्थांशी सहकार्य


कालौघात गोव्यात सांस्कृतिक कार्य करणाऱ्या अनेक संस्था उदयाला आल्या. मात्र महाराष्ट्र परिचय केंद्राने पहिल्यापासूनच सर्वसमावेशकतेचे धोरण ठेवले. खेडेगावात साहित्य संमेलने घेण्याची प्रथा 'मपकें'ने सुरू केली. या मेळाव्यांतून अनेक नवोदितांना व्यासपीठ मिळाले तर कितीतरी नवे साहित्यिक या मेळाव्यांमुळे निर्माण झाले.

### 'मपकें'चे ग्रंथालय

महाराष्ट्र परिचय केंद्राचे ग्रंथालय हा गोव्याच्या वाचक चळवळीतील एक महत्त्वाचा घटक आहे. केंद्राच्या स्थापनेबरोबरच ग्रंथालयही सुरू करण्यात आले. आज या ग्रंथालयातील ग्रंथसंख्या १० हजार आहे. ग्रंथालयाचा वाचककक्ष दिवसभर गजबजलेला असतो. सुरुवातीच्या काळात गोव्यात ग्रामीण भागात ग्रंथालये जवळजवळ नव्हतीच. ग्रामीण भागातील वाचकांना उत्तम मराठी पुस्तके वाचायला मिळावीत, यासाठी केंद्राने गोव्याच्या अनेक भागात वाचन केंद्रे सुरू केली. वाचन केंद्रांच्या या उपक्रमाला खूप मोठा प्रतिसाद मिळाला. गोव्याच्या ग्रामीण भागात मराठी साहित्य पोहोचवण्याचे आणि वाचक निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम या केंद्राने केले आहे.

### दिवाळी अंक वाचनोत्सव

दिवाळी हे मराठी साहित्य विश्वाचे एक अनोखे अंग आहे. मराठी भाषा, मराठी साहित्य याचा गोव्यात प्रसार व्हावा आणि वाचक घडावा यासाठी केंद्राने दिवाळी अंक वाचनोत्सव हा एक नवा उपक्रम सुरू केला. महाराष्ट्रातून प्रसिद्ध होणाऱ्या उत्तमोत्तम शंभर दिवाळी अंकांचे तीन संच केंद्र विकत घेत असे. यापैकी एक संच केंद्राच्या ग्रंथालयात ठेवला जाई. एक संच उत्तर गोव्यासाठी व दुसरा संच दक्षिण गोव्यासाठी असे. गावपातळीवर वाचनोत्सव राबवण्यासाठी स्थानिक संस्थांना आवाहन करण्यात येई. स्थानिक ग्रंथालय, युवक मंडळ अशा संस्था यासाठी पुढे येत. या संस्थांना आठवड्यासाठी हा संच दिला जाई. स्थानिक आयोजकांनी गावातील वाचकांना हे अंक उपलब्ध करून देण्याचे व्यवस्थापन करायचे असे.



सातव्या दिवशी वाचनोत्सवाचा समारोप होत असे. हा समारोप म्हणजे एक छोटेसे साहित्य संमेलनच असे. कारण या वाचनोत्सव समारोपाला केंद्राचे अधिकारी एखाद्या नामवंत वक्त्याला सोबत घेऊन जात. अनेक वाचक या दिवाळी अंकांबाबत आपले मत व्यक्त करीत. या उपक्रमाला कल्पनेपेक्षा अधिक प्रतिसाद मिळाला.

### बांदोडकर व्याख्यानमाला

गोव्याचे पहिले मुख्यमंत्री दयानंद ऊर्फ भाऊसाहेब बांदोडकर यांची १२ मार्च ही जयंती. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र परिचय केंद्राने त्यांच्या नावाने दरवर्षी १२,१३ व १४ मार्च अशी तीन दिवसांची 'भाऊसाहेब बांदोडकर व्याख्यानमाला' सुरू केली. ही व्याख्यानमाला गोव्यातील एक प्रतिष्ठित व्याख्यानमाला म्हणून प्रसिद्ध झाली. महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिकांनी या व्याख्यानमालेत आपला सहभाग नोंदवला आणि तिची उंची सतत वाढतच राहिली.

### विद्यार्थ्यांसाठी उपक्रम

भावी पिढीतून कलाकार, लेखक, वाचक निर्माण झाले पाहिजेत या उद्देशाने केंद्राने विद्यार्थी वर्गावरही भर दिला. केंद्रातर्फे गोव्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जात. देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा, राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, अभिनय स्पर्धा अशा प्रकारच्या स्पर्धांची व्यासपीठे केंद्राने गोव्यातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली.

### लोककलांचे दर्शन

महाराष्ट्रातील विविध लोककलांचे दर्शन गोमंतकीयांना घडवण्याचा उपक्रमही केंद्राने राबवला. ५ नोव्हेंबर रोजी होणारा रंगभूमी दिनाचा कार्यक्रम केंद्रातर्फे राबवला जाई. शाहिरी, दशावतारी, कठपुतळी, चित्रकथी अशा अनेक लोककलांचे दर्शन याद्वारे गोव्यातील लोकांना घडवण्यात आले.

### कोजागिरीची भजन स्पर्धा

महाराष्ट्र परिचय केंद्र दरवर्षी कोजागिरीच्या रात्री वारकरी भजनांची स्पर्धा आयोजित करते. सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळेला सुरू झालेली ही स्पर्धा दुसऱ्या दिवशी सकाळी संपते. प्रत्येक भजन मंडळाला अर्धा तासाचा वेळ दिला जातो. मराठी संतांचे अभंग, वारकरी भजन पद्धती ही या स्पर्धेची अट असते.

गेल्या पन्नास वर्षात या केंद्राने महाराष्ट्र आणि गोमंतक या उभय राज्यातील साहित्यिक, सांस्कृतिक अनुबंध जोपासण्याचे काम अविरतपणे केले आहे. कदाचित एखाद्या शासकीय कार्यालयाने अशा प्रकारचे काम तेही बृहन्महाराष्ट्रात केल्याचे हे अपवादात्मक उदाहरण म्हणावे लागेल. या केंद्राचे काम गोव्यापुरते मर्यादित असल्याने महाराष्ट्रातील बहुतेकांना त्याची कल्पना नाही. मात्र महाराष्ट्र परिचय केंद्राचे निमंत्रण आल्यानंतर ते महाराष्ट्रातील साहित्यिक, लेखक, कवी, कलाकार आवर्जून स्वीकारून गोव्यात दाखल होत असत. गोवा सरकारचेही या केंद्राला आतापर्यंत सतत पाठबळ लाभले आहे.


या केंद्रावर अकृत्रिम प्रेम करणाऱ्या गोमंतकीयांची संख्या फार मोठी आहे. या केंद्राची धुरा सांभाळलेल्या सर्वच अधिकाऱ्यांनी या केंद्राचा आलेख उंचावण्यासाठी आपापल्या परीने हातभार लावला. बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषा, मराठी साहित्य, वाचक चळवळ याचा इतिहास लिहिताना महाराष्ट्र परिचय केंद्राचा उल्लेख केल्याशिवाय तो पूर्णच होऊ शकत नाही, हे नक्की.

**– सतीश लळित**
उपसंचालक (माहिती) कोल्हापूर



# कामगारांचे हित, सेवा आणि सुविधा

विविध कल्याणकारी कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही कामगार विभागाची प्रमुख जबाबदारी आहे. औद्योगिक कलहांचे निराकरण व त्यास प्रतिबंध, औद्योगिक सुरक्षा, आरोग्य व सर्व उद्योगांमधील कामगारांच्या कल्याणासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही कामगार विभागामार्फत केली जात. कामगार विभागामार्फत पुरवण्यात येणाऱ्या सेवा ऑनलाइन पद्धतीने देण्याकरिता संगणक प्रणालीचा वापर करण्यात येतो. कामगारांसाठीच्या अशा विविध योजना व निर्णयांविषयी सांगताहेत कामगार मंत्री संभाजी पाटील-निलंगेकर...



**संभाजी पाटील-निलंगेकर**
कामगार मंत्री, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास

राज्याच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसह कामगार कल्याणासाठी कामगार विभाग कार्यरत आहे. या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कामगार आयुक्तालय, विकास आयुक्त (असंघटित कामगार), औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था ही कार्यालये येतात.

कामगार विभागाने सुरू केलेल्या ऑनलाइन सेवांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. 'इज ऑफ डुईंग बिझनेस'साठी विविध कामगार कायद्यात सुधारणा, बाष्पकांच्या सर्टिफिकेशनसाठी स्वयंप्रमाणिकरण आणि एकत्रित वार्षिक विवरण योजना कार्यान्वित करण्यात आल्याने आता कारखाने स्वयंशिस्त आणि आत्मनिर्भर होण्यास मदत होत आहे.

## कामगारांच्या हक्कासाठी तत्पर

राज्यामध्ये कामगार विभागामार्फत १९ केंद्रीय कामगार कायदे, राज्यस्तरीय कामगार कायदे, कारखाने अधिनियम १९४८, बाष्पके अधिनियम इत्यादी कायद्यांची अंमलबजावणी करण्यात येते. कामगार विभागाचे प्रमुख उद्दिष्ट हे कामगारांच्या कामाच्या परिस्थितीमध्ये तसेच त्यांच्या जीवनमानात सुधारणा करणे, राज्यातून बाल कामगार तसेच वेठबिगार पद्धतीचे समूळ उच्चाटन, घातक उद्योगांमध्ये विविध सुरक्षा व आरोग्य उपायांचे पालन, कामगारांचे कौशल्य आणि रोजगारामध्ये कायमस्वरूपी वाढ होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे हे आहे. असंघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येतात. याव्यतिरिक्त कामगार विभागाच्या अधिनस्त कामगार कल्याण मंडळ, सुरक्षा रक्षक मंडळ व माथाडी मंडळ इ. मंडळे कार्यरत आहेत.

## ऑनलाइन सुविधा

कामागार विभागांतर्गत पुरवण्यात येणाऱ्या सेवा ऑनलाइन पद्धतीने देण्याकरिता संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. व्यवसाय करण्यास सुलभीकरण आणि प्रोत्साहन देण्यासाठी कामगार कायद्यात सुधारणा करण्यात येत आहे. आपले सरकार (https://aaplesarkar.maharashtra.gov.in/) आणि एलएमएस (imsmaharashtra.gov.in)

प्रासंगिक

या संकेतस्थळावर सेवा मिळविण्यासाठी ऑनलाइन अर्ज करता येतो. ऑनलाइन प्रमाणपत्र, थर्ड पार्टी व्हेरिफिकेशन आणि प्रमाणपत्र वैधता तपासता येते. दुकाने आणि आस्थापना नोंदणी, दुकाने आणि आस्थापना नूतनीकरण, कंत्राटी कामगार मुख्य मालक नोंदणी, कंत्राटी कामगार अनुज्ञाप्ती नोंदणी, कंत्राटी कामगार अनुज्ञाप्ती नुतनीकरण या सेवांबरोबरच २० सेवा नागरिकांना आपले सरकार आणि एलएमएसच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ अंतर्गत २० सेवा आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाइन करण्यात आल्या आहेत. २५ सप्टेंबर २०१६ पर्यंत कामगार विभागाकडे आलेल्या ५,६१,१३५ ऑनलाइन अर्जांपैकी ५,५३,१५८ अर्जांवर म्हणजेच ९७% अर्जांवर कार्यवाही करण्यात आली आहे.

## सात दिवसात परवाना

धोकादायक नसलेल्या कारखान्यांना, दुकाने व आस्थापनांनी अर्जदाराने अर्ज केल्यापासून सात दिवसात परवाना देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. नोंदणी परवाना व नूतनीकरण करण्यासाठी अर्ज केल्यापासून सात दिवसात परवाना देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. आता सर्व दुकाने व्यवसायाकरिता वर्षाचे ३६५ दिवस कार्यरत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## स्वयंप्रमाणीकरण योजना

व्यावसायिकांसाठी स्वयंप्रमाणिकीकरण योजना राबवली जात आहे. या योजनेंतर्गत सहभागी होणाऱ्या आस्थापनांना विविध कामगार कायद्यांतर्गत एकच एकत्रित वार्षिक विवरणपत्र सादर करण्याची परवानगी देण्यात आली आहे. अशा आस्थापनांची २३ जून २०१५ आणि २३ जून २०१६ च्या शासन निर्णयान्वये पाच वर्षांतून एकदा यादृच्छिक (रॅण्डम) पद्धतीने तपासणी करण्यात येणार आहे. कंत्राटी कामगार अधिनियमामध्ये सुधारणा करून कंत्राटदाराने अनुज्ञप्ती(लायसन्स)साठी अर्ज केल्यानंतर सात दिवसात देण्याची कार्यवाही होणार आहे.

## कामगार कायद्यात सुधारणा

व्यवसाय करण्यास सुलभीकरण व प्रोत्साहन देण्यासाठी कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार कारखाने नोंदणीसाठीच्या आवश्यक कामगारांच्या मर्यादेत वाढ करण्यात आली. यामुळे ज्या कारखान्यात उत्पादनासाठी विजेचा वापर करण्यात येतो त्या ठिकाणी २० व ज्या ठिकाणी उत्पादनासाठी विजेचा वापर करण्यात येत नाही त्या ठिकाणी ४० अशी कामगार वाढ करण्यात आली. महिला कामगारांना सुरक्षा व्यवस्था देण्याच्या अधीन राहून रात्रपाळीत काम करण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र असे करीत असताना महिला कामगारांना रात्रपाळीत कामावर बोलवल्यास त्यांच्यासाठी वाहतूक व्यवस्था, पाळणाघर, सुरक्षितता इत्यादी सोयी देणे बंधनकारक आहे. ओव्हर टाइमची पूर्वपरवानगीची अट रद्द करण्यात आली आहे. आता ओव्हर टाइम तासांची मर्यादा ७५ तासांऐवजी ११५ तास करण्यात आली आहे. भरपगारी रजेसाठी कामांची दिवसाची मर्यादा कमी करण्यात आली आहे. कामगारांना पगारी रजा मिळण्यासाठी कामाच्या दिवसांची मर्यादा २४० वरून ९० दिवस करण्यात आली आहे. किमान वेतन अधिनियमांतर्गत विविध अनुसूचित उद्योगांतील कामगारांचे किमान वेतन निर्धारित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. विविध कामगार कायद्याखालील नियमांमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या असून माथाडी कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करून कायद्यातील तरतुदींचा उपयोग थांबवण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

## उद्योग सुलभीकरण व प्रोत्साहन

**'मेक इन महाराष्ट्र' धोरणानुसार राज्यात अधिकतम गुंतवणूक व्हावी, यासाठी सुलभीकरण आणि प्रोत्साहन देण्यासाठी विविध कामगार कायद्यात सुधारणा करण्यात येत आहेत. नोंदणी/नूतनीकरण आणि परवान्यासाठी केलेल्या अर्जावर विहित मुदतीत कारवाई न झाल्यास भरलेले चलन हेच नोंदणी दाखला आहे असे गृहीत धरण्याची तरतूद करण्यात आली आहे. सर्व व्यावसायिकांना कामगार कायद्यातील विहित नमुन्यातील नोंदवही आणि अभिलेख संगणकीकृत करून संकलित व जतन करण्याची परवानगी देण्यात आली आहे. दुकाने आठवड्यातून सातही दिवस कार्यरत ठेवणे बंधनकारक करण्यात आले असून कामगारांना आठवड्यातून एक दिवस सुटी देणे बंधनकारक करण्यात आले आहे.**

## दृष्टीक्षेपात

विभागाचे संकेतस्थळ : www.mahakamgar.gov.in, https://lms.mahaonline.gov.in/

पुरस्कार : गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार, कामगार मित्र पुरस्कार (संस्थेसाठी), कामगार भूषण पुरस्कार

साजरे होणारे दिवस : ४ मार्च – राष्ट्रीय सुरक्षा दिवस, १ मे – कामगार दिन, १ जुलै – कामगार कल्याण मंडळ वर्धापनदिन.

**शब्दांकन : वर्षा फडके**
विभागीय संपर्क अधिकारी



# माळरानावर हिरवाई

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळमुक्त महाराष्ट्रसाठी निर्धार करून जलयुक्त शिवार अभियानावर लक्ष केंद्रित केले आहे. या अभियानांतर्गत प्रशासनाला कामाला लावून लोकांचा यात उत्स्फूर्त सहभागही मिळवला. त्यामुळे या अभियानाचे चळवळीत रूपांतर झाले आहे. जलयुक्तशिवारच्या विविध कामांमुळे अनेक गावांमध्ये पाणीसाठा वाढला असून पीक उत्पन्नातही वाढ झाली आहे.

एरवी टँकरवर अवलंबून असलेल्या शेंडेवाडी (जि. अहमदनगर) गावाची जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून जलस्वयंपूर्ण गावाकडे वाटचाल सुरू झाली आहे. गावशिवारातील विहिरी पाण्याने तुडुंब भरल्या असून, त्यामुळे आता अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. खरिपावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांनी यंदा रब्बी हंगामात गहू, हरभरा ही पिके व डाळिंब, सीताफळ या फळ पिकासह भाजीपाला पिकांचे उत्पादन घेतले आहे.

संगमनेर तालुका मुख्यालयापासून 30 किलोमीटर अंतरावर डोंगराच्या कुशीत दोन हजारांवर लोकसंख्येचे शेंडेवाडी गाव. १६१३ हेक्टर क्षेत्रापैकी ७७५ हेक्टर क्षेत्रावर शेती कसली जाते. गावातील कौटुंबिक अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. शेंडेवाडीत सरासरी ४५० मिलीमीटरपर्यंतच पाऊस पडतो. पडलेल्या पावसाचे पाणी अडवण्यासाठी कोणतीच व्यवस्था नसल्याने, पाणी वाहून जाते व गावात पुन्हा पाणीटंचाई निर्माण होते.



जलयुक्तशिवारमुळे रब्बी पिकाला मिळाली नवसंजीवनी.

पाण्याचा कुठलाही स्रोत नसल्यामुळे शेंडेवाडी बारमाही जिरायती गाव म्हणून ओळखले जाते. बाजरी, मठ, हुलगे ही खरिपाची पिके घेतली जात होती. संगमनेर तालुका कृषी विभागाच्या यंत्रणेसह सरपंच उर्मिलाताई काळे, उपसरपंच बाळासाहेब डोळझाके यांच्यासह ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन ही कामे पूर्ण केली.

'जलयुक्त शिवार अभियान – सर्वांसाठी पाणीटंचाईमुक्त महाराष्ट्र' अंतर्गत जानेवारी २०१५ मध्ये थेट शिवारात कामाला सुरुवात झाली. प्रथम गावाचा भौगोलिक अभ्यास झाला. लोकसहभाग वाढू लागला. जलयुक्त शिवार अभियानाच्या कामानंतर शेतीतील पीकपद्धती बदलू लागली. शेतकरी भाजीपाला शेती करू लागले. उजाड माळरान आणि कुसळेच दिसणाऱ्या शिवारात पाणी दिसू लागल्यामुळे आज शेतकरी, ग्रामस्थ आणि महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो आहे.

शेंडेवाडीत साकारलेल्या कामांमुळे सुमारे १५० एकर शेती नव्याने सिंचनाखाली येईल. या क्षेत्रात हरभरा, गहू, कांदा, उन्हाळी भुईमूग, मका व चारा पिके शेतकऱ्यांनी घेतली आहेत.

### अशी झाली ठळक कामे

- महात्मा फुले जलभूमी संधारण अभियानातून ५ व लोकसहभागातून 3 अशी नालाखोलीकरण व रुंदीकरणाची एकूण ८ कामे झाली, यातून अंदाजे ३५ टीसीएम एवढा पाणीसाठा निर्माण झाला.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत 3 विहिरींचे पुनर्भरण करण्यात आले. त्यामुळे पाणीपातळीत वाढ झाली.
- संरक्षित शेती व फळबाग लागवडीचे क्षेत्र वाढले असून गावातील पीक पद्धतीत बदल झाला.
- शेंडेवाडी येथे ग्रामपंचायतीच्या

माध्यमातून पाझरतलावातून सुमारे १५,००० घनमीटर गाळ उपसण्यात आला. यातून सुमारे १५ टीसीएम एवढी पाणीसाठवण क्षमता निर्माण होण्यास मदत झाली.

- लोकसहभागातून तीन नाल्यांचे खोलीकरण करण्यात आले, यातून सुमारे १५ टीसीएम एवढी पाणीसाठवण क्षमता निर्माण झाली आहे.
- शेंडेवाडी येथे लोकसहभागातून २०१४-१५ व २०१५-१६ या कालावधीत सुमारे १० वनराई बंधारे बांधण्यात आले .
- गावातील जुन्या कामांची दुरुस्ती व नवीन कामांमुळे अंदाजे १५० टीसीएम एवढा पाणीसाठा निर्माण झाला आहे.

**- गणेश फुंदे**
उप माहिती कार्यालय, शिर्डी

# टँकरमुक्त खामलवाडी

गेल्या दहा वर्षापासून पाणीटंचाईच्या झळा सोसणाऱ्या खामलवाडी (ता. महागाव, जि. यवतमाळ) गावाने जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून झालेल्या कामामुळे टँकरमुक्तीकडे वाटचाल केली आहे. कृषी, महसूल व इतर सर्व यंत्रणांच्या सामूहिक पुढाकारातून हे परिवर्तन घडले आहे.

तालुक्यातील शेवटच्या टोकावरील एक हजार ४० लोकसंख्येचे खामलवाडी हे गाव. २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षात जलयुक्त शिवार अभियानात या गावाचा समावेश करण्यात आला. त्याअंतर्गत तीन सिमेंट बंधारे, दहा शेततळी, सात ढाळीचे बांध या ठिकाणी प्रस्तावित करण्यात आले. या गावात दरवर्षी मार्च महिन्यापासूनच टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत होता. परंतु खामलवाडी गावात कृषी विभागाकडून जलयुक्त शिवार अभियान राबवण्यात आले. परिणामी भूगर्भातील पाणीसाठ्यात वाढ होऊन हे गाव टँकरमुक्त झाले. या ठिकाणी नाला सरळीकरण, खोलीकरण, सिमेंटप्लग दुरुस्ती या कामांना प्राधान्य देण्यात आले. परिणामी पावसाळ्यातील पाण्याची मोठ्या प्रमाणात साठवणूक करता आली. येथील नाल्यावरील विहिरीच्या पाण्याची पातळी वाढून त्या तुडुंब भरल्या आहेत.

### पिकांना मिळाले पाणी

खामलवाडी येथील पांडुरंग राठोड या शेतकऱ्याने कपाशीत सोयाबीन व संत्रा लागवड केली होती. या पिकांना पाणी देण्याची सोय जलयुक्त शिवार अभियानामुळे झाली असल्याचे श्री. राठोड सांगतात. या अभियानांतर्गत गावशिवारालगत झालेल्या कामांमुळे विहिरींची पाणी पातळी वाढली आहे. त्या पाण्याचा उपयोग नव्याने संत्रा लागवड केलेल्या झाडांसाठी होत आहे.

**- चैताली बाळू नानोटे**

आपले गाव

# माणिकमोती!

परभणी जिल्हा ज्वारीचे कोठार म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील वाडी दमई हे छोटे आणि टुमदार गाव. गावाला लागूनच वाहणारा ओढा. कालांतराने गाळ भरला आणि झाडांनी जवळजवळ बुजून गेला. त्यामुळे हा ओढा गेल्या १० वर्षांपासून पावसाळा संपताच कोरडा पडायचा. गावातील बायाबापडे उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाईला सामोरे जायचे. दीड - दोन किलोमीटरवरून एका शेतकऱ्याच्या शेतातील हातपंपावरून पाणी आणायचे. त्यामुळे गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये गावातील निम्म्यापेक्षा जास्त युवकांनी हाताला काम नाही म्हणून औरंगाबाद, पुणे, नाशिक आणि मुंबईची वाट धरली. त्यातील काहीजण मुलांच्या शिक्षणामुळे जूनमध्ये गावात परतले. तर काहीजण अद्यापही परतलेले नाहीत. मात्र यावर मात करण्यासाठी गावकऱ्यांनी गतवर्षी उन्हाळ्यात राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेत पुढाकार घेतला. त्या ओढ्याचे खोलीकरण व रुंदीकरण केले. अन् मृतप्राय झालेला ओढा जिवंत केला.

या ओढ्याला लागून असलेली खारी गेल्या 30 वर्षापासून पडीक होती. माणिक प्रकाश वाटोडे या युवकाने ही खारी कसली. या खारीमध्ये त्याने खरिपामध्ये सोयाबीनचे पीक घेतले. सोयाबीननंतर त्याने शेतात रब्बी ज्वारी पेरली. बेभरवशी पावसाने पुन्हा दगा दिला. मात्र त्याने हार मानली नाही. माणिक जोमाने कामाला लागला. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून या ओढ्यामध्ये साचलेले पाणी त्याने डिझेल इंजिनच्या साहाय्याने आपल्या शेतातील रब्बी ज्वारीला दिले. सध्या त्याची रब्बी ज्वारी जोमाने डोलत आहे. या रब्बी ज्वारी पिकावर टपोऱ्या दाण्यांनी कणसे भरली असून, गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. त्याच्या परिश्रमात रब्बी ज्वारीच्या रूपाने मोती बहरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून पडीक असलेल्या जमिनीत ज्वारी पिकवणाऱ्या माणिकला जगण्याचा नवा मार्ग सापडला आहे. त्याच्या परिश्रमाला जलयुक्त शिवारची जोड मिळाली. त्याच्या वर्षभराच्या रोजीरोटीचा प्रश्न मिटला आहे. या वर्षी त्याला पाच ते सहा क्विंटल ज्वारी होण्याची खात्री असून, त्यासोबत पाचशे पेंढ्या कडबा होणार असल्याचे तो सांगतो. त्याला गावातील इतर युवकांप्रमाणे जगण्यासाठी औरंगाबाद, पुणे, नाशिक किंवा मुंबईला जाण्याची गरजही राहिली नसल्याचे तो सांगतो.



माणिक प्रकाश वाटोडे

**- अनिल गडेकर**
जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर

# महापणन अभियान




अटल महापणन विकास अभियानाचा शुभारंभ करताना सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री सुभाष देशमुख.

सहकारी पणन संस्था व प्रक्रिया संस्थाची शिखर संस्था म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ कार्यरत आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाची खरेदी-विक्री आणि कृषी निविष्ठांची खरेदी विक्री करण्याचे काम गावस्तरावर विविध कार्यकारी सेवा संस्था, तालुका व जिल्हा स्तरावर खरेदी-विक्री संघ व राज्यस्तरावर पणन महासंघ करत असतात. शेतकऱ्यांना शेतीविषयी सुविधा देणाऱ्या या सहकारी संस्थांचे मोठे जाळे राज्यात असून या संस्थांना बदलत्या काळानुसार बळकट करण्याची गरज आहे. म्हणूनच माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने त्यांच्या जन्मदिवसापासून म्हणजेच २५ डिसेंबर, २०१६ ते १ जुलै, २०१७ (आंतरराष्ट्रीय सहकारी संस्था दिवस) या कालावधीमध्ये अटल महापणन विकास अभियान राज्यात राबवण्यात येणार आहे.

सहकार व पणन विभागाने राज्यातील शेतकऱ्यांना केंद्रबिंदू माणून - संत शिरोमणी सावता माळी आठवडी बाजार, महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये सुधारणा, राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान, अटल महापणन विकास अभियान असे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. अटल महापणन विकास अभियानांतर्गत सहकारी पणन व्यवस्थेचा कसा कायापालट होणार आहे. याबाबत सांगताहेत सहकार, पणन व वस्त्रोद्योग खात्याचे मंत्री सुभाष देशमुख...



**सुभाष देशमुख**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री

## अभियानाचा उद्देश

विभागाचा कार्यभार घेतल्यानंतर एक गोष्ट लक्षात आली की, आपल्यापेक्षा छोटे राज्य असणाऱ्या हरयाणा आणि पंजाब येथील पणन महासंघाची वार्षिक उलाढाल १० ते १२ हजार कोटी असताना महाराष्ट्राच्या पणन महासंघाची वार्षिक उलाढाल १२८ कोटी रूपये इतकी आहे. पणन महासंघास बळकट करताना त्याच्या सभासद संस्थाना बळकट करावे लागेल. त्यातील सुमारे ५५-६० टक्के संस्था तोट्यात आहेत. राज्यातील या सर्व संस्थांचे बळकटीकरण केल्याशिवाय शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होणार नाही.

राज्य सहकारी पणन महासंघ, खरेदी-विक्री संघ व विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था यांचे बळकटीकरण हा मुख्य उद्देश आहे. पणनच्या त्रिस्तरीय रचनेच्या बळकटीकरणातून शेतकऱ्यांना कृषी पणनविषयक सुविधा देऊन संस्थांची आर्थिक उलाढाल वाढवले जाईल. या कामी समाजातील प्रत्येक घटक जसे - शासकीय संस्था सहकारी संस्था, खाजगी संस्था (कॉर्पोरेट्स) व सभासद शेतकरी / लोक यांचा सहभाग वाढवला जाईल आणि जनजागृतीच्या माध्यमातून सहकारी पणन विकासासाठी चळवळ उभी केली जाईल. या अभियानाद्वारे राज्यातील सहकारी पणन महासंघ, ३५० खरेदी विक्री संघ व २०११५ वि.का.स. सोसायट्यांना या २०१९ पर्यंत आर्थिकदृष्ट्या बळकट करण्याचे उद्दिष्ट आहे.

## महिला स्वयंसहाय्यता गटांच्या उत्पादनांचे पणन

या अभियानाद्वारे राज्यातील महिलांच्या स्वयंसाहाय्यता गटांची उत्पादने व सेवा यांचे कायमस्वरूपी विपणन व्यवस्था पणन महासंघ, खरेदी-विक्री संघ व वि.का.स. सोसायटी यांच्याद्वारे करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी जिल्ह्यातील बचतगटांची ब्रँडेड उत्पादने व सेवांचे

जिल्हा, तालुका स्तरावरून विपणन करता येईल. निवडक उत्पादनांचे पणन महासंघाद्वारे विपणन करण्याचा मानस आहे.

### अभियानाची कार्यपद्धती

अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी पणन महासंघाचे राज्यस्तरीय अधिकारी, जिल्हा विपणन अधिकारी, विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, तालुका साहाय्यक निबंधक यांच्याद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सहकारी पणन संस्थांचा या अभियानात सक्रिय सहभाग करून घेण्यात येत आहे. या अभियानाबाबत राज्यस्तरापासून गावस्तरापर्यंत प्रचार व प्रसिद्धीच्या विविध मार्गाचा अवलंब करण्यात येत आहे. त्यामध्ये बॅनर्स, पोस्टर्स, पॉम्प्लेटस, रेडिओ, टी.व्ही.वर कार्यक्रम व जाहीराती इ.चा वापर होत आहे. संबंधित संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, इ. ची क्षमता बांधणी करण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा, बैठका राज्यस्तरापासून जिल्हास्तर, तालुकास्तर, गाव स्तरापर्यंत आयोजित करण्यात येत आहेत. नावीन्यपूर्ण संकल्पनांचा स्वीकार व विस्तार करण्यात येत आहे.

### अभियानाची यशस्वी वाटचाल

अभियानाची शुभारंभ कार्यशाळा पुण्यात झाल्यानंतर सर्व जिल्ह्यांच्या जिल्हास्तरीय कार्यशाळा पूर्ण झाल्या आहेत. त्यातून सुमारे १२५०० पदाधिकारी - अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सध्या तालुका कार्यशाळा सुरू आहेत.

तसेच सर्वच खरेदी-विक्री संघ वि.का.स. सोसायटीचे कृती आराखडे तयार होताहेत. त्यातून आतापर्यंत सुमारे १५० संस्थांनी स्वतः च्या बळावर छोटे-मोठे व्यवसाय सुरू केले आहेत. यामध्ये स्टेशनरी दुकाने, पिठाची गिरणी, पशुखाद्य विक्री, चहा पावडर एजन्सी, शेतीसाठी जैविक व आरोग्यासाठी आयुर्वेदिक औषधे, हार्डवेअर, शेती औजारे विक्री, तांदूळ विक्री केंद्र, स्टेट बँकेचे मिनी सेवा केंद्र, झेरॉक्स दुकान, मंगल कार्यालय, भांडी भाड्याने देणे, बारदान विक्री, खत विक्री, स्वस्त धान्य दुकान, दुध विक्री केंद्र, बहुउद्देशीय सभागृह, गांडूळ खत विक्री, ठिबक, स्प्रिंकलर इ. प्रकारचे व्यवसाय सुरू झाले आहेत. या वर्षीच्या या अभियानातून किमान १००० संस्था स्वबळावर स्वतःचा व्यवसाय सुरू करतील अशी अपेक्षा आहे. यातून गावातील युवकांना रोजगार उपलब्ध होईल. या अभियानाद्वारे डिसेंबर, २०१६ पासून आतापर्यंत सुमारे २.२७ लाख शेतकऱ्यांना वि.का.स. सोसायटींचे सभासद करून घेण्यात आले आहे, ज्यामुळे या शेतकऱ्यांना विविध सेवा मिळण्यास मदत होणार आहे. या अभियानात स्वबळावर व्यवसाय सुरू करून छोटे-मोठे व्यवसाय सुरू करणाऱ्या संस्थांना आम्ही अटल महापणन पुरस्कार देणार आहोत. तसेच या संस्थांना धान्य सॉर्टिंग-ग्रेडिंग मशिन्स, माती परीक्षण सुविधेसारखे उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध करून दिले जातील.

**शब्दांकन : काशिबाई थोरात**
विभागीय संपर्क अधिकारी

प्रासंगिक

## उपक्रम

- गावातील सर्व सातबाराधारक शेतकऱ्यांना विविध कार्यकारी सोसायटीचे सभासद करून घेणे, या सोसायटींना खरेदी विक्री संघाचे सभासद करून घेणे.
- राज्यातील प्रत्येक खरेदी विक्री संघ व प्रक्रिया संस्था पणन महासंघाची सभासद करणे आणि पणन महसंघाचे सर्व उपक्रम खरेदी विक्री संघाद्वारे तर खरेदी विक्री संघाचे सर्व उपक्रम विविध कार्यकारी सेवा सोसायटीद्वारे राबवणे.
- या संस्थांनी नियमानुसार स्वतःच्या स्थावर जंगम मालमत्तांचा व्यावसायिक उपयोग करणे, थकीत रकमेची वसुली करणे, पणन महासंघ व इतर संस्थांनी गोदामाचा वापर पूर्ण क्षमतेने करणे, इ. याद्वारे स्वत:चे खेळते भांडवल उभे करून आर्थिक स्थिती सुधारणे.
- पणन महासंघाने या संस्थांच्या माध्यमातून व कृषी उत्पन्न बाजार समिती त्यांच्या मदतीने किमान आधारभूत किंमत योजना व भाव स्थिरता निधी योजनेंतर्गत खुल्या बाजारात अन्नधान्य खरेदी गतिमान करणे.
- महासंघाने स्वत:च्या खत कारखान्याच्या 'भगिरथ' खतांचे व पशुखाद्य कारखान्यांच्या 'वैभव' पशुखाद्यांचे उत्पादन वाढवून सभासद संस्थांच्या माध्यमातून विक्री वाढवणे.
- या संस्थांनी शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या कृषी निविष्ठा जसे की, रासायनिक खते, जैविक खते, सेंद्रिय खते, बुरशिनाशके, अवजारे, इत्यादींची खरेदी-विक्री वाढवणे.
- या संस्थांनी रेशन दुकान,घरपोच ध्यान्य, अंगणवाडी-शाळा-आश्रमशाळांना पोषण आहार पुरवठा, इत्यादी योजनांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन उत्पन्न वाढवणे.
- कृषी मालाची खरेदी करून स्वच्छता, प्रतवारी करून त्याचे पॅकेजिंग, लेबलिंग, ब्रँडिंग करून विक्री करणे,तसेच गरजेप्रमाणे जीवनावश्यक वस्तूंची खरेदी-विक्री करून संस्थांची आर्थिक उलाढाल वाढवणे.
- सहकाराचे छोटे रूप असणाऱ्या महिला स्वयंसाहाय्यता गटांची (बचत गटांची) उत्पादने व सेवांची विक्री या संस्थांद्वारे करून महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे व सहकारी पणन व्यवस्था विकसित करणे.



उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळा असह्य होत आहे आणि उष्माघाताच्या बळींच्या संख्येमध्ये वाढ होताना दिसत आहे. शासन महावृक्षलागवडीसारख्या मोहिमा राबवून वातावरणीय संतुलन राखण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र सध्या तरी या कडक उन्हापासून बचावासाठी आपल्यालाच आपली काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे उन्हाच्या तडाख्यापासून बचावण्यासाठी घ्यावयाची काळजी व विवधि उपायांविषयी सांगाताहेत डॉ. उमेश गुंजकर.

# उष्माघातापासून राहा दूर...

उन्हात काम केल्यामुळे काही नाही होत, असे म्हणत अनेक कष्टकरी, शेतकरी भर उन्हात राबताना दिसतात. अनेकांना असे कडक उन सहनही होते मात्र तितकेच ते घातकही असते. एवढे घातक की कुणाला त्यांचा जीव गमवावा लागतो. मानवी शरीराचे तापमान सामान्य स्थितीत साधारत: ३७ अंश सेल्सियस असते. एवढ्या तापमानात शरीराच्या सर्व क्रिया सुरळीत पार पडत असतात. अवयव नीट काम करत असतात. एखादे कष्टाचे काम करत असताना मोठ्या प्रमाणावर शरीरातून घाम बाहेर पडत असतो. त्यामुळे शरीरातील पाण्याची मात्रा संतुलित ठेवण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक असते. अशावेळी पुरेसे पाणी न प्याल्यास आपले शरीर घामाच्या रूपात पाणी बाहेर टाकणे बंद करते आणि असंतुलन निर्माण होते. अतिनील किरणांमुळे वातावरणातील तापमान ४५ अंशाच्या पुढे जाते तेव्हा पुरेसे पाणी न प्याल्यास शरीराचे तापमान ३७ अंशाच्या पुढे जाऊन उष्माघात होण्याची भीती असते. हृदयविकार व मधुमेहाचा त्रास असलेल्या रुग्णांनी अधिक काळजी घेणे आवश्यक असते.

### पाणी भरपूर प्या...

पाणी पिण्याच्या काही चांगल्या सवयी आपण अंगी बानायला हव्यात. कुठलाही ऋतू असो थंड पाणी आपल्या शरीरासाठी अनुकूल नसते. सकाळी दोन ते तीन ग्लास शक्य असल्यास कोमट अथवा भांड्यात झाकून ठेवलेले साधे पाणी प्याल्याने शरीरातील ऊर्जा सक्रिय होते. चयापचय क्रिया सुधारते.



जेवणझाल्यावरदेखील थंड पाणी पिणे टाळावे. कोमट पाणी प्यायल्यास पचन अधिक चांगले होते. उभ्याने पाणी पिणे टाळावे. यामुळे गुडघेदुखी वाढते. त्यामुळे खाली बसून हळूहळू घोटघोट पाणी प्यावे. जेवणापूर्वी अर्धातास आधी दोन ग्लास पाणी प्याल्याने पचनक्रिया सुधारते. जेवण झाल्यावर लगेच भरपूर पाणी पिणे योग्य नाही. अगदी थोडेसे पिऊन अर्ध्या तासाने आवश्यक तेवढे पाणी प्यावे.

### आहार

उन्हाळ्यामध्ये शक्यतो मांसाहार टाळावा. रसदार फळांचे अधिक सेवन करावे. सकाळी पोटभरून नाष्टावजा जेवन करावे. सकाळच्या जेवणासोबत ज्युस पिणे कधीही चांगले असते. बाजारातील विदेशी शितपेये पिणे टाळावे. त्यापेक्षा लस्सी, ताक, लिंबू-पाणी, सरबत, फ्रूट सलाड, नारळपाणी, ऊसाचा रस घेणे अधिक उपयुक्त ठरते. धान्यामध्ये गहू, ज्वारी, नाचणी, मका, राजगिरा, शिंगाडा, ओट्स, तांदूळ आहारात ठेवता येईल. कंदभाज्या, वेलभाज्या, पालेभाज्या अधिक खाव्यात. मूगडाळ, मसूरडाळ, हिरवे मूग, मसूर, मोड आलेल्या मटकीचे सेवन करावे. गोड व आंबट फळे, रायते, कोशिंबीर, गुळांबा, मोरावळा, सोलकढी, आमरस, दूध व दुग्धजन्य पदार्थ, आम्रखंड, मठ्ठा आदींचा आहारात समावेश करता येईल.



तर बाजरी, साबुदाणा, वरई, पोहे, चुरमुरे, कोरडे पदार्थ (चिवडा इ.), शेंगभाज्या, गरम मसाला, सुके खोबरे किंवा शेंगदाणा कूट

घालून केलेल्या भाज्या, तूरडाळ, उडीदडाळ, हरभरा, वाटाणा, राजमा, पावटा, छोले तसेच पापड, लोणची, ठेचा, कोरड्या चटण्या खाणे टाळावे.

## उपचारापेक्षा काळजी बरी

कडक उन्हामुळे शरीराचे तापमान असंतुलित होऊन उष्माघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे आधीच काळजी घेतली पाहिजे. ताप येणे, अती घाम, डोळ्यांमध्ये अंगार होणे, तहान लागून घसा कोरडा पडणे, खूप घाम येणे, अशक्तपणा, मळमळणे, चक्कर, उलटी होणे, लघवी प्रमाणापेक्षा पिवळी होणे, आकडी येणे, डोके दुखणे अथवा रक्तदाब कमी झाल्यास वेळेत डॉक्टरांकडे तपासणी करावी.



डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय परस्पर कुठल्याही किरकोळ आजारासाठी औषधे घेऊ नये. याचे दुष्परिणाम आपल्यालाच भोगावे लागतात.

उष्माघात टाळण्यासाठी दुपारी १२ ते ३ पर्यंत बाहेर पडणे टाळून वातानुकूलित कक्षात, पंख्याच्या हवेखाली काम करावे. गडद व काळ्या रंगाचे कपडे वापरू नये. हा रंग उष्णता शोषूण घेत असल्याने आपल्या शरीराचे तापमान अधिक वाढवण्यात भर घालतो. याउलट पांढऱ्या रंगाचे, सैल व सुती कपडे वापरणे अधिक योग्य. अंघोळ थंड पाण्याने दिवसातून दोन वेळा करावी.

## त्वचेची काळजी

उन्हात जाताना सनस्क्रीन लावावी. तसेच टोपी, गॉगल व छत्रीचा वापर करावा. आपली त्वचा ऊन, धूळ आणि घामामुळे तेलकट होते. बाजारातील सौंदर्यप्रसाधने काही वेळापुरते आपले सौंदर्य खुलवतात. मात्र त्यापेक्षा एक बादली कोमट पाण्यात दोन थेंब लिंबूरस टाकून महिनाभर आंघोळ केल्यास त्वचा तजेलदार होण्यास मदत होते. भरपूर पाणी प्यावे व चहा-कॉफीचे सेवन टाळावे. जेवणानंतर बडीशोप खाल्ल्याने त्वचेचा रंग उजळण्यास मदत होते.


## बाळाची काळजी घ्या...

उन्हाचा फटका लहान मुलांना लवकर बसतो. त्यामुळे त्यांना थंड व हवेशीर जागी ठेवावे. मात्र ऐन पंख्याच्या हवेखालीही त्यांना ठेऊ नये. वातानुकूलित कक्षात ठेवणे टाळावे. जंतुदोष होऊन सर्दी, पडसे, खोकला होण्याचा धोका असतो. उन्हाळ्यात बाळाला सहज पचेल असा आहार द्यावा. यामध्ये लाह्या, सातू, दहीभात, दूध, कांदा, कैरी, काकडी, टमाटर आदी पदार्थांचा व लिंबाचे सरबत, कैरीचे पन्हे आदींचा समावेश करता येईल.

## डोळ्यांची काळजी

आरोग्य

डोळे अत्यंत नाजूक असतात. त्यामुळे उन्हाळ्यात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच डोळ्यांचे जळजळणे, लाल होणे, डोळ्यात पाणी येणे, आग होणे, चूळ सुटणे आदी विकार जाणवू लागतात. त्यासोबतच पापण्यांना सूज येणे, डोके दुखणे, दृष्टी कमजोर होणे अशा तक्रारी जाणवतात. अशा तक्रारी आढळल्यास नेत्ररोग तज्ज्ञांना दाखवून तपासणी करून घ्यावी. मात्र डोळ्यांची योग्य निगा राखल्यास डोळ्यांच्या तक्रारींपासून आपल्याला दूर राहता येते.



उन्हाळ्यात धूळ अधिक असल्याने या धुळीतून डोळ्यांना संसर्ग होतो. धुळीमुळे डोळ्यांना चूळ सुटते. मात्र अशा वेळी डोळे चोळू नये. चोळल्यामुळे पापण्यांलगतची त्वचा कोरडी पडते, डोळ्यांची खाज वाढल्यामुळे पापण्यांना जखम होण्याची भीती असते. त्यामुळे दिवसातून चार ते पाचवेळा डोळे स्वच्छ पाण्याने धुवावे. हातात पाणी घेऊन डोळ्यांची उघडझाप करावी. डोळे गोल फिरवावे. ओंजळीत पाणी घेऊन हलकेसे डोळ्यावर मारावे. यामुळे डोळ्यातील धूळ-कचरा निघून जाईल. डोळ्यांना गारवा मिळेल. दुचाकी चालवताना हेल्मेट वापरावे. यामुळे डोळ्यांसोबतच चेहरा आणि अपघातप्रसंगी जिवाचे रक्षण होते.

### काय करावे

- **जास्तीत जास्त पाणी प्या.**
- **हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरा.**
- **बाहेर जाताना गॉगल्स, छत्री/टोपी व चपलांचा वापर करा.**
- **लस्सी, लिंबूपाणी, ताक इत्यादींचा नियमित वापर करावा.**
- **अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसणारी चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या.**
- **थंड पाण्याने दोन वेळा स्नान करा.**
- **सकाळी जास्तीत जास्त कामांचा निपटारा करा.**

### काय करू नये

- **लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या किंवा पार्क केलेल्या वाहनांमध्ये ठेऊ नये.**
- **दुपारी उन्हात बाहेर जाणे टाळा.**
- **गडद, घट्ट व जाड कपडे घालणे टाळा.**

स्मरण

# येथे कर माझे जुळती...

मे महिन्यात शासकीय व निमशासकीय स्तरावर महाराणा प्रताप सिंह आणि पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी केली जाते. त्यांचे पुण्यस्मरण...

## महाराणा प्रताप सिंह



महाराणा प्रताप सिंह हे मेवाड राज्याचे शासक होते. त्यांचा जन्म १५४० ला कुंभलगड येथे झाला. त्यांनी पंचवीस वर्षे राज्य केले. वीरता, बलिदान आणि देशाभिमान यामुळे महाराणा प्रताप यांची कारकिर्द गाजली. महाराणा प्रताप यांना पर्वतीय भागांमध्ये 'किका' म्हणून ओळखले जात होते.

महाराणा प्रताप यांनी मुगल शासनाच्या अधीन राहून काम करावे यासाठी सम्राट अकबराने खूप प्रयत्न केले. त्याचे प्रयत्न अयशस्वी झाले.

मेवाड राज्याच्या स्वतंत्रता समाप्तीसाठी सम्राट अकबर प्रयत्न करीत होता. याचवेळी महाराणा प्रताप सिंह मेवाड राज्याच्या सुरक्षेसाठी कार्य करत होते. याच दरम्यान १५७६ ला हल्दीघाटीचे युद्ध झाले. यात सम्राट अकबर यांचा प्रतिनिधी मानसिंग आणि महाराणा प्रताप यांचात ऐतिहासिक युद्ध झाले. या युद्धात महाराणा प्रताप यांनी मुगलांना सळो की पळो करून सोडले, पण अंतिमत: हे युद्ध मुगल जिंकले.

महाराणा प्रताप यांनी १५८२ मध्ये दिवेर येथील युद्धात सम्राट अकबर याचा प्रतिनिधी असलेला सुलतान खाँ याला ठार करून पुन्हा एकदा आपली वीरता सिद्ध केली. त्यांनी चितोड आणि मांडलगड, मेवाड येथे आपली सत्ता स्थापित केली. त्यांच्या राज्याची कुंभलगड आणि चावण्ड येथे राजधानी होती. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचा मुलगा अमर सिंह याने मेवाडची गादी सांभाळली.

## अहिल्यादेवी होळकर

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म बीड जिल्ह्यातील चोंडी येथे झाला. वडील माणकोजी शिंदे यांच्याकडे चोंडी गावाची पाटीलकी होती. अहिल्यादेवी यांचा सुभेदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव यांच्याशी विवाह झाला.

खंडेराव लढाईत मरण पावले. तेव्हा अहिल्यादेवी होळकर यांनी मल्हारराव होळकरांच्या सांगण्यावरून सती जाण्यास नकार दिला. वैधव्य आले असताना राजकीय सत्तेची सूत्रे हाती घेऊन त्यांनी निर्भीडपणे राज्यकारभार केला. अहिल्यादेवी होळकरांवर इंदूर संस्थानच्या सुभेदारीची जबाबदारी पडली. कोणत्याही प्रसंगाला न डगमगता त्या दौलतीचा कारभार पाहू लागल्या.

अहिल्यादेवी यांनी राज्यातील तत्कालीन आर्थिक स्थितीचा विचार करून कर पद्धतीमध्ये जनतेस सवलत दिली. उत्पन्नानुसार शेतसारा घेण्यास सुरुवात केली. गावोगावी न्यायपंचायती स्थापन केल्या. त्यांनी आदिवासी असलेल्या भिल्ल, गौंड जमातींना पडीक जमिनी लागवडीसाठी दिल्या. त्यांच्यावर राज्याच्या विशिष्ट भागांच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली. त्यांनी बारा ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार केला. बनारस, त्र्यंबकेश्वर येथे घाट बांधले. घृष्णेश्वर, गोकर्ण महाबळेश्वर, उज्जैनचा महाकालेश्वर, रामेश्वर, भिमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उभारण्याचे कार्य केले.



पंढरपूर, कोल्हापूर, नाशिक, जेजुरी, वेरुळ, चिंचवड, पुणतांबे, राजापूर, संगमनेर, पुणे, निमगाव, ओझर, रावेर आदी ठिकाणी नवीन मंदिरे व घाट बांधले. कलकत्ता, काशी येथील रस्त्यांचे बांधकाम केले. द्वारका, बद्रीनारायण, जगन्नाथपुरी आदी ठिकाणी बाग, कुंड, अन्नछत्रे आदी सुविधांची सोय केली. गोरगरिबांना राहण्या-खाण्याच्या सुविधा पुरवण्याचे कार्य त्यांनी केले. यामुळेच त्यांना पुण्यश्लोक ही उपाधी देण्यात आली.

(संदर्भ- राजस्थान अध्ययन, कक्षा ९/मराठी विश्वकोश)

**संकलन: गजानन पाटील**

सत्यमेव जयते

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

Smart City

Amrut



श्री. नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री

# हमी ! स्वच्छ-सुंदर शहरांची, शाश्वत विकासाची, पारदर्शक कारभाराची !

## प्रथम 'नगर विकास दिन'- २० एप्रिल, २०१७

## महाराष्ट्र आता ५०% नागरी !

## शहरांच्या शाश्वत विकासासाठी ₹ २१७८४ कोटींचा निधी

- अमृत योजनेतून ३१ अभियान शहरांच्या शाश्वत पाणी पुरवठयासाठी **३७८९ कोटी**
- अमृत योजनेतून २९ अभियान शहरांच्या मलनिस्सारण व सांडपाणी पुनर्वापर प्रकल्पांसाठी **३७५३ कोटी**
- देशातील **सर्वाधिक स्मार्ट सिटीज महाराष्ट्र राज्यात**
- राज्यातील नागपूर, ठाणे, सोलापूर, पुणे, कल्याण -डोंबिवली, नाशिक व औरंगाबाद या ७ स्मार्ट सिटीसाठी **७००० कोटी**
- शहरांच्या पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी नगरोत्थान योजनेतून **९४८ कोटी**
- शहरांच्या रस्ते विकास प्रकल्पांसाठी नगरोत्थान योजनेतून **२३९ कोटी**
- शहरांच्या मलनिस्सारण प्रकल्पांसाठी नगरोत्थान योजनेतून **६२७ कोटी**
- राज्यातील विविध योजनेतील जुने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी **१३९८ कोटी**
- राज्यातील नागरी रस्ते विकासासाठी **११६९ कोटी**
- राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी **२१५५ कोटी**
- स्वच्छ भारत अभियानासाठी **७०६ कोटी**
- राज्यात आतापर्यंत **३.६९** लक्ष वैयक्तिक शौचालय बांधून पूर्ण
- राज्यातील **२२५ शहरे हागणदारीमुक्त**
- संपूर्ण नागरी महाराष्ट्र **२ ऑक्टोबर २०१७** पर्यंत हागणदारी मुक्त करण्याचा निर्धार
- शाश्वत घनकचरा प्रक्रियेसाठी **१ मे २०१७** पासून कचरा वर्गीकरण अभियानाची सुरुवात
- हरित शहरांसाठी **अमृतवन** योजनेचा प्रारंभ




श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री



**स्वच्छ, सुंदर व स्मार्ट शहरांसाठी वचनबध्द - नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन**

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th May 2017
Date of Publication : 10th of every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह